अहवाल क्रमांक :१३५

पंचायती राज समिती

(२०१०-२०११)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

रत्नागिरी, सातारा, कोल्हापूर, नाशिक व नंदुरबार जिल्हा परिषदांच्या सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील अहवाल

दहावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक २० एप्रिल, २०१२ रोजी विधानसभेस/ विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१२

पंचायती राज समिती

(२०१०-२०११)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

रत्नागिरी, सातारा, कोल्हापूर, नाशिक व नंदुरबार जिल्हा परिषदांच्या सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील अहवाल

दहावा अहवाल

(तीन)
पंचायती राज समिती
(२०१०-२०११)
(दिनांक ४ मार्च, २०१०)

समिती प्रमुख

१ श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.

समिती सदस्य

२ ॲड, के.सी.पाडवी, वि.स.स.

३ श्री. माधवराव पवार, वि.स.स.

४ श्री. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.

५ श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

६ श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

७ श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

८ श्री. बच्चू उर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.

९ श्री. उदय सामंत, वि.स.स.

१० श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.

११ श्री. आण्णा बनसोडे, वि.स.स.

१२ श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१३ श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.

१४ श्री. सुरेश खाडे, वि.स.स

१५ श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.

१६ श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

१७ श्री. अनिल भैय्या राठोड, वि.स.स.

१८ श्री. विजयराव औटी, वि.स.स.

१९ श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

२० श्री. नितीन भोसले, वि.स.स.

(चार)

२१ प्रा. सुरेश नवले, वि.प.स.

२२ श्री. विक्रम काळे, वि.प.स.

२३ ॲड. उषा दराडे, वि.प.स.

२४ श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

२५ श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव,
श्री.प्र.स.मयेकर, कक्ष अधिकारी,

(पाच)

पंचायती राज समिती
(२००८-२००९)
(दिनांक १४ ऑगस्ट २००८ पासून)

समिती प्रमुख

१. श्री.सुभाष ठाकरे, वि.स.स.

समिती सदस्य

*२. श्री.राजन पाटील, वि.स.स.

३. श्री.रमेशभाई कदम, वि.स.स.

४ श्री.माणिकराव जगताप, वि.स.स.

५ श्री.संपतराव अवघडे, वि.स.स.

६ श्री.श्रीनिवास देशमुख (गोरठेकर), वि.स.स.

**७ रिक्त

८ श्री.पी.एन.पाटील, वि.स.स.

९ श्री. सुभाष बने, वि.स.स.

१० श्री.राजेंद्र मुळक, वि.स.स.

११ श्री.पद्माकर वळवी, वि.स.स.

१२ श्री.डी.एस.अहिरे, वि.स.स.

१३ श्री.आशिष जयस्वाल, वि.स.स.

१४ श्री.तुकाराम सुर्वे, वि.स.स.

१५ श्री.अण्णासाहेब माने-पाटील, वि.स.स.

१६ श्रीमती अनुसया खेडकर, वि.स.स.

१७ श्री. अतुल देशकर, वि.स.स.

१८ श्री.टी.पी..कांबळे, वि.स.स.

१९ श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

२० श्री.हेमंत पटले, वि.स.स.

(सहा)

२१ श्री.राजन तेली, वि.प.स.

२२ श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

२३ श्री.विक्रम वसंतराव काळे, वि.प.स.

२४ श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

२५ श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री.अनंत कळसे, प्रधान सचिव,
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री.वि.वा.देशमुख, उप सचिव,
श्री.ता.नि.मिसाळ, अवर सचिव,

---

* सन्माननीय सदस्य श्री.नानाभाऊ पंचबुद्धे यांचा मंत्रीमंडळात राज्यमंत्री म्हणून समावेश झालेला असल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर सन्माननीय सदस्य श्री.राजन पाटील, वि.स.स. यांची दिनांक २९ जानेवारी, २००९ रोजी नामनियुक्ती करण्यात आली.

** सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार यांचा मंत्रीमंडळात राज्यमंत्री म्हणून समावेश झालेला असल्यामुळे पद रिक्त.

(सात)

प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा दहावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१०-२०११ करिता समिती दिनांक ४ मार्च, २०१० रोजी गठित झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

सन २००५-२००६ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २००८-२००९ साठी गठीत झालेल्या समितीने रत्नागिरी, सातारा, कोल्हापूर, नाशिक व नंदुरबार या जिल्हा परिषदांची सखोल तपासणी केली.

समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेस दिनांक २, ३, व ४ जून, २०१० रोजी भेट देऊन श्री.खुशाभाऊ शिनागारे, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्रीमती एस.ए.पाटोळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, रत्नागिरी जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने सातारा जिल्हा परिषदेस दिनांक १५, १६ व १७ जून, २०१० रोजी भेट देऊन श्री.यशवंत शितोळे, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.एस.एस.तडकसे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सातारा जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेस दिनांक ७, ८, ९, व १० सप्टेंबर, २०१० रोजी भेट देऊन श्रीमती जयश्री भोज, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.गणेश पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, कोल्हापूर जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने नाशिक जिल्हा परिषदेस दिनांक २९, ३० सप्टेंबर व १ ऑक्टोबर, २०१० रोजी भेट देऊन श्री.बी.जी.वाघ, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.न.दि.महाजन, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नाशिक जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने नंदुरबार जिल्हा परिषदेस दिनांक १३, १४ व १५ ऑक्टोबर, २०१० रोजी भेट देऊन श्री.आर.जी.कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.एम.टी.गरकळ, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नंदुरबार जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

सन २०१०-२०११ करिता गठीत झालेल्या समितीने रत्नागिरी, सातारा, कोल्हापूर, नाशिक व नंदुरबार जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्याबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने अनुक्रमे दिनांक ०३ मे, २०११ रोजी जिल्हा परिषद, रत्नागिरी, दिनांक ०६ जुलै, २०११ रोजी जिल्हा परिषद, सातारा व दिनांक १३ जुलै, २०११ रोजी जिल्हा परिषद, कोल्हापूर दिनांक २१ सप्टेंबर, २०११ रोजी जिल्हा परिषद, नंदुरबार व दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी जिल्हा परिषद, नाशिक संदर्भात मंत्रालयीन विभागाच्या सचिवांच्या/प्रतिनिधीच्या साक्षी घेतल्या.

(आठ)

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री.सुमित मल्लिक, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव, रोहयो व जलसंधारण विभाग, श्री.मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, श्री.संजय कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्रीमती मेधा गाडगीळ, प्रधान सचिव, गृह (तुरुंग) विभाग, श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, श्री.सुमीत मल्लिक, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.सुनील पोरवाल, प्रधान सचिव, जलसंधारण व रोहयो विभाग, श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, स्वाधिन क्षत्रिय, प्रधान सचिव, महसूल विभाग, श्री.दिनेश वाघमारे, सचिव, सामाजिक न्याय विभाग, श्री.अनिल डिग्गीकर, सचिव, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, श्री.भूषण गगराणी, सचिव, आरोग्य विभाग, श्री.सुधीर ठाकरे, सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.धवड, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव (ले व को) वित्त विभाग, श्री.नारायणकर, सह सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, श्री.अशोक जगताप, सह सचिव, नियोजन विभाग, श्री.कांतीलाल, उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री.ना.ड.ऐराल, उप सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.सुनिल चव्हाण, उप सचिव, जलसंधारण विभाग, श्री.बा.बा.नारायणकर, उप सचिव, नियोजन विभाग, डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्रीमती प्रणाली चिटणीस, उप सचिव, पदुम विभाग, श्री.दि.ग.मोरे, उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या रत्नागिरी, सातारा, कोल्हापूर, नाशिक व नंदुरबार जिल्हा परिषदांच्या कामकाजांची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत..

सन २०१०-२०११ साठी गठित झालेल्या समितीने दिनांक १७ एप्रिल, २०१२ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

विधान भवन :
मुंबई,
दिनांक :१७ एप्रिल, २०१२

बबनराव शिंदे,
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती

(नऊ)

अनुक्रमणिका

अ.क्र.	प्रकरण क्रमांक	विषय	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)	(५)
		प्रकरण एक **रत्नागिरी जिल्हा परिषद**	
१	१.१	"पाणीपुरवठा योजनांना वीज कनेक्शन देण्याबाबत."	
	१.२	"ग्रामपंचायत लेखापरिक्षण"	
		प्रकरण दोन **सातारा जिल्हा परिषद**	
२	२.१	राज्यातील डोंगरी भागातील शाळांची तपासणी व कुपोषित विद्यार्थ्यांना पुरक आहार व वैद्यकीय मदत देण्याबाबत	
		प्रकरण तीन **कोल्हापूर जिल्हा परिषद**	
३	३.१	घरकुल योजने अंतर्गत गायरान ंकिंवा गावठाणातील जमिन उपलब्ध करुन देण्याबाबत (पंचायत समिती, करवीर)	
	३.२	पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदांबाबत	
	३.३	उपविभागाला शासनाची मान्यता मिळण्याबाबत.	
		प्रकरण चार **नाशिक जिल्हा परिषद**	
४	४.१	इगतपुरी पंचायत समितीमध्ये झालेल्या अपहाराबाबत.	
	४.२	रोजगार हमी योजनअंतर्गत घेतलेल्या लघु पाटबंधाऱ्याच्या कामात झालेला गैरव्यवहाराबाबत.	
		प्रकरण पाच **नंदुरबार जिल्हा परिषद**	
५	५.१	विद्यार्थ्यांना गणवेश व लेखन सामुग्री देण्याची योजना	
	५.२	शालेय पोषण आहार कार्यक्रम	
		परिशिष्ट	
६		समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त	

प्रकरण एक - एक

रत्नागिरी, जिल्हा परिषद

पाणी पुरवठा योजनांना वीज जोडण्या देण्याबाबत.

पंचायती राज समितीने दिनांक २ ते ४ जून, २०१० या कालावधीत रत्नागिरी जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २००५-२००६ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक एक बाबत दिनांक ४ जून, २०१० रोजी माहिती घेताना या जिल्ह्यातील अनेक पाणी पुरवठा योजना पूर्ण होऊन दोन वर्षे झाली तथापि, त्या वीज जोडणी अभावी बंद आहेत आणि अशा किती योजना वीज जोडणी अभावी बंद आहेत अशी विचारणा केली, त्यावर कार्यकारी अभियंता (ग्रामिण पाणी पुरवठा) यांनी अशा ५२ वाड्यांमधील योजना असल्याचे समितीस सांगण्यात आले. प्रभारी मुख्य अभियंता यांनी जिल्हा परिषदेकडे १५१ योजना होत्या, त्यापैकी १२४ योजनांच्या जिल्हा परिषदेने निविदा दिल्या आहेत. ७८ योजनांच्या बाबतीत अजून जिल्हा परिषदेकडे अहवाल पाठविण्यात आलेला नाही, अशी समितीस अधिक माहिती दिली.

लांजा तालुक्यातील मठ-गांगरकरवाडी येथील पाणीपुरवठा योजना तयार होऊन दोन वर्षे झाली आहेत. त्याठिकाणी तार ओढण्यात आली आहे. फक्त आपल्या विभागाने त्याठिकाणी खांब उभारुन सेवा जोडण्या देण्यामध्ये काय अडचण आहे अशी समितीने विचारणा केली असता, त्याकरिता तपासणी अहवाल घ्यावा लागेल, तो तपासणी अहवाल घेऊन तात्काळ जोडणी देण्यात येईल, काही वेळेस जिल्हा परिषदेकडून तपासणी अहवाल मिळत नाही असे प्रभारी मुख्य अभियंता यांनी समितीपुढे स्पष्ट केले.

समितीने या जिल्ह्यामध्ये ज्या पाणी पुरवठा योजना पूर्ण होऊनही वीज जोडणी अभावी बंद आहेत, त्यांना तात्काळ वीज जोडण्या देण्याची व्यवस्था करावी व याची कार्यवाही १५ दिवसांच्या आत पुर्ण करावी व याप्रकरणी जिल्हा परिषदेकडून हलगर्जीपणा झाल्यास संबंधित विभागाच्या प्रधान सचिवांना याबाबतीत दखल घेण्यास सांगण्यात यावी, असे समितीने सूचित केले असता प्रभारी मुख्य अभियंत्यांनी ते मान्य करुन त्याचा अहवाल १५ दिवसांत देण्याचेही समितीस आश्वासन दिले. तथापि, आश्वासित केल्याप्रमाणे या संदर्भातील माहिती समितीचा अहवाल तयार होईपर्यंत देखील समितीला प्राप्त होवू शकला नाही.

समितीने जिल्ह्यातील पाणीपुरवठ्याच्या योजना, वीज जोडण्या न मिळाल्यामुळे बंद पडल्या आहेत. त्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे वरिष्ठ अधिकारी यांनी याबाबत बैठक घ्यावी, असे समितीने सुचित केले, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, गेल्या दोन वर्षामध्ये जिल्हा परिषद कार्यालयामधून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कार्यालयामध्ये वारंवार अधिकारी पाठवून पाठपुरावा केला आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळानेसुद्धा मागील वर्षीपर्यंत पुष्कळ वीज जोडण्या दिलेल्या आहेत. यावर्षी जेवढ्या जोडण्या द्यावयाच्या आहेत, त्याकरिता जिल्हाधिकारी तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे कार्यकारी अभियंता यांच्या सोबत बैठक घेऊन त्यांच्यासमोर जिल्हा परिषदेच्या अडचणी मांडल्या. परंतु ज्याठिकाणी पाणीपुरवठ्याची योजना १० लाखांची असेल त्याठिकाणी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे अंदाजपत्रकसुद्धा १० लाखाचे येत असल्यामुळे बऱ्याच योजना अपूर्ण

आहेत. त्याकरिता जिल्हा परिषदेने दोन वेळा पत्रव्यवहार केलेला आहे. याबाबतीत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळानेसुद्धा जिल्हा परिषदेला सहकार्य करावे असे त्यांनी नमूद केले.

जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने, समितीने दिनांक ३ मे, २०११ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष आयोजित केली. साक्षीच्या अनुषंगाने समितीने, वीज जोडणी अभावी ज्या पाणीपुरवठा योजना पूर्ण होऊनही बंद आहेत. अशा योजनांना विद्युत पुरवठा मिळवून देण्यासाठी समितीने दिलेल्या निदेशानुसार संबंधितांबरोबर बैठक आयोजित करण्यात आली होती काय, असल्यास सदर बैठकीत एकूण किती पाणीपुरवठा योजनांना विद्युत जोडण्या देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला, सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार किती ठिकाणचा पाणीपुरवठा सुरु झाला आहे. नसल्यास, तो सुरु न होण्याची कारणे काय आहेत, असे मुद्दे उपस्थित केले.

उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने साक्षीच्या वेळी जिल्हा परिषदेने तसेच पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती पुरविली.

पाणीपुरवठ्याच्या योजना वीज जोडणी न मिळाल्यामुळे सुरु झाल्या नाहीत. हा प्रश्न मार्गी लागण्याकरिता पंचायती राज समितीने दिलेल्या सुचनांप्रमाणे दिनांक ९ जून, २०१० रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी वीज वितरण कंपनीचे मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता व जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता व संबंधित तालुक्याचे उप अभियंता यांची वीज जोडणी संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. त्याचा अहवाल पत्र क्र.रजिप/ग्रापापु/पंरास/३१६३/दि.१० जून, २०१० अन्वये सचिव, पाणी पुरवठा विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे (प्रत सलग्न) सादर करण्यात आला. सदर बैठकीमध्ये ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या ६८ योजनांना वीज जोडण्या देणेबाबतचा निर्णय घेणेत आला.

उपरोक्त बैठकीमध्ये घेणेत आलेल्या निर्णयानुसार आजतगायत ६८ योजनांपैकी ५५ योजनांना वीज जोडण्या देण्यात आलेल्या आहेत, शिल्लक १३ योजनांपैकी ९ योजना तातडीने कार्यान्वित करणेबाबत युद्ध पातळीवर प्रयत्न करण्यात येत आहेत व उर्वरित ४ योजनांना वीज जोडणी निविदा जास्त रकमेच्या असल्याने त्याचा भरणा करणेसाठी नळ योजनांची अंदाजपत्रके सुधारीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

विभागीय सचिवांची साक्ष :

विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे दिनांक ३ मे, २०११ रोजी प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांची साक्ष घेण्यात आली. त्यांनी साक्षीच्या वेळी पाणीपुरवठा योजनांना वीज जोडण्या देण्याबाबत समितीस माहिती देताना पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्या, तथापि वीज जोडणी अभावी त्या सुरु झालेल्या नाहीत असा खुलासा केला.

पाणीपुरवठा योजनांना वीज जोडणी मिळण्यासंदर्भात बैठक आयोजित करावी, या समितीच्या निर्देशानूसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर दि. ९ जून, २०१० रोजी बैठक घेतली. बैठकीच्या वेळी ६८ पाणीपुरवठा योजनांना वीज जोडण्या अप्राप्त होत्या, त्यापैकी आता ५५ योजनांना वीज जोडण्या प्राप्त झालेल्या आहेत,

उर्वरित १३ योजनांपैकी ९ योजनांना माहे मे, २०११ मध्ये वीज जोडण्या प्राप्त होणार आहेत. उर्वरित ४ योजनांमध्ये काही अडचणी असल्याचे दिसून येत आहे. याप्रकरणी दिलेल्या अंदाजपत्रकात फरक पडलेला आहे. अपूर्ण योजनांमध्ये बसवावयाचे रोहित्र पाणीपुरवठा विभागास बसविणार की, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ बसविणार याबाबत दुमत होते. येथे पाणीपुरवठा योजनेसाठी १०-१५ कि.मी. दूरवरुन वीज जोडणी दिली जाते. अशी समितीस माहिती प्राप्त झाली.

जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाने रोहित्र बसवावयाचे असते या समितीच्या भुमिकेवर विभागीय सचिवांनी, साखरी नळ पाणीपुरवठा योजनेसंदर्भात ९ लाख रुपयांचे अंदाजपत्रक विभागाने गृहित धरले नव्हते. अंदाजपत्रकासाठी राज्य स्तरावर वाटाघाटी सुरु केलेल्या आहेत. तसेच ९ लाख रुपयांचे काम करता येईल काय, व विभागास रोहित्र बसवावे लागेल काय याची तपासणी करण्यात येत असल्यामुळे त्यास विलंब होत आहे असे समितीसमोर खुलासा केला.

प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढे नळपाणीपुरवठा योजनेला १५-२० केव्हीचा भार आवश्यक असतो, तथापि महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे रोहित्र ६५ केव्हीचे असते. त्यामुळे येथे फक्त १५-२० केव्ही भाराची गरज असताना, जिल्हा परिषदेस ६५ केव्हीचे भार देयक अदा करावे लागते असे समितीपुढे सांगून १५-२० केव्हीची रक्कम जिल्हा परिषद भरेल, बाकीची रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने भरावी किंवा इतर योजनेतून सदर खर्च करावा अशी त्यांनी भुमिका साक्षीच्या वेळी मांडली.

गावासाठी ६५ केव्हीचे रोहित्र आलेले असते, त्यातून जिल्हा परिषद पाणी पुरवठ्यासाठी १५-२० केव्ही घेऊ शकते असे समितीने मत व्यक्त केले असता, प्रभारी मुख्य कार्यकरी अधिकारी यांनी सदर योजनेसाठी आणलेल्या रोहित्राची क्षमताच मुळी ६५ केव्हीची असते असा समिती समोर खुलासा केला.

पाणीपुरवठा योजना तयार झाल्यानंतर त्यांना जर २ वर्षे त्यांना वीज जोडणी मिळत नसेल तर ही बाब निश्चितपणे उचित नाही. त्यास्तव पाणीपुरवठा विभागाने त्याची कार्यवाही करावी, या समितीच्या अभिप्रायावर या योजनेसाठी सुधारित अंदाजपत्रक मंजूर करावे लागेल, असा विभागीय सचिवांनी समिती पुढे खुलासा केला. सुधारित अंदाजपत्रकाला मान्यता घेऊन पाणीपुरवठा विभाग किती दिवसात ही योजना कार्यान्वित करणार आहे, अशी समितीने पृच्छा केली, त्यावर विभागीय सचिवांनी पावसाळ्यामुळे माहे मार्च, २०१२ पर्यंत ही योजना कार्यान्वीत होऊ शकणार नाही. तथापि, विभागीय आयुक्तांच्या स्तरावर याबाबत बैठक घेण्यात येईल असे प्रतिपादन केले.

सुधारित अंदाजपत्रकाला मान्यता द्यावी या समितीच्या सुचनेवर या विभागीय सचिवांनी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कामे लवकर करीत नाही ही बाब समिती समोर मांडली, समितीने त्यावर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या अधिकाऱ्यांशी या संदर्भात पत्रव्यवहार केल्यास ते ८ दिवसात कामे पूर्ण करुन देतील. या समितीच्या विधानावर विभागीय सचिवांनी त्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येईल असे समिती समोर स्पष्ट केले आणि त्यासाठी १५ कि.मी. लांबीहून रोहित्र आणावे लागेल व हे काम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून माहे डिसेंबर, २०११ पर्यंत होणे शक्य नाही असा अंदाज समिती समोर व्यक्त केला. कोकणात लहान लहान गांवे आहेत तेथे सौर उर्जा सुरु करण्याच्या

समितीच्या सूचनेवर विभागीय सचिवांनी येथे हेड जास्त असतात अशी समितीस माहिती दिली. प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी हे ग्राऊंड लेव्हल असल्याने या ठिकाणी हेड जास्त असतात या केलेल्या खुलाशानुसार, ते काम लवकरात लवकर पुर्ण करावे जेणेकरुन, सामान्यांना उपयोग होईल अशी समितीने केलेली सुचना विभागीय सचिवांनी मान्य केली.

समितीने घेतलेल्या वरील विभागीय साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी आश्वासीत केल्यानुसार जिल्हा परिषदेने खालील प्रमाणे कार्यवाही केल्याबाबत समितीस कळवीले आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडील ६८ नळपाणी पुरवठा योजनांना वीज जोडण्या अप्राप्त होत्या, त्यापैकी ५५ योजनांना वीज जोडण्या देण्यात आल्या असून, पाणी पुरवठा सुरळीत चालू आहे. उर्वरित १३ योजनांपैकी ४ योजनांच्या निविदा जास्त किंमतीच्या असल्याने जिल्हा परिषदेचे पत्र क्र. रजिप/ग्रापापु/ओएस-१/४१४८/दि.२२/०६/२०११ अन्वये प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना वीज कंपनीचे दरपत्रक सादर केलेले आहे. शिल्लक नळ योजनांपैकी तुळसवडे गराटेवाडी ता.राजापूर नळ पाणी पुरवठा योजनेला वीज जोडणी प्राप्त झाली असून पाणी पुरवठा सुरळीत चालू आहे व उर्वरित ८ योजनांचे काम प्रगतीपथावर आहे.

साखरी नळपाणी पुरवठा योजना ता.मंडणगड येथील योजनेवर वीज जोडणीसाठी रक्कम रुपये ८,३७,९५०/- इतक्या किंमतीची निविदा प्राप्त झाली होती. त्यानुसार दि.२७/०६/२०१० रोजी सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, मंडणगड यांच्या समवेत निविदा कमी होणेसाठी प्रत्यक्ष जागा तपासणी करण्यात आली. त्यांनी केलेल्या फेर सर्वेक्षणानुसार व दि.१/७/२०११ रोजी प्रत्यक्ष त्यांच्या कार्यालयात चर्चा झाल्यानुसार रक्कम रुपये ५,०३,०००/- ची निविदा मंजूरीसाठी सादर केली असल्याचे सांगण्यात आले. त्यानुसार साखरी नळपणी पुरवठा योजनेची अंदाजित रक्कम रुपये ३०,१९,९०२/- असल्याने त्याचे १५ टक्के रक्कम रुपये ४,६०,०००/- होत आहे. उर्वरित रक्कम सादील अनुदानातून खर्च टाकल्यास सदर योजनेचे काम करुन घेणे शक्य आहे. सदर योजनेचे सुधारित अंदाजपत्रक १५ टक्के मध्ये बसत असल्याने सुधारीत अंदाजपत्रक मंजूर करून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

अभिप्राय व शिफारशी :

समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेस भेट देऊन घेतलेल्या माहितीमध्ये, जिल्ह्यातील एकूण ५२ वाड्यांमध्ये १५१ पाणीपुरवठा योजना तयार असून, त्या सर्व वीज जोडणी अभावी अपूर्ण आहेत. त्यापैकी १२४ योजनांसाठी वीज जोडणी निविदा प्राप्त असून ७८ योजनांचा अहवाल महाराष्ट्र राज्य वितरण कंपनीकडे जिल्हा परिषदेकडून पाठविण्यात आलेला नाही. जिल्हा परिषदेकडून याचा तपासणी अहवाल प्राप्त न झाल्याने त्या योजना वीज जोडणी अभावी बंद आहेत. लांजा तालुक्यातील मठ-गांगरकर वाडीची योजना तपासणी अहवालानंतर कार्यान्वीत करण्यात येणार आहे.

सदर योजना त्यांचे अंदाजपत्रक पाणी पुरवठा योजनेच्या रक्कमे एवढे आहे अशी समितीस माहिती प्राप्त झाली. समितीने सर्व पाणी पुरवठा योजनांना १५ दिवसांत वीज जोडण्या द्याव्यात असे निदेश भेटीच्या वेळी दिले.

समितीने साक्षीच्या वेळी घेतलेल्या माहितीत, जिल्हा परिषदेकडून प्राप्त लेखी माहितीत जिल्हा परिषद व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांच्या आयोजित संयुक्त बैठकीत, त्यापैकी ६८ योजनांना वीज जोडण्या देण्याचा निर्णय घेण्यात आला, त्यापैकी ५५ योजनांना वीज जोडण्या देण्यात आल्या, उर्वरित १३ योजनांपैकी ९ योजना तातडीने कार्यान्वीत करण्याचे प्रयत्न सुरु आहेत व ४ योजनांची अंदाजपत्रके सुधारीत करण्याची कार्यवाही सुरु आहे, तसेच पाणी पुरवठा व स्वच्छता विभागानेही ९ प्रलंबित योजनांपैकी, एका योजनेचे देयक जिल्हा परिषदेने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास सादर केलेले आहे असेही समितीच्या निदर्शनास आणून दिले.

साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी वीज वितरणाचे अंदाजपत्रक पाणी पुरवठा योजनेच्या अंदाजपत्रकाएवढे असल्याने, तेथे रोहित्र बसवावे लागेल काय, याची तपासणी करण्याबाबत तसेच जिल्हा परिषदेस १५-२० के.व्ही. भाराची गरज असताना ६५ के.व्ही. भाराचे रोहित्र बसवावे लागते, त्यामुळे १५-२० के.व्ही. भाराचे देयक जिल्हा परिषदेने आणि उर्वरित भाराचे देयक वीज मंडळाने भरावे अशी भूमिका मांडली.

पाणी पुरवठा योजना तयार होऊन जर दोन वर्षे वीज जोडणी मिळणार नसेल तर त्याची पुढील कार्यवाही पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने करावी, या समितीच्या अभिप्रायावर विभागीय सचिवांनी त्यासाठी सुधारित अंदाजपत्रक तयार करावे लागेल व त्यामुळे ही कार्यवाही पावसाळ्यामुळे माहे मार्च, २०१२ पूर्वी पुर्ण होवू शकणार नाही व यासाठी विभागीय सचिवांना विभागीय आयुक्त स्तरावर बैठक बोलवावी लागेल असे सांगितले तसेच सुधारित अंदाजपत्रकास मान्यता घेतली तरी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ लवकर कामे पूर्ण करीत नाही ही बाब विभागीय सचिवाकडून समितीसमोर स्पष्ट करण्यात आली.

समितीच्या मते, पाणी ही स्थानिक जनतेची मूलभूत गरज असते. पाणी पुरवठा योजना तयार होवूनही त्यास दोन वर्षे वीज जोडणी देण्यात येवू नये हे उचित नाही. तसेच ग्रामिण भागातील पाणी पुरवठा योजना कार्यक्षमतेने कार्यान्वित होण्यासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तसेच उर्जा विभागामध्ये समन्वय असणे अत्यंत आवश्यक आहे.

सबब, **समिती शिफारस करते की, लांजा तालुक्यातील मठ-गांगरकरवाडी यासह उर्वरित पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्यासाठी योजनांसाठी आवश्यकता असेल अशा योजनांसाठी सुधारित अंदाजपत्रक तयार करुन त्यास तात्काळ मान्यता घेण्यात यावी. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तसेच उर्जा विभाग यांच्या समन्वयाने उक्त योजनांना लवकरात लवकर वीज जोडण्या देण्यात याव्यात, जेणेकरुन सदर योजना कार्यान्वित होवून स्थानिक नागरिकांची पाण्याची गरज पूर्ण होईल.**

समितीच्या निदर्शनास आले की, नळपाणी पुरवठा योजनेला १५-२० के.व्ही. भाराची गरज असते तथापि, रोहित्र ६५ के.व्ही. भाराचे असल्याने ६५ के.व्ही. भाराचे देयक जिल्हा परिषदेस भरावे लागते. **सबब, समिती शिफारस करते की, जिल्हा परिषदेतर्फे पाणी पुरवठा योजनांसाठी वापरल्या जाणाऱ्या विजभारा एवढेच देयक त्यांच्याकडून**

घेण्यात यावे. तथापि, त्यामध्ये विज वितरण कंपनीस अडचणी असल्यास स्थानिक गरज व व्यवहार्यता विचारात घेवून दोन्ही विभागांच्या सामोपचाराने यातून मार्ग काढण्यात यावा.

समिती अशीही शिफारस करते की, उक्त अपूर्ण योजनांची कामे प्राथम्याने पूर्ण करुन सदर योजना माहे मार्च-एप्रिल, २०१२ पर्यंत पूर्ण क्षमतेने कार्यान्वीत करण्यात याव्यात. तसेच समितीने केलेल्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्यात देण्यात यावी.

समितीने गाव पातळीवर पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत करताना ती विनाविलंब कार्यान्वीत होण्यासाठी पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग तसेच उर्जा विभाग यांच्यात समन्वय असण्याची आवश्यकता समितीने प्रतिपादन केली जल उर्जेची उणीव भरुन काढण्यासाठी कोकणात प्रायेगिक तत्वावर सौर उर्जा योजना अंमलात आणण्याबाबत चाचपणी करावी व त्याची कार्यक्षमता व काटकसर तपासुन नंतर त्या योजनेची राज्यात टप्या टप्याने अंमलबजावणी करावी अशी समितीची शिफारस आहे.

प्रकरण एक - दोन

रत्नागिरी, जिल्हा परिषद

ग्रामपंचायतीचे लेखापरिक्षण

समितीने जिल्हा परिषद, रत्नागिरी येथे दिनांक ४ जून, २०१० रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी जिल्ह्यातील काही ग्रामपंचायतींचे लेखा परिक्षण गेल्या ३ वर्षांपासून तसेच पंचायत समित्यांचे लेखा परिक्षण सन २००५-२००६ नंतर झालेले नाही असे समितीच्या निदर्शनास आले.

समितीस त्याबाबत माहिती देताना प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत अधिनियमानुसार तसेच स्थानिक निधी फंड अधिनियमानुसार ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण स्थानिक लेखा कार्यालयाकडून करण्यात येते. जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या यांचे लेखा परिक्षण जसे दरवर्षी करण्यात येते, त्याप्रमाणे ग्रामपंचायतींचेही लेखा परिक्षण दरवर्षी झाले पाहिजे परंतु, ते तसे होत नाही असे सांगितले. सन २००६-२००७ नंतर ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण झालेले नाही. अनेक वेळा ग्रामसेवकांची बदली झालेली असते. त्यानंतर लेखापरीक्षण होते त्यावेळी लेखापरीक्षकांनी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबतची कागदपत्रे नवनियुक्त ग्रामसेवक दाखवू शकत नाहीत. जुन्या पावत्या त्यांना सापडत नाहीत. त्याचप्रमाणे मागील ग्रामसेवकाच्या काळात झालेल्या कामांबाबतचा नेमका खुलासा नवनियुक्त ग्रामसेवक करुन शकेल, अशी परिस्थिती नसते, दरवर्षी लेखापरीक्षण न झाल्यामुळे अपहार, गैरव्यवहार, नियमबाह्य कामे याबाबतची प्रकरणे ३-४ वर्षानंतर उघडकीस येतात. तोपर्यंत ग्रामसेवकांची बदली झालेली असते किंवा ते सेवानिवृत्त झालेले असतात तर काही दोषी ग्रामसेवकांचे निधनही झालेले असते, त्यामुळे ज्याप्रमाणे जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचे लेखापरीक्षण दरवर्षी केले जाते त्याप्रमाणेच ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण देखील दरवर्षी करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही वरिष्ठ पातळीवर व्हावी अशी त्यांनी समिती समोर विनंती केली व समितीने त्याबाबत शासनास शिफारस करण्याचे मान्य केले.

समितीने जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी समितीस प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ३ मे, २०११ रोजीच्या आयोजित साक्षीच्या वेळी समितीने जिल्हा परिषदेकडून खालील मुद्यांची माहिती मागविण्यात आली.

१. ग्रामपंचायतीचे लेखापरिक्षण दरवर्षी करण्याबाबत कोणत्या अडचणी आहेत, सदर अडचणीचे निवारण करण्याबाबत शासनाने काही उपाययोजना केल्या आहेत काय, नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

२. लेखापरिक्षणास उशिर झाल्यामुळे त्याचे प्रतिकुल परिणाम नंतरच्या कालावधीत लेखापरिक्षण करताना होतात. याबाबत विभागाचे काय अभिप्राय आहेत.

जिल्हा परिषदेने उपरोक्त मुद्यांबाबत समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती पुरविली.

पत्र क्र.रजिप/साप्रवि/ग्रा.प./कार्या-६/१४०८/११ दिनांक२१ एप्रिल, २०११ ने विचारणा केली असता याबाबत उप मुख्य लेखा परिक्षक कार्यालयाकडून पत्र क्र.स्था. १८/ब/ग्रा.प./ले.प.रत्ना/११/७५५ दिनांक २५ एप्रिल, २०११ ने दिलेल्या उत्तरात जिल्ह्यातील ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण करणे कामी पुरेसे मनुष्य बळ उपलब्ध न झालेमुळे लेखा परिक्षणाचा ताण पडू शकतो. तसेच एखाद्या ग्रामसेवकाची बदली अथवा सेवानिवृत्ती झाल्यास लेखा परिक्षणास आवश्यक असणाऱ्या बाबीची पुर्तता होणेस विलंब होऊ शकतो असे कळविण्यात आलेले आहे.

लेखा परिक्षणास उशिर झाल्यामुळे त्यापुढील कालावधीचे लेखा परिक्षण देखील प्रलंबित राहते.

विभागीय सचिवांची साक्ष :

जिल्हा परिषदेकडील वरील प्राप्त माहितीच्या आधारे समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली त्यावेळी समितीसमोर खुलासा करताना, सध्या लेखा परिक्षकांची पदे कमी आहेत. लेखा परिक्षक तालिका वाढवून घेण्यासंदर्भात मुख्य सचिवांच्या स्तरावर चर्चा झाली होती. ग्रामपंचायतीचे लेखेजोखे पूर्ण नसणे किंवा ग्रामसेवकांकडून लेखापरिक्षणासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे सादर न होणे याबाबत विभागाने एक परिपत्रक निर्गमित केले होते. त्या परिपत्रकानुसार ८-१० दिवसांत ग्रामसेवकाने लेखापरिक्षणासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाहीत, तर त्याला निलंबित करुन, त्या ग्रामपंचायतीचा कार्यभार दुसऱ्या ग्रामसेवकाकडे देण्याची कार्यवाही केली जाणार आहे, असा समिती समोर साक्षीच्या वेळी खुलासा केला. तसेच समितीने बैठकीमध्ये ज्या दोन-तीन सूचना केल्या होत्या, त्या सूचनांच्या अनुषंगाने विभागाने घेतलेल्या निर्णयाचा चांगला परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. लेखापरिक्षकांना तालिकेवर ठेवावयाचे झाल्यास त्यांना किती रक्कम द्यावी लागेल या संदर्भातील नस्ती वित्त विभागाकडे पाठविण्यात आलेली आहे. शिवाय १३ व्या वित्त आयोगात, "ग्रामपंचायतीचे लेखापरिक्षण पूर्ण नसेल तर त्या ग्रामपंचायतीला १३ व्या वित्त आयोगातून पूर्ण पैसे मिळणार नाहीत" अशी अट घालण्यात आल्याची समितीस विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी माहिती दिली.

अभिप्राय व शिफारशी :

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १४२ क नुसार जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचे नियमित लेखा परिक्षण करण्याची तरतुद आहे. तथापि, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मध्ये ग्रामपंचायतींचे लेखा परिक्षण करण्याबाबतची तरतुद नसून त्याखाली करण्यात आलेल्या महाराष्ट्र ग्रामपंचायत (हिशेब तपासणी) नियम, १९६१ मधील नियम ७ (एक) नुसार हिशेब तपासनिसाने वर्षातून साठ ग्रामपंचायतीची तसेच पोट नियम (दोन) नुसार जिल्ह्यातील सर्व पंचातींच्या हिशेब तपासणी पाच वर्षाच्या कालावधीत पूर्ण केली पाहिजे अशी तरतुद आहे.

तथापि, सदर तरतुद ग्रामपंचायत अधिनियमात केलेली नसल्यामुळे, ग्रामपंचायती नियमातील तरतुद आवश्यक त्या गांभीर्याने घेत नाहीत, त्यामुळे शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीचा केलेला विनियोग योग्यप्रकारे झाला आहे काय, त्याचा वापर पुर्णांशाने झाला आहे काय, याची शासन स्तरावर शहानीशा होत नाही, त्यामुळे तेथे अनियमितता व भ्रष्टाचार यास प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या खतपाणी घातल्यासारखे झालेले आहे. ग्रामपंचायतीच्या लेख्यांचे

परिक्षण जिल्हा परिषदा वा पंचायत समित्यांप्रमाणे नियमितरित्या होत नाही त्यामुळे ग्रामसेवकाने त्यांच्या कार्यकाळात केलेला भ्रष्टाचार वा अनियमितता विलंबाने उघडकीस येत असल्यामुळे, दोषी ग्रामसेवकांची बदली होते, निवृत्त होतात वा ते मयत होत असल्यामुळे त्यांच्या विरुद्ध आवश्यक कारवाई प्रलंबीत रहाते असे समितीचे स्पष्ट मत झालेले आहे.

त्यास्तव ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण जिल्हा परिषदा वा पंचायत समित्यांप्रमाणे होण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समित्यांप्रमाणे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मध्ये सुधारणा होणे गरजेचे आहे अशी समितीची धारणा झाली आहे.

अतः **जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांप्रमाणेच राज्यातील ग्रामपंचायतींचे लेखा परिक्षण नियमितरित्या होऊन त्यांच्या कारभारात नियमितता, सुसुत्रता व पारदर्शकता येण्यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाप्रमाणेच मुंबई ग्रामपंचायत अधिनियमामध्ये ग्रामपंचायतींच्या लेखा परिक्षणाबाबत तातडीने सुधारणा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.**

समितीच्या निदर्शनास आले की, तेराव्या वित्त आयोगाचा निधी उपलब्ध होण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतीचे लेखापरिक्षण केलेले असणे आवश्यक असण्याची अट शासनाने घातली आहे. समिती याबाबत समाधान व्यक्त करते.

लेखापरिक्षकांना तालीकेवर ठेवण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे प्रलंबित असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. **सबब, समिती शिफारस करते की, ग्रामविकास विभागाने सदर प्रस्तावाचा वित्त विभागाकडे वेळोवेळी पाठपुरावा कारावा तसेच वित्त विभागानेही या प्रस्तावास लवकरात लवकर मान्यता देण्याची कार्यवाही करावी.**

समिती अशीही शिफारस करते की, शासनाने उक्त शिफारशींवर केलेल्या कार्यवाहीची माहिती दोन महिन्यात समितीस अवगत करावी.

प्रकरण दोन - एक

जिल्हा परिषद, सातारा

राज्यातील डोंगरी भागातील शाळांची तपासणी व कुपोषित विद्यार्थ्यांना पुरक आहार व वैद्यकीय मदत देण्याबाबत :-

पंचायती राज समितीने दिनांक १५ ते १७ जून, २०१० या कालावधीत जिल्हा परिषद, सातारा येथे भेट दिली.

समितीने **पंचायत समिती, सातारा येथे दिनांक १६ जून, २०१० रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी u पंचायत समितीकडून खालील मुद्यांची माहिती घेतली.**

सन २००५-२००६ मध्ये शिक्षण विस्तार अधिकारी यांनी नियमानुसार किती शाळांना भेटी देऊन तपासणी करणे आवश्यक होते,

प्रत्यक्षात त्यांनी किती शाळांना भेटी दिल्या व किती शाळांची तपासणी केली,

उक्त तपासणीमध्ये कोणते दोष व त्रुटी आढळून आल्या व त्यांचे निराकरण कशा प्रकारे करण्यात आले ?

भेटीच्या **वेळी समितीस पंचायत समितीकडून वरील मुद्यांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

या विकास गटाकडे सन २००५-२००६ मध्ये शिक्षण विस्तार अधिकारी संवर्गाची एकूण ८ पदे मंजूर होती, त्यापैकी २ बीटची पदे पूर्णवेळ, ३ बीटची पदे ४ महिन्यांसाठी व १ बीटचे पद २ महिन्यांसाठी कार्यरत होते आणि २ पदे रिक्त होती.

त्यांनी नियमानुसार २५५ जिल्हा परिषद शाळांना वर्षातून किमान प्रत्येकी ३ याप्रमाणे ७६५ शाळाभेटी आणि प्रत्येक बीटातील एकूण शाळांच्या १० टक्के म्हणजेच विकास गटातील किमान २६ शाळा याप्रमाणे तपासणी करणे आवश्यक होते.

त्यांनी ६६० शाळांना भेटी दिल्या असून ६७ शाळांची तपासणी केलेली आहे.

उक्त तपासणी मध्ये खालील दोष व त्रुटी आढळून आल्या.

तपासणीतील दोष	१. प्रतवारी पुस्तिकेतील त्रुटींची पूर्तता वेळेत न होणे. २. दैनंदिन टाचण काढण्यामध्ये अनियमितता दिसून आली. ३. काही शाळांमधील मुख्याध्यापकांचे उपशिक्षकांवर नियंत्रण कमी दिसून आले.
तपासणीतील त्रुटी	१. अप्रगत विद्यार्थी आढळले. २. शिक्षकांकडून प्रयोग साहित्याचा वापर कमी आढळला. ३. विहित क्षमता सर्व विद्यार्थ्यांमध्ये प्राप्त झालेल्या नसल्याचे आढळले.
उक्त दोष व त्रुटीचे निराकरण (उपाय योजना)	१. प्रतवारी पुस्तिकेतील त्रुटींची सुधारणा करण्याबाबतच्या सूचना दिल्या. २. उपशिक्षकांवरील नियंत्रणासाठी, मुख्याध्यापकांचे उद्‌बोधन करण्यात

	आले. ३. अप्रगत विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत जादा तास घेण्याबाबतच्या सूचना दिल्या. ४. प्रभावी अध्यापनासाठी, केंद्र स्तरावर शैक्षणिक साहित्य निर्मिती व मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन केले.

उपरोक्त लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने पंचायत समितीस दिलेल्या भेटीच्या वेळी विस्तार अधिकाऱ्यांनी सन २००५-०६ मध्ये ७६५ शाळांना भेटी देणे आवश्यक असतांना ६६० शाळांना भेटी दिल्या आणि ६७ शाळांची तपासणी केली, अशी गट विकास अधिकाऱ्यांनी समितीस माहिती दिली.शाळेत गेल्यानंतर त्यांच्याकडून कोणकोणत्या बाबीची तपासणी केली जाते, सहावी आणि सातवी इयत्तेच्या विद्यार्थ्यांना पाढे आणि बाराखडी येत नाही आणि या पंचायत समिती कार्यक्षेत्रातील इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यांना किती पाढे येतात, अशी समितीने पुढे विचारणा केली असता, गट शिक्षण अधिकारी यांनी, त्यांना ३० पर्यंत पाढे येतात असा समितीसमोर खुलासा केला.

अप्रगत विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी काय प्रयत्न करण्यात आले आहेत, या समितीच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगण्यात आले की, जे कुपोषित विद्यार्थी असतात त्यांची खाजगी रुग्णालयाच्या मदतीने आरोग्य तपासणी करण्यात येते. त्यांच्या पालकांचे नियमितपणे मेळावे घेण्यात येतात. त्यांना केळी व लाडू तसेच सोयाबीनयुक्त शालेय पोषण आहार देण्यात येतो, त्यामुळे ५० टक्के मुलांमध्ये फरक आढळून आला आहे. याव्यतिरिक्त अप्रगत विद्यार्थ्यांसाठी सकाळी व संध्याकाळी जादा तास घेण्यात येतात. त्यामुळे शैक्षणिक प्रगती दिसून आली आहे. असे विस्तार अधिकारी (शिक्षण) यांनी उत्तर दिले.

डॉक्टरांकडून कोणती दक्षता घेण्यात येते, बाह्य रुग्ण दवाखान्यांची संख्या किती आहे, या समितीच्या प्रश्नास, आठ प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी चार ठिकाणी ७० ते ८० बाह्यरुग्ण दवाखाने होते, उर्वरित चार प्राथमिक आरोग्य केंद्रे डोंगराळ भागात असल्यामुळे बाह्यरुग्ण दवाखाने कमी आहेत. तसेच रक्तक्षय असलेल्या विद्यार्थ्यांवर उपचार केले जातात, असे उत्तर तालुका आरोग्य अधिकारी यांनी समितीस भेटीच्या वेळी दिले. गट शिक्षणाधिकारी नियमितपणे भेटी देतात काय, यावर ५० टक्के शाळांना भेटी दिल्या आहेत, असे विस्तार अधिकारी (शिक्षण) यांनी उत्तर दिले. शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची u रिक्त चार पदे ही पदोन्नतीने भरावयाची आहेत. असे जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. त्यावर समितीने सदर रिक्त पदे लवकरात लवकर भरण्यात यावीत, असे सुचित केले त्यावेळी, भरती प्रक्रिया पूर्ण झालेली असून यादी तयार करण्यात आली आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीसमोर स्पष्ट केले.

समितीने दोन शाळांना भेटी दिल्या होत्या, त्यावेळी विद्यार्थ्यांना पाढे तसेच बाराखडीसुद्धा म्हणता आली नाही, यावरुन शिक्षकांचे विद्यार्थ्यांकडे पुरेसे लक्ष नाही. तसेच शिक्षणासाठी पुरेसा निधी दिला जातो, परंतु त्या निधीचा उपयोग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी होत नसल्याचे दिसुन येत आहे. केवळ शाळांना रंग देणे आणि दुरुस्तीची कामे करणे यासाठीच हा निधी खर्च होत आहे, असा समितीने निष्कर्ष काढला तर तो चूकीचा ठरु नये. वास्तविक, या

निधीचा वापर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी होणे गरजेचे आहे, आणि त्याकडे जे शिक्षक दुर्लक्ष करतील त्यांच्याविरुद्ध कारवाई केली पाहिजे. बरेचसे शिक्षक मुख्यालयी राहत नाहीत याकडे देखील संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष दिले पाहिजे. या समितीच्या भेटीच्या वेळी व्यक्त केलेल्या अभिप्रायावर समितीस आवश्यक खुलासा प्राप्त झाला नाही. डोंगराळ भागातील शाळेतील कुपोषित विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य अभियानामधून पूरक पोषण आहार आणि गंभीर स्वरुपाचा आजार असलेल्या विद्यार्थ्यांसाठी निधी देण्याबाबत शासनाची भूमिका स्पष्ट होण्यासाठी ग्रामविकास आणि शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांची साक्ष घेणे आवश्यक आहे असे समितीने भेटीच्या वेळी स्पष्ट केले.

गट **विकास अधिकारी यांनी क्र.पंससा/सां/पंरास/६/१५/१० दिनांक १५ जून, २०१० रोजीच्या पत्रान्वये समितीस खालील सुधारित माहिती दिली.**

त्यांनी नियमानुसार २५५ जिल्हा परिषद शाळांना वर्षातून किमान प्रत्येकी ३ वेळा या प्रमाणे ७६५ भेटी आणि प्रत्येक विस्तार अधिकारी यांच्या बीटातील १० शाळा म्हणजे विकास गटातील किमान ८० शाळा याप्रमाणे तपासणी करणे आवश्यक होते.

डोंगरी भागातील अंगणवाडी व प्राथमिक शाळेमधील कुपोषित तसेच हृदयरोग, कर्करोग व इतर गंभीर आजार असलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्राथमिक शिक्षण विभाग, आरोग्य विभाग व एकात्मिक बाल विकास योजना यांच्या सहकार्याने खालील प्रमाणे उपाययोजना करीत आहे.

१. अंगणवाडी विद्यार्थ्यांना शासनाने ठरवून दिलेल्या मानकानूसार दररोज पूरक पोषण आहार दिला जातो.

२. प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना दररोज

अ) इयत्ता १ ली ते ५ वी करीता दररोज प्रति विद्यार्थी १०० ग्रॅम तांदूळाचा भात व कडधान्ये, भाज्या इ. शिजवून पोषण आहार दिला जातो.

ब) इयत्ता ६ वी ते ८ वी करीता दररोज प्रति विद्यार्थी १५० ग्रॅम तांदूळ व इतर साहित्य यातून पोषण आहार दिला जातो. त्यामध्ये मसूर डाळ आमटी, मुगडाळ, आमटी, हरभरा, वाटाणा व इतर फोडणीच्या पदार्थांचा समावेश करण्यात आलेला आहे.

३. जे-जे विद्यार्थी हृदयरोग, कर्करोग यांनी आजारी आहेत. त्यांना आरोग्य विभागाच्या राष्ट्रीय ग्रामिण विकास मिशन अभियान व जीवनदायी योजनेतून शस्त्रक्रिया व इतर सर्व मदत या विभागामर्फत करण्यात येत आहे.

४. जे विद्यार्थी अपंग आहेत, तसेच अस्थिव्यंग, कर्णबधीर, डोळ्याचा तिरळेपणा, ओठ वाकडे इ.व्यंगे असलेल्या विघ्यार्थ्यांवर सर्व शिक्षा अभियानातून आत्तापर्यंत ९४६ इतक्या शस्त्रक्रीया करण्यात आलेल्या आहेत. तसेच दरवर्षी शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करुन ज्या-ज्या विद्यार्थ्यांना गरज असेल त्याप्रमाणे त्यांच्यावर शस्त्रक्रीया केली जाते. आत्तापर्यंत सर्व शिक्षा अभियानामधून चष्मे, श्रवणयंत्र, कृत्रिम पाय, कॅलीबर, तीन चाकी सायकली इ.चा गरजेनुरुप विद्यार्थ्यांना लाभ दिलेला आहे.

वरीलप्रमाणे शिक्षण विभाग, प्राथमिक जिल्हा परिषद सातारा सदर डोंगराळ भागातील कुपोषित, अपंग व विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांची काळजी घेत आहे.

समितीस साक्षीच्या वेळी सार्वजनिक आरोग्य विभागाकडुन खालील आश्वासित माहिती प्राप्त झाली

राज्यातील डोंगराळ भागातील कुपोषित विद्यार्थ्यांकरीता राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानेंतर्गत कुठलाही निधी अथवा योजना उपलब्ध नाही. तसेच या विद्यार्थ्यांच्या हृदयरोग, कर्करोग व इतर गंभीर आजारासाठीही राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत कुठलाही निधी अथवा योजना उपलब्ध नाही. शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रमांतर्गत विद्यार्थांची तपासणी होऊन त्यांना किरकोळ आजारावर शाळेत औषधोपचार करण्यात येतात व कार्यक्रमांतर्गत हृदयरोग, कर्करोग व इतर गंभीर आजार आढळलेल्या विद्यार्थांना जीवनदायी योजने अंतर्गत संदर्भित केले जाते.

समितीने **भेटीच्या वेळी प्राप्त महितीच्या अनुषंगाने दिनांक ६ जुलै, २०११ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेतली.**

राज्यातील डोंगराळ भागातील शाळेत शिकणाऱ्या कुपोषित विद्यार्थ्यांना राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य अभियानामधून पुरक पोषण आहार तसेच हृदय रोग, कर्करोग व इतर गंभीर आजार असलेल्यांना उपचारार्थ तातडीची मदत देण्याबाबत शासनाची काय भुमिका आहे, अशी समितीने साक्षीच्या वेळी सचिव, शालेय शिक्षण विभाग यांच्याकडे विचारणा केली असता, त्यांनी अंगणवाडी विद्यार्थ्यांना शासनाने ठरवून दिलेल्या मानकानुसार दररोज पूरक पोषण आहार दिला जातो. प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ली ते ८ वी मध्ये शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांपैकी इयत्ता १ ली ते ५ वी मध्ये शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यास दररोज प्रति विद्यार्थी १०० ग्रॅम तांदळाचा भात व कडधान्ये, भाज्या इ. शिजवीलेला पोषण आहार दिला जातो. तर, इयत्ता६ वी ते ८ वी मध्ये शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यास १५० ग्रॅम तांदूळ व इतर साहित्य यातून पोषण आहार दिला जातो. त्यामध्ये मसूर डाळ आमटी, मुग डाळ आमटी, हरभरा, वाटाणा व इतर फोडणीच्या पदार्थांचा समावेश असतो. तसेच, या शाळांतील विद्यार्थ्यांची सार्वजनिक आरोग्य केंद्रामधून तपासणी करण्यात येते. यावेळी एखाद्या विद्यार्थ्यांवर उपचार करणे आवश्यक असल्यास त्याला उपचारासाठी सार्वजनिक आरोग्य केंद्र किंवा नागरी रुग्णालयात पाठविले जाते. कर्करोग व हृदय रोग अशा प्रकारच्या आजाराने ग्रस्त मुलांवर आरोग्य विभागाच्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान व जीवनदायी योजनेतून शस्त्रक्रिया व इतर सर्व मदत करण्यात येते. अशा मुलांची संख्या १४३ इतकी आहे. तर आता हृदय रोगाने आजारी असलेल्या १४८ मुलांबाबत करावयाच्या उपचाराचा प्रस्ताव आरोग्य विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे, या मुलांवर पुढे काय उपचार करण्यात आले, अशी समितीने पृच्छा केली असता, राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य अभियाना अंतर्गत दरवर्षी राज्यामध्ये डोंगरी भागातील अंगणवाडी व प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जाते. एखादा विद्यार्थी आजारी असेल तर त्याच्यावर औषधोपचार केला जातो. तपासणीमध्ये एखाद्या विद्यार्थ्यास गंभीर आजार आढळून आला तर, त्याला त्याच्या आजाराशी संबंधित रुग्णालयात दाखल केले जाते. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान व जीवनदायी योजनेमधून जिल्हा परिषदेतील शाळांतील विद्यार्थ्यांवर सर्व उपचार व शस्त्रक्रिया मोफत केल्या जातात. तसेच या योजने अंतर्गत या जिल्ह्यात सन २००९-२०१० मध्ये ४१५३१५ पैकी ४०१८४५ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यापैकी ९०४५ विद्यार्थ्यांना गंभीर आजार असल्याचे आढळून आल्याने त्यांना संबंधित रुग्णालयात पाठविण्यात आले. त्यापैकी ६३ विद्यार्थ्यांवर हृदय शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. तर १४८ विद्यार्थ्यांच्या आजाराचा एकत्रीत प्रस्ताव जिल्हा

परिषदेने आरोग्य विभागाकडे मंजुरीसाठी पाठविलेला आहे. त्यास मंजुरी मिळाल्यानंतर त्यांच्यावर आवश्यक ते उपचार करण्यात येतील असे सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस उत्तर दिले.

समितीने सन २००५-२००६ मध्ये हृदयरोगग्रस्त १४३ विद्यार्थ्यांवरील उपचाराबाबत घेतलेल्या माहितीत, ज्यांच्या बाबतीत हृदय रोग व कर्करोगाचे निदान करण्यात आले होते त्यांच्यावर राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानामधून उपचार करण्यात आले आहेत. सन २००८-२००९ मध्ये ९७ विद्यार्थी हृदय शस्त्रक्रियेसाठी शोधण्यात आले. त्यापैकी ८७ विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया करण्यात आली, त्यानंतर आता १४८ विद्यार्थ्यांचा प्रस्ताव विभागाकडे आलेला आहे असे सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस सांगितले.

जीवनदायी योजने अंतर्गत आरोग्य अधिकाऱ्याला विद्यार्थ्यांना उपचारासाठी रुग्णालयात पाठविण्याचे अधिकार आहेत काय, असल्यास, सदर प्रस्ताव विभागाकडे येण्याचे काय कारण आहे, या समितीने विचारलेल्या प्रश्नास, मागे नागपूर जिल्हयात अशा प्रकारची ५०० प्रकरणे आढळून आल्याने तेथील अनुषेश दूर करण्यासठी माहे डिसेंबर मधील नागपूर अधिवेशनामध्ये फक्त नागपूर जिल्ह्यासाठी यासाठी विशेष पॅकेज जाहीर करण्यात आले होते. त्याच धर्तीवर सातारा जिल्ह्याला देखील विशेष पॅकेज हवे असल्याने सदर प्रस्ताव शासन स्तरावर मंजुरीसाठी आलेला आहे असे सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीला उत्तर दिले व याबाबतीत शासनाची भूमिका देखील सकारात्मक आहे, असेही समितीने साक्षीच्या वेळी स्पष्ट केले.

सन २००२-२००३ मधील १४८ विद्यार्थ्यांचा प्रस्ताव मंजुरीसाठी विलंबाने आल्याबाबत समितीने पृच्छा केली त्यावेळी, सन २००८-२००९ पर्यंतची प्रकरणे पूर्ण झालेली आहेत आणि १४८ प्रकरणे सन २००८-२००९ नंतरची आहेत व ही प्रकरणे जर जीवनदायी योजनेमधून करावयाची असतील तर त्यास कालमर्यादा नसते तथापि, जिल्हा परिषदेने विशेष पॅकेजची मागणी केलेली असल्याने त्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी आरोग्य विभागाकडे आलेला आहे, असे सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीसमोर स्पष्ट केले.

हृदय विकाराने आजारी असलेल्या ९७ विद्यार्थ्यांपैकी ८४ विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रीया करण्यात आली. बाकीच्या मुलांच्या बाबतीत काय उपचार करण्यात आले, अशी समितीने विचारणा केली असता, बऱ्याच वेळेला हृदयरोगाचे निदान झाल्यानंतर काही प्रकरणात अंतिम अभिप्रायाच्या वेळी शस्त्रक्रियेची आवश्यकता नाही असे निष्पन्न होते. २-३ विद्यार्थ्यांवरील शस्त्रक्रिया १०० टक्के यशस्वी होतील याची खात्री नसल्याने पालकांनीच शस्त्रक्रिया करावयाची नसल्याचे लिहून दिलेले आहे असा, सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग यानी समितीसमोर खुलासा केला, त्यावर अशा विद्यार्थ्यांचा अपवाद वगळता इतर विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रीया केल्या पाहिजेत, ही समितीची मागणी त्यांनी मान्य केली.

सदर योजने अंतर्गत प्रतीवर्षी जी आरोग्य तपासणी केली जाते, ती गांभीर्याने केली जात नाही या, समितीने व्यक्त केलेल्या अभिप्रायावर, आरोग्य तपासणीसाठी प्रत्येक ग्रामपंचायतीला स्वतंत्र वैद्यकीय अधिकाऱ्यांची व्यवस्था केलेली आहे. त्यांनी कोणत्या दिवशी शाळेला भेट दिली पाहिजे, आणि त्या दिवशी कमीत कमी १२० विद्यार्थ्यांची तपासणी केली पाहिजे, असे निश्चित करण्यात आले आहे. सन २००८-२००९ या वर्षात सातारा जिल्ह्यातील शाळांमधील ३६६५२२ विद्यार्थ्यांची व सन २००९-२०१० या वर्षात ४०१८४५ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात

आली आहे. तसेच या वर्षी देखील अशा प्रकारची तपासणी केलेली आहे असा सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला. शाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी विशेष पथक तयार करण्यापेक्षा प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर्सनी त्यांच्या परिसरातील शाळांमधील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यास काय हरकत आहे, अशा समितीने विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने, आरोग्य तपासणीचा पूर्ण दिवसाचा कार्यक्रम असतो. प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर्स शाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी गेले तर प्राथमिक आरोग्य केंद्रातील कामे होणार नाहीत म्हणून या कामासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत असा सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीसमोर खुलासा केला.

प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर्स शाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासाणीसाठी गेले तर प्राथमिक आरोग्य केंद्रातील कामे होणार नाहीत, या सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या अडचणीवर तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील नोंदवहीत १० रुग्णांची देखील नोंद झालेली नसते. बऱ्याचशा प्राथमिक आरोग्य केंद्रात शस्त्रक्रियेची सोय उपलब्ध नसते. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील नियमित बाह्यरुग्ण विभागाच्या कामात व्यत्यय येऊ नये म्हणून शाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी विशेष पथकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. ग्रामीण भागातील शाळा साधारणतः ११.०० वाजता सुरु होतात आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील बाह्यरुग्ण विभागामध्ये साधारणतः ११.०० वाजेपर्यंतच रुग्णांची नावे नोंदणी केली जाते. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील बाहय रुग्ण विभागामध्ये साधारणतः ४० ते ५० रुग्ण येतात त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीमुळे प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये येणाऱ्या रुग्णांच्या तपासणीमध्ये अडचणी येतील, असे वाटत नाही. प्राथमिक आरोग्य केंद्रातील बाहय रुग्ण विभागाची वेळ मर्यादित असली तरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर्सनी बाहय रुग्ण विभागाव्यतिरिक्त राष्ट्रीय कार्यक्रम करावेत. शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीचे काम वर्षभर सुरु असणार आहे. त्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर्सना विविध ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये जावे लागते म्हणून या कामासाठी "विशेष पथके" तयार केलेली आहेत. या पथकात अर्हताप्राप्त डॉक्टर्स आहेत असा खुलासा करुन प्राथमिक आरोग्य केंद्रातील बाह्यरुग्ण विभागामध्ये येणाऱ्या रुग्णांची आकडेवारी समितीला सादर करतो, असा सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीसमोर खुलासा केला.

शालेय पोषण आहाराचा पुरवठा महिला बचत गटाकडून होतो की, महामंडळाकडून होतो अशी समितीने विचारणा केली त्यावेळी, पोषण आहाराचा पुरवठा काही ठिकाणी महिला बचत गटाकडून तर काही ठिकाणी महामंडळाकडून होतो, ज्या ठिकाणी महिला बचतगटांना परवडत नाही अशा प्रकारची तक्रार आहे त्या ठिकाणी महामंडळामार्फत धान्य पुरवठा करण्यात येतो आणि स्थानिक पातळीवर सेविका ते शिजवून देण्याचे काम करतात. पोषण आहारामध्ये गरम व ताजा आहार, खिचडी, उसळ, मटकी, देणे तसेच नास्ता व जेवण देणे अपेक्षित आहे. त्यासाठी प्रती विद्यार्थीमागे चार रुपये दर ठरविण्यात आलेला आहे. आता हे दर एक रुपयाने वाढविण्याचा निर्णय मंत्री मंडळाच्या बैठकीत झालेला आहे. त्यामुळे याचा फायदा महिला बचत गटांना मिळेल आणि ज्या महिला बचत गटांना परवडेल, असे प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीसमोर सांगितले. महिला बचत गटांनी नव्याने

मागणी केली तर त्यांना पुन्हा हे काम देणार काय, अशी समितीने पृच्छा केली त्यास प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी, याबाबत शासन निर्णय असल्याचे सांगुन प्राधान्याने महिला बचत गट पुढे आल्यास त्यांनाच प्राधान्याने हे काम देण्यात येईल, असे साक्षीच्या शेवटी समितीसमोर प्रतिपादन केले.

अभिप्राय व शिफारशी :-

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात सातारा पंचायत समिती अंतर्गत समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी शिक्षण विस्तार अधिकारी यांनी नियमानुसार २५५ जिल्हा परिषद शाळांना वर्षातुन किमान प्रत्येकी ३ याप्रमाणे ६७५ भेटी देऊन प्रत्येक बीटातील एकूण शाळांच्या १० टक्के म्हणजेच विकास गटातील किमान २६ शाळांना भेटी देणे आवश्यक होते. तथापि, त्यांनी ६६० शाळांना भेटी देऊन ६७ शाळांची तपासणी केल्याची माहिती समितीस प्राप्त झाली.

समितीने, पंचायती समिती अंतर्गत असलेल्या दोन शाळांना भेटी दिल्या त्यावेळी तेथे इयत्ता ६ वी ते इयत्ता ७ वी मध्ये` शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना पाढे तसेच बाराखडीही म्हणता येत नाही, विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी तरतुद केलेला निधी शाळांची रंगरंगोटी आणि दुरुस्ती यावर खर्च होत असल्याचे, तसेच बरेचसे शिक्षक मुख्यालयी रहात नसल्याचेही समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी निदर्शनास आले आहे. बरेचसे शिक्षण मुख्यालयी रहात नाहीत याकडे संबधित अधिका-यांनी लक्ष देण्याची गरज आहे आणि याकडे दुर्लक्ष करण्याऱ्या शिक्षकांवर कारवाई होणे गरजेचे आहे असे समितीचे मत झाले आहे.

पंचायत समिती अंतर्गत सन २००९-२०१० मध्ये ४१५३१५ विद्यार्थ्यांपैकी तपासणी केलेले ४०१८४५ विद्यार्थी वजा करता उर्वरीत १३४७० विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीबाबत पंचायत समितीने खुलासा केला नाही. जीवनदायी योजनेमधून नागपूर जिल्ह्याप्रमाणेच सातारा जिल्ह्यासाठी विशेष पॅकेज बाबतचा प्रस्ताव मंजूरीसाठी प्रलंबित असून त्याबाबत तसेच आरोग्य तपासणी झालेल्या १४८ विद्यार्थ्यांवर करावयाच्या उपचाराबाबत पुढे काय कार्यवाही झाली याची माहिती समितीस प्राप्त झाली नाही.

जिल्ह्यातील सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी एकाचवेळी अथवा पूर्णच होत नाही असे मागिल अनेक वर्षांची आकडेवारी पहाता निर्दशनास येत आहे आणि ही बाब जिल्हा परिषदेस भूषणावह नसून ती शालेय विद्यार्थ्यांच्या निरामय जीवनाच्या दृष्टीने घातक आहे. तसेच हृदय रोगाने पीडीत असलेल्या विद्यार्थ्यांच्या शस्त्रक्रिया राज्य शासनाने शासकिय खर्चाने करावयाचे ठरविल्या नंतरही विद्यार्थ्यांचे पालक उक्त शस्त्रक्रिया करण्यास नकार देतात याप्रकरणी शासनाचे अधिकारी त्यांना विश्वासात घेण्यासाठी कमी पडतात असे प्रकर्षाने समितीस जाणवल्यावाचून राहत नाही.

समितीस भेटीच्या वेळी शालेय पोषण आहार वाटपात सुसुत्रतेचा अभाव असल्याचे तसेच वाटपात असलेल्या अन्य पदार्थामध्ये एकसमानता नसल्याचे, तसेच त्याचे वाटपही नियमानुसार होत नसल्याचे आढळून आले. तसेच त्याचे वाटप काही ठिकाणी महिला बचत गटाकडून तर काही ठिकाणी महामंडळाकडून होत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

समितीच्या मते, शिक्षक मुख्यालयी राहात नसल्यामुळे त्यांचे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीकडे दूर्लक्ष झालेले आहे. परिणामी विद्यार्थ्यांना पाढे व बाराखड्या देखील म्हणता येत नाही. **सबब, समिती शिफारस करते की, जे शिक्षक मुख्यालयी राहत नाहीत त्यांची एक वेतनवाढ तात्काळ रोखण्यात यावी. त्याचप्रमाणे इयत्ता ६ वी व ७ वी च्या वर्गातीलच नव्हे तर इतरही वर्गातील अप्रगत विद्यार्थ्यांसाठी जादा तासिका घेण्यात यावी.**

समितीच्या मते, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतिबरोबरच त्यांचे आरोग्य अबाधित रहावे यासाठी शासनामार्फत शालेय आरोग्य तपासणी योजना राबविण्यात येत आहे. पंचायत समिती, सातारा अंतर्गत १४८ विद्यार्थ्यांवरील उपचाराबाबत प्रस्ताव अद्यापही शासनाकडे प्रलंबित असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. **सबब, समिती शिफारस करते की, उक्त प्रस्तावावर त्वरित निर्णय घेण्यात यावा व सदर विद्यार्थ्यांवरही विनाविलंब योग्य तो उपचार करण्यात यावा. समिती शिफारस करते की, राज्यातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर एक विशेष पथक नेमून व नियोजनपूर्वक वेळापत्रक आखून त्यांच्याद्वारे शालेय विद्यार्थ्यांची विहित आरोग्य तपासण्या पूर्ण करण्यात याव्यात, मात्र त्याचवेळी बाह्यरुग्ण विभागात दाखल करण्यात आलेल्या रुग्णांची गैरसोय होवू नये याकडे लक्ष पुरविण्यात यावे यासाठी सुद्धा नियोजन करण्यात यावे. त्याचप्रमाणे शस्त्रक्रियेस गैरसमजूतीपोटी नकार दिलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना विश्वासात घेवून व त्यांचे गैरसमज दूर करावेत जेणेकरुन अशा विद्यार्थ्यांवरही शस्त्रक्रिया करणे सुलभ होईल. समिती अशीही शिफारस करते की, राज्यातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर्स व कर्मचारी यांना दैनंदिन उपस्थितीची नोंद करण्यासाठी त्याठिकाणी बायोमॅट्रीक पद्धतीचा अवलंब करण्यात यावा.**

तसेच जसे नागपूर जिल्ह्यास विशेष पॅकेज देण्यात आलेले आहे, त्याच धर्तीवर सातारा जिल्ह्यासाठी देण्यात यावयाच्या पॅकेजचा मांडण्यात आलेला प्रस्ताव मंजुर करुन त्यानुसार कार्यवाही करावी, तसेच राज्यातील प्रत्येक जिल्ह्यासाठी विशेष पॅकेज मंजुर करण्यात यावे. तसेच एका तालुक्यात एक सकस आहार आणि दुसऱ्या तालुक्यात वेगळा सकस आहार वाटप करण्यात येत असेल, तर त्याची शहानिशा करण्यात यावी आणि राज्यातील प्रत्येक तालुक्यात एकसमान शालेय पोषण आहार विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात यावा, आणि यासाठी राज्यातील जास्तीत जास्त महिला गटांना प्रोस्ताहित करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.

समिती अशीही शिफारस करते की, उक्त प्रकरणी शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्यांच्या आत कळविण्यात यावी.

प्रकरण तीन - एक

जिल्हा परिषद, कोल्हापूर

घरकुल योजने अंतर्गत गायरान किंवा गावठाणातील जमिन उपलब्ध करुन देण्याबाबत

(पंचायत समिती, करवीर)

पंचायती राज समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या सन २००४-२००५ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील, प्रश्नावली क्रमांक दोन बाबत पंचायत समिती, करवीर येथे भेट दिली.

समितीने गटविकास अधिकारी यांना, सन २००९-२०१० मध्ये किती घरकुले मंजूर करण्यात आली अशी भेटीच्या वेळी पृच्छा केली, त्यांनी त्यावेळी ३६७ घरकुले मंजूर करण्यात आली. या वर्षी ८१३ घरकुले मंजूर झालेली आहेत. मागासवर्गीयांसाठी ५०२ घरकुले आहेत. नवीन धोरणानुसार चढता क्रम शिल्लक राहिलेला आहे. त्यांना प्राधान्य देण्याचे ठरविल्यानंतर २५१ घरकुलांचा प्रस्ताव पाठविला असून त्यास मंजूरी देखील मिळालेली आहे, असा समितीपुढे खुलासा केला. आतापर्यंत इंदिरा आवास घरकुल योजनेअंतर्गत किती गावे पूर्ण झालेली आहेत, अशी समितीने विचारणा केली, त्यावेळी जिल्ह्यामध्ये एकूण ३५० गावे पूर्ण झालेली आहेत, असे त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस उत्तर दिले.

ग्रामसभेने पाठविलेल्या नावानंतरही घरकुल मिळण्यास पात्र असलेल्या, पण शिल्लक राहिलेल्या लोकांच्याबाबत उदाहरणादाखल एका गावामध्ये ५० लोक पात्र आहेत, त्यापैकी ग्रामसभेने २० लोकांची निवड केली, तर उर्वरित ३० लोकांना घरकुले मिळण्यासाठी घ्यावयाच्या निर्णयाबाबत समितीने विचारलेल्या प्रश्नास गट विकास अधिकारी यांनी, त्यांची प्रतीक्षा यादी तयार केलेली आहे, तसेच घर बांधण्यासाठी ज्यांच्याकडे जागा नाही, असे मागासवर्गीय लाभार्थी आहेत. त्यांना जागा घेण्यासाठी केंद्र शासनाकडून १० हजार रु. मदत मिळते. ती मदत जिल्हा परिषदेकडे प्राप्त झालेली असून घर बांधण्यासाठी जागा मिळण्याबाबत जिल्हा परिषदेकडून १८०० प्रकरणे जिल्हाधिकाऱ्यांकडे गेलेली आहेत. परंतु वैयक्तिक लाभासाठी गायरान जमीन देता येत नाही, असा शासन निर्णय असल्याची समितीस मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी भेटीच्या वेळी माहिती दिली.

समितीने घरकुल योजनेअंतर्गत ज्यांच्याकडे जागा नाही, त्यांना गायरान किंवा गावठाणामधील जमीन उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात महसूल विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात येईल असे भेटीचा समारोप करतांना स्पष्ट केले.

समितीने **दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त माहितीच्या आधारे अधिक माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत माहिती मागवीली.**

१. घरकुल योजनेअंतर्गत ज्या मागासवर्गीय लाभार्थ्यांकडे घर बांधण्यासाठी जागानाही अशा मागासवर्गीयांना गायरान किंवा गावठाणामधील जमिन उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात शासनाची भुमिका काय आहे,

२. घरकुल योजनेअंतर्गत ज्या मागासवर्गीयांना घर बांधण्यासाठी जागा उपलब्ध नाही, अशा लाभार्थींना घरासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबतची १,८०० प्रकरणे जिल्हा परिषदेकडून शासनाकडे केव्हा पाठविण्यात आली आहेत, असल्यास, शासनाने त्यावर कोणती कार्यवाही केली, याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी,

उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने समितीस कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून खालील लेखी माहिती प्राप्त झाली.

शासन निर्णय दिनांक १६/३/१९९६ नुसार इंदिरा आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना १०० चौ.मी.क्षेत्रफळाचा भूखंड मोफत देण्याबाबत जिल्हाधिकारी व तहसीलदार यांनी कार्यवाही करावी अशी शासनाची भूमिका आहे. शासनाने याबाबत दिनांक १८ जानेवारी, २००७ रोजी शासन निर्णयान्वये सर्व जिल्हाधिकारी यांना निर्देशित केले आहे.

या कार्यालयाकडील अशासकीय पत्र क्र.जिग्राविय/लेखा/कावि/१०८५/२०१०, दिनांक २४/०६/२०१० अन्वये जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना जागा उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावांची गांवनिहाय यादी सादर केली आहे.

जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांना त्यांचेकडील पत्र क्र. कार्यासन-४/गावठाण/आरआर/९५१/१०, दिनांक २२/०७/२०१० अन्वये उपलब्ध गायरान क्षेत्रापैकी ५०% जमीन इंदिरा आवास योजनेसाठी वापरण्याबाबत जिल्हाधिकारी यांना थेट अधिकार प्रदान करणेसाठी शासन नियमात सुधारणा होणेबाबत कळविले आहे.

या संदर्भात असे नमूद करण्यात येते की, गायरान व गावठाणावरील जागा उपलब्ध करुन देण्याची बाब ही महसूल व वन विभागाशी संबंधित आहे. इंदिरा आवास योजनेंतर्गत कायम प्रतिक्षा यादीतील ज्या लाभार्थ्यांकडे घरकुलासाठी स्वतःची जागा नाही अशा लाभार्थ्यांकरिता जागा संपादीत करण्यासाठी रुपये १०,००० ते १२,००० पर्यंत आर्थिक सहाय्य अदा करण्याबाबतची योजना सन २०१०-२०११ पासून अंमलात आणण्यात आली आहे. अशाप्रकारे इंदिरा आवास योजनेंतर्गत घरकुलासाठी स्वतःची जागा नसलेल्या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यासाठी शासन सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येत आहे.

विभागीय सचिवांची साक्ष :

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडून प्राप्त झालेल्या वरील लेखी माहितीच्या आधारे दिनांक १३ जुलै, २०११ रोजी घेण्यात आलेल्या विभागीय साक्षीच्या वेळी समितीने पृच्छा केली की, इंदिरा आवास योजने अंतर्गत ज्यांची स्वतःची जागा नाही अशा लाभार्थ्यांना १०० चौ.मी.क्षेत्रफळाचा भूखंड मोफत देण्याबाबत जिल्हाधिकारी व तहसीलदार यांनी कार्यवाही करावी अशी शासनाची भूमिका आहे. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी विभागीय आयुक्त, पुणे यांना उपलब्ध गायरान क्षेत्रापैकी ५० टक्के जमीन इंदिरा आवास योजनेसाठी वापरण्याबाबत जिल्हाधिकारीयांना थेट अधिकार प्रदान करण्यासाठी शासन नियमात सुधारणा होण्याबाबत कळविले आहे. याप्रकरणी मा. उच्चतम न्यायालयाच्या निर्णयानुसार अशी जमीन वैयक्तिक कारणांसाठी देता येत नाही. तथापि, ती शाळा, दवाखाने इ.सार्वजनिक महत्वाच्या कारणांसाठी देता येते. तसेच, ज्या लोकांकडे राहण्यासाठी जागा नाही, त्यांना १ गुंठे जागा घेण्यासाठी रु.१० ते १२ हजार देण्याची तरतूद शासनाने केलेली असुन या जिल्ह्याला या वर्षी २५ कोटी रुपयांचा निधीही प्रदान करण्यात आलेला आहे. असे विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी खुलासेवजा उत्तर दिले.

गावठाणातील जागा कमी असेल, आणि गायरान जमिन उपलब्ध असेल तर त्या जमिनीबाबत प्रस्ताव पाठविला तर अडचण येईल काय, या समितीच्या प्रश्नावर, विभागीय सचिवांनी ज्या ज्या ठिकाणी जागा देणे शक्य आहे तेथे ती दिली जाते. दारिद्र्यरेषेखालील १९ लाख लाभार्थी आहेत. परंतु, बऱ्याच वेळेस गावकऱ्यांना ते ज्या

गावामध्ये राहतात तेथेच त्यांना जागा हवी असल्यास त्यांनी १ गुंठा जमीन त्यांनी विकत घ्यायची असुन त्यासाठी त्यांना १० ते १२ हजार रुपये दिले जाणार आहेत असे विभागीय सचिवांनी उत्तर दिले.

१९ लाख दारिद्र्यरेषेखालील लाभार्थ्यांपैकी ३ लाख लाभार्थ्यांकडे स्वतःची जागा नाही अशा लोकांची ग्रामपंचायतनिहाय यादी तयार करुन त्यांना घरे देण्याबाबतचा प्रस्ताव तयार केला तर गावांमध्ये लोकांना घरे उपलब्ध होऊ शकतील या समितीच्या म्हणण्यावर विभागीय सचिवांनी ३ लाख ४० हजार एकर एवढ्या उपलब्ध जमिनीतून ४० हजार लोकांना जमीन देण्यात आलेली आहे. उर्वरित जमिनीच्या बाबतीतील कारवाई सुरु आहे. मा. उच्चतम न्यायालयाच्या निर्णयामुळे गायरान जमीन देता येत नाही, त्यामुळे शासकीय जमीन सगळयाच गावात सगळ्यांनांच उपलब्ध होईल असेही नाही. यासाठी ज्यांना स्वतःचे घर नाही त्यांना जागा खरेदीसाठी १० ते १२ हजार रुपये इतके अर्थसहाय्य करण्यात येईल अशी योजना हाती घेण्यात आली आहे, असा साक्षीच्या वेळी त्यांनी समितीपुढे खुलासा केला.

समितीने, एक गुंठा जमीन घेतली जाते त्याचे खरेदी खत त्यांच्याकडून मिळते का व कोणत्या आधारावर त्यांना जमिनीची किंमत अदा केली जाते अशी पृच्छा केली, त्यावर विभागीय सचिवांनी, ज्याच्याकडून जमीन घेतली त्या जमीनमालकासोबत या व्यवहाराबाबतचा करारनामा करुन नियमाप्रमाणे त्यांना पैसे दिले जातात, असे समितीस उत्तर दिले. शासन निर्णयातील तरतुदीनुसार खाजगी जमीन सुद्धा घेता येते काय, या समितीने साक्षीच्या वेळी केलेल्या प्रश्नास, दोघांनी परस्पर सामंजस्य करारनामा करुन जमीन विकत घेता येईल. या दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने, समितीने यापूर्वी १ गुंठा जमीनीची खरेदी होत नव्हती, ती आता करता येईल काय, अशी विचारणा केली. त्यावर विभागीय सचिवांनी १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन खरेदी करता येईल, असे स्पष्ट केल. पुढे ही तरतूद सर्वांसाठी आहे काय, या प्रश्नावर मागासवर्गीय व इतरांना सुद्धा व्यवहार करता येईल, परंतु त्यांचे नाव दारीद्र्यरेषेखालील लोकांच्या यादीमध्ये समाविष्ट असावयास पाहिजे असे उत्तर दिले.

पुढे याबाबत महसुल विभागाची भुमिका स्पष्ट करताना इंदिरा आवास योजनेतील मागासवर्गीय लाभार्थी असतील व त्यांना स्वतःची जमीन नसेल तर त्यांना घरकुलासाठी गावठाणाची जमीन किंवा इतर शासकीय जमीन विनामूल्य द्यावी, परंतु यासाठी गायरान जमीन देता येणार नाही असे त्या विभागाच्या सचिवांनी समितीला सांगितले. महसुल विभागाने या संदर्भात १९८४, १९९१, १९९६, १९९८, २००२ व २००६ या वर्षात वेगवेगळे शासन निर्णय निर्गमित केले आहेत आणि त्यात असे म्हटले आहे की, गायरान जमीन सार्वजनिक कामासाठी देता येईल, तथापि, ती वैयक्तिक लाभाच्या योजनेसाठी देऊ नये. या संदर्भात मा. उच्चतम न्यायालयाने दिलेला निर्णय संपूर्ण देशामध्ये लागू केलेला आहे. यासंबंधी दिनांक १२/७/२०११ रोजीच्या शासन निर्णयात असे नमूद केले आहे की, "यापुढे गायरान अथवा सार्वजनिक वापरातील जमीनीचा फक्त केंद्र किंवा राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या सार्वजनिक सुविधा व सार्वजनिक प्रयोजन यासाठी, अन्य जमीन उपलब्ध नसल्यास याबाबत विचार करावा. गायरान, गुरचरण अथवा गावकऱ्यांच्या सार्वजनिक वापरातील जमीन कोणतीही व्यक्ती, खाजगी संस्था, संघटना यांना कोणत्याही प्रयोजनासाठी मंजूर करण्यात येऊ नये. अनेक ठिकाणी गावठाण विस्तार योजना केल्या जातात. घरकुलांचा कार्यक्रम

राबविताना लाभार्थ्यांना गावाबाहेर पाठविणे योग्य नाही, जर काही गावांमध्ये अशी अडचण असेल किंवा गावात शासकीय जमीन उपलब्ध नसेल तर जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ गावठाण वाढीचा प्रस्ताव तयार करावा. शासनाने आता २५ कोटींची तरतूद या कामासाठी केलेली आहे. तरीही आता निधीची अडचण येत आहे.

करवीर पंचायत समिती क्षेत्रात जवळपास १००० घरकुले बांधावयाची आहेत. परंतु जागेअभावी ती झालेली नाहीत. आता एक गुंठा जागा १० हजार रुपयांमध्ये शहरी वस्तीत उपलब्ध होऊ शकत नाही. म्हणून ज्या गावांत तयार तक्त्या (रेडिरेकनर) प्रमाणे जागेचे दर कमी असतील तेथे कमी दर द्यावा आणि ज्या ठिकाणी जादा दर आहेत त्या ठिकाणी जादा दर द्यावा, या समितीच्या सुचनेवर विभागीय सचिवांनी लाभार्थी शहरी भागामध्ये असेल तर १२ हजार व शहरापासून लांब असेल तर १० हजार रुपये दिले जातात. शासनाने ठरविलेल्या दरामध्ये घरकुल होऊ शकत नाही. परंतु १० हजार रुपयेपर्यंत अनुदान द्यावे अशी मंत्रीमंडळात चर्चा झाली आहे. १ गुंठा जागा ५ हजार रुपयांत मिळाली तर १० हजार रुपये देता येणार नाहीत, असे समितीसमोर स्पष्ट केले.

समितीने ही योजना प्रत्यक्षात राबविण्याचा उद्देश गरिबांना घरकुले मिळवून द्यावयाची आहे, परंतु योजना अंमलात येत नाही, कारण वेगवेगळ्या भागाचे वेगवेगळे दरडोई उत्पन्न समोर येते. त्यामुळे शासनाला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. त्या त्या भागातील परिस्थितीनुसार पैसे उपलब्ध व्हायचे असतील तर तयार तक्त्यातील दराच्या टक्केवारीनुसार पैसे देण्याची शिफारस समितीमार्फत शासनास करण्यात येईल. त्यासाठी शासन निर्णयामध्ये दुरुस्ती करावी लागेल असे सुचित केले.

अतिक्रमण केलेल्या जागेवर जुने बांधकाम असेल तर ते हटविण्याची कारवाई केली जाईल काय, अशी समितीने पुढे साक्षीच्या वेळी विचारणा केली असता, मा. उच्चतम न्यायालयाच्या निर्णयात जर गायरान जमिनीवर अतिक्रमण करुन बेकायदेशीरपणे जागा ताब्यात घेतली असेल त्यासंबंधी २-३ बाबींना अपवाद करावा असे नमूद केलेले आहे. जे मागासवर्गीय, भूमिहीन शेतमजूर होते, त्यांनी जर अतिक्रमण केले असेल, तर त्यांच्यासाठी शेत जमिनीची योजना असेल ते अतिक्रमण नियमीत करावे. सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अतिक्रमण केले असेल तर ते वगळून इतर सर्व अतिक्रमणे निष्कासित करावीत असे म्हटलेले आहे. अशा प्रकारची ४४ हजार गावे आहेत. या गावांतील गायरान जमिनीवर किती लोकांनी अतिक्रमण केले आहे. याचा विभागाला आढावा घ्यावयाचा आहे तसेच दिनांक १४/४/१९९० रोजीचा शासन निर्णय शेतीचे अतिक्रमण नियमित करणारा आहे. घरकुलांसाठी दिनांक १/१/१९९५ रोजीचा शासन निर्णय निधण्या पुर्वी केलेले घराचे अतिक्रमण जे शासनाच्या प्रचलित धोरणाविरुद्ध, कायद्याविरुद्ध, शासनाची परवानगी नसताना केले असेल, तर ते नियमित करण्यासंबंधीचा हा निर्णय आहे, या निर्णयानुसार यापुढे शासकीय जमीन देताना फक्त ती सार्वजनिक हितासाठी देता येईल, खाजगी वापरासाठी देता येणार नाही, असा प्रधान सचिव, महसुल विभाग यांनी समितीपुढे खुलासा केला.

गायरान जमिनीवर लोक रहात आहेत, त्यांनी पूर्वी बांधकाम केलेले आहे, त्यांच्या बाबतीत शासनाची भूमिका काय असेल, या समितीच्या प्रश्नावर खुलासा करताना, दिनांक १२/७/२०११ रोजीचा शासन निर्णय आहे, त्यामध्ये असे नमूद केले आहे की, "मा. उच्चतम न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासन असे आदेश देत आहे की,

वरील परिच्छेद ७ (४) मध्ये नमूद केलेल्या प्रयोजनांव्यतिरिक्त गायरान/गुरचरण व गावाच्या सार्वजनिक वापरातील (common village land) जमिनीवरील अन्य प्रयोजनांसाठी झालेली अतिक्रमणे तथा अनिधिकृत बांधकामे फार जुनी असली व बांधकामावर फार खर्च केला असला तरी तात्काळ निष्कासित करण्याची कार्यवाही करावी. तसेच अशा जमिनीवर भविष्यात कोणतीही अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता सर्व संबंधितांना घ्यावी" असे प्रधान सचिव, महसुल विभाग यांनी समितीपुढे स्पष्ट केले.

समितीने याप्रकरणी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात. त्यांनी आपल्या जिल्ह्यातील अधिकाऱ्यांमार्फत प्रत्येकी १०-१० गावांचा सर्व्हे करावा. तरच याचे चांगले परिणाम होतील असे सुचित केले. पुढे समितीने मा. उच्चतम न्यायालयाच्या निर्णयात, राज्यातील अनेक लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. त्यामध्ये मागासवर्गीय आहेत व इतर समाजाचेही गरीब लोक आहेत, असा उल्लेख असल्याचे स्पष्ट केले असता, यात जे भूमिहीन शेतमजूर आहेत, मागासवर्गीयांनी अतिक्रमण केले असेल, पण त्या जागेवर दवाखाना बांधला असेल, शाळा बांधली असेल तर त्याला अपवाद करावा असे मा. उच्चतम न्यायालयाच्या निर्णयात नमूद केलेले आहे असा प्रधान सचिव, महसुल विभाग यांनी अधिक खुलासा केला.

समितीने हे अतिक्रमण गायरान जमिनीवर केले असेल त्या जागेवर वस्ती असेल तर ते नियमित होणार आहे काय, सध्या वन जमिनीवर केलेले अतिक्रमण सुद्धा शासनाने नियमित केलेले आहे, या प्रश्नास दिनांक १/१/१९९५ हा निवासी जागेसाठी आहे. आजसुद्धा तोच दिनांक अस्तित्वात आहे. हा दिनांक संपूर्ण राज्यासाठी लागू आहे, असे प्रधान सचिव, महसुल विभाग यांनी उत्तर दिले. समितीने गावातील पडिक जमिनींवर लोक राहतात, त्यामुळे खेड्यापाड्यांतून मोठ्या प्रमाणावर जमिनीवर अतिक्रमण झालेले दिसून येईल. यासाठी मर्यादा सन २००९ पर्यंत वाढविण्याची आवश्यकता प्रतिपादन केली, त्यावर समितीची सूचना शासना समोर मांडण्याचे प्रधान सचिव, महसुल विभाग यांनी समितीस आश्वासन दिले. समितीने आज ५० हजार रुपये दराने सुद्धा एक गुंठा जागा मिळणे कठीण आहे. शिवाय विभागाने दिलेल्या मदतीतील ८० टक्के रक्कमेतून जमीन खरेदी केली तर, उरलेल्या पैशांमध्ये लाभार्थींनी घर बांधु शकणार नाही या निर्माण झालेल्या अडचणींवर मात करण्यासाठी धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे असे मत साक्षीच्या वेळी प्रतिपादन केले.

अभिप्राय व शिफारस :

राज्य शासनाच्या घरकुल योजने अंतर्गत मागासवर्गीय लाभार्थ्यांना त्यांची स्वतःची जमीन नसल्याने, त्यांना गायरान किंवा गावठाणामधील जागा उपलब्ध करुन देणे ही शासनाची भुमिका आहे.

जिल्ह्यात दारिद्र्यरेषेखालील एकूण १९ लाख मागासवर्गीय लाभार्थी असून त्यापैकी ३ लाख लोकांकडे घर बांधण्यासाठी स्वतःची जागा नाही. त्या ३ लाख लाभार्थ्यांपैकी आतापर्यंत ४० हजार लोकांना जमिनीचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरित लाभार्थ्यांना जमिन खरेदीसाठी रु.१० ते १२ हजार एवढे अर्थ सहाय्य करण्यात येणार आहे.

तथापि, जिल्ह्यात प्रत्येक ठिकाणी जमिनीचा भाव कमी जास्त आहे. ज्या ठिकाणी जास्त भाव आहे अशा ठिकाणी जमीन खरेदीसाठीच अर्थ सहाय्यातील ८० टक्के रक्कम खर्च होते, त्यामुळे जमिन खरेदीनंतर त्या लाभार्थ्यांकडे घर बांधण्यासाठी पुरेशी रक्कमच शिल्लक राहत नाही असा अनुभव आहे.

त्यासाठी गावकऱ्यांना गायरान जमिन देता येत नाही, असे राज्य शासनाने सन १९८२ ते सन २००६ या वर्षात एकूण सहा शासन निर्णय निर्गमित केले आहेत. त्यानुसार गायरान जमिनही फक्त सार्वजनिक हिताच्या प्रयोजनासाठीच वापरता येईल, घरासारख्या वैयक्तीक लाभासाठी तिचा उपयोग करता येणार नाही.

लाभार्थ्यांनी जागा खरेदी करुन त्यावर घर बांधण्यासाठी शासनाने निश्चित केलेली रु.१० ते १२ हजार एवढी रक्कम, ज्या ठिकाणी जागेचे भाव वाढीव आहेत, त्याठिकाणी राहणाऱ्या लाभार्थ्यांस देऊन त्या रक्कमेतून लाभार्थ्यांस घर बांधण्यास सांगणे, हे केवळ अशक्य आहे. तसेच जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागात दरडोई उत्पन्न वेगवेगळे आहे. त्यासाठी तयार तक्त्यानुसार (रेडी रेकनर) रक्कम मंजूर करणे गरजेचे आहे. **तसेच या तक्त्यातील दराच्या टक्केवारीनुसार पैसे देण्याची आवश्यकता आहे त्याबाबत राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन त्यानुसार सुधारीत शासन निर्णय निर्गमित होणे गरजेचे आहे. अशी समितीची धारणा झालेली आहे त्यानुसार शासन निर्णयात सुधारणा करण्यात यावी, अशी समितीची शिफास आहे.**

दिनांक १२ जुलै, २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार सार्वजनिक उपक्रमाशिवाय अन्य कामासाठी गायरान जमिनीवर झालेली अतिक्रमणे उठविण्याबाबतचे आदेश राज्याच्या प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यास देण्यात यावेत. यासाठी एकावेळी दहा गावांचा सर्व्हे करण्यात यावा. तसेच जिल्ह्यातील ठिकठिकाणच्या आर्थिक परिस्थितीनुसार पैसे उपलब्ध करुन देण्यासाठी तयार तक्त्याच्या दरानुसार टक्केवारीनुसार लाभार्थ्यांना पैसे देण्याची शिफारस समिती शासनास करीत आहे.

समितीच्या निदर्शनास असेही आले की, गायरान जमिनीवर अतिक्रमण करुन बेकायदेशीरपणे जागा ताब्यात घेतलेली असेल तर सार्वजनिक हिताच्या बाबी उदा.शाळा, विहिर इ. वगळता अन्य कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम निष्कासीत करण्यात यावे असा मा. उच्चन्यायालयाने निर्णय दिलेला आहे. गायरान जमिनिवर अतिक्रमण झालेले असल्याप्रकरणी अशा प्रकारची ४४ हजार गावे असून शासनाने अद्यापही त्याबाबत आढावा घेतलेला नाही. **सबब, समिती शिफारस करते की, सदर ४४,००० गावांचा कालबद्ध पद्धतीने आढावा घ्यावा, आढाव्यातील निष्कर्षांच्या अनुषंगाने गायरान जमिनीवरील अतिक्रमणे तात्काळ हटविण्यात यावीत व अशा मोकळ्या जागांचा वापर सार्वजनिक हिताच्या प्रयोजनार्थ करण्यात यावा.**

अन्न, वस्त्र व निवारा या तीन मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. ग्रामिण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांची निवाऱ्याची गरज भागविण्यासाठी तसेच कल्याणकारी राज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी शासनाने सदर योजनेची अंमलबजावणी सुरु केलेली आहे. तथापि, गावठाण वाढीचे शासन स्तरावर प्रलंबित असलेले अनेक प्रस्ताव, गायरान जमिनिच्या वापराबाबत मा. उच्चन्यायालयाने लावलेले निर्बंध व सर्वात महत्वाचे म्हणजे राज्याची वाढती लोकसंख्या व जमिनीची उपलब्धता यांचे व्यस्त प्रमाण याबाबींचा साकल्याने विचार करता **समिती शिफारस**

करते की, सदर घरकुल योजनेतील प्रत्येक लाभार्थ्यांना स्वतंत्र भूखंड उपलब्ध करुन देण्याऐवजी एका भूखंडावर दूमजली सदनिका बांधण्यात याव्यात जेणेकरुन जमिनिची सिमित क्षेत्रफळात दूप्पट लाभार्थी सामावले जाऊ शकतील व सदर लोकोपयोगी योजनेचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थ्यांना तर होईलच शिवाय बांधकामासाठी लागणारा खर्चसुद्धा विभागला जाऊन सदर सदनिका लाभार्थ्यांना आपोआपच माफक दरात उपलब्ध होतील.

समिती अशीही शिफारस करते की, उक्त शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत कळविण्यात यावी.

प्रकरण तीन - दोन

जिल्हा परिषद, कोल्हापूर

पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदांबाबत

पंचायती राज समितीने सन २००४-२००५ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्र.१ बाबत जिल्हा परिषद, कोल्हापूर येथे दिनांक ९ सप्टेंबर, २०१० रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर, यांच्याकडून खालील मुद्यांची माहिती मागवीली.

जनावरांच्या वैद्यकीय उपचारासाठी जिल्ह्यामध्ये एकंदर (पंचायत समितीनिहाय) किती ठिकाणी पशुवैद्यकीय केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत, किती पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे, त्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे, जिल्ह्यात नवीन पशुसंवर्धन केंद्रे सुरु करण्यासाठी काय नियोजन करण्यात आले आहे?

उपरोक्त मुद्याच्या संदर्भात समितीला जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडून खालील लेखी माहिती प्राप्त झाली.

१. जनावरांच्या वैद्यकीय उपचारासाठी जिल्ह्यात पंचायत समिती निहाय खालीलप्रमाणे एकूण १३८ पशुवैद्यकीय केंद्र आहेत.

अ.क्र.	तालुका	प.वै.द.श्रेणी १	प.वै.द.श्रेणी २	एकूण
१	आजरा	५	४	९
२	चंदगड	८	५	१३
३	गडहिंग्लज	१२	४	१६
४	कागल	९	८	१७
५	शिरोळ	२	४	६
६	हातकणंगले	५	१	६
७	पन्हाळा	४	६	१०

८	गगनबावडा	३	२	५
९	शाहुवाडी	६	६	१२
१०	राधानगरी	८	६	१४
११	भुदरगड	७	३	१०
१२	करवीर	११	७	१८
एकूण		**८२**	**५६**	**१३८**

२. अ) जिल्ह्यात श्रेणी-१ दवाखान्यातील पशुधन विकास अधिकारी या सवंर्गाच्या ९५ मंजुर पदांपैकी ४८ पदे भरण्यात आली असून ४७ पदे रिक्त आहेत.

ब) जिल्ह्यात श्रेणी-२ दवाखान्यावरील सहाय्यक पशुधन विकास अधिकारी/पशुधन पर्यवेक्षक वर्ग ३ च्या एकूण १०१ मंजुर पदांपैकी ९२ पदे भरण्यात आली असुन ९ पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

३. अ) वरीलपैकी पशुधन विकास अधिकाऱ्यांची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरली जातात व सदर रिक्त पदे भरण्यासाठी रिक्त पदांचा वेळोवेळी अहवाल/प्रस्ताव खात्यास सादर करण्यात येतो.

ब) वरील पैकी सहा पशुधन विकास अधिका-यांची पदे पदोन्नतीने भरली जातात व ३ पदे खुल्या प्रवर्गामध्ये रिक्त असुन आकृतीबंध मंजुरीस्तव शासनाकडे सादर केला आहे.

४. जिल्ह्यात नविन पशुसंवर्धन केंद्रे सुरु करण्याकरिता जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत ठराव घेवून जिल्हा नियोजन समितीकडे प्रारुप आराखाड्यात मागणी करण्यात आली होती. २१ नवीन दवाखाने स्थापनेचे प्रस्ताव शासनाकडे सादर करणेत आले आहेत.

जिल्हा परिषदेस दिनांक ९ सप्टेंबर, २०१० रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी समितीने पशुवैद्यकीय दवाखाने सहाय्य केद्रांसाठी इमारत बांधणे या शिर्षाखाली खर्च करण्यात आला त्यातून कोणते बांधकाम करण्यात आले आहे, अशी विचारणा केली असता, समितीस, पशुवैद्यकीय दवाखाने, निवास बांधकाम, शिरोळ येथे दोन बांधकामे हाती घेतली होती. ती पूर्ण झाली असून त्यासाठी रु.८.४८ लाख एवढी तरतूद होती, त्यापैकी रु.६ लाख शिरोळ येथे बांधकामासाठी वर्ग केले होते. तसेच एकूण १३८ दवाखान्यांपैकी बिगर निवासी १६ दवाखान्यांना इमारती नाहीत. पशुधन विकास अधिकाऱ्यांची, वर्ग-१ ची एकूण ९५ पदे मंजूर असून त्यापैकी ४१ पदेच भरलेली आहेत. उर्वरित पदे भरण्यासाठी पाठपुरावा केलेला आहे, असे जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी उत्तर दिले.

तसेच आंतर जिल्हा बदल्यांनी, या जिल्ह्यातून पशुधन विकास अधिकाऱ्यांनी बदल्या करुन घेतल्यामुळे या जागा रिक्त झालेल्या आहेत. सदर पशुधन विकास अधिकारी यांच्या रिक्त जागा भरण्याबाबत जिल्हा परिषदेचा शासनाकडे पाठपुरावाही सुरु आहे. माननीय मंत्री महोदयांसमवेत बैठक झाली, त्यावेळी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उमेदवार प्राप्त झाल्यानंतर या रिक्त जागा भरण्यात येतील असे त्यांनी सांगितले. परंतु, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून जिल्हा परिषदेस पशुधन विकास अधिकारी मिळेपर्यंत ही पदे

कंत्राटी पद्धतीने ११ महिन्यांसाठी भरण्याची बाब विचाराधीन आहे, अशी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अधिक माहिती दिली.

जिल्हा परिषदेकडे एल.डी.ओ.ची ५४ पदे रिक्त आहेत व नवीन दवाखाने उभारण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला असुन त्यास मंजुरी अप्राप्त आहे असे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी समितीस सांगितले. तसेच कोल्हापूर जिल्ह्यात सर्वात जास्त पशुधन असून, एका डॉक्टरकडे ३-४ दवाखाने आहेत. नवीन दवाखाने उभारण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे. तथापि, त्यास मंजूरी अप्राप्त आहे. तसेच कर्मचारी वर्ग मंजूर झाल्याशिवाय वित्त विभाग दवाखान्यास मंजूरी देत नाही, तेव्हा नवीन दवाखाने बांधता आले नाहीत, असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस भेटीच्या वेळी सांगितले.

भेटीच्या वेळी घेतलेल्या माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणुन घेण्यासाठी समितीने विभागाकडून खालील मुद्यांबाबतची माहिती मागितली.

१. कोल्हापूर जिल्हा परिषदेकडील पशुसंवर्धन अधिकाऱ्यांची एकूण किती पदे रिक्त आहेत,

२. सदर पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत,

३. सदर रिक्त पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषदेमार्फत शासनाकडे केव्हा पाठविण्यात आला आहे,

४. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली, अथवा येत आहे?

वरील मुद्यांच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.

पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडे सध्या पशुधन विकास अधिकारी ९५ पदांपैकी ३९ पदे कार्यरत असून ५६ पदे रिक्त आहेत.

बदली, राजीनामा, सेवानिवृत्ती इत्यादी कारणांमुळे सदर पदे रिक्त राहिलेली आहेत.

१. या कार्यालयाकडील जा.क्र./जिप/पशुसं/वशि/आस्था-रिक्तपदे/२००९ दिनांक २४/७/२००९

२. या कार्यालयाकडील जा.क्र./जिप/पशुसं/आस्था-२/वशि/६२७/२०१० दिनांक ४/०६/२०१०

३. इकडील जा.क्र./जिप/पशुसं/आस्था/वशि-३/१४२/२०१० दिनांक.१५/१०/२०१०

४. इकडील जा.क्र./जिप/पशुसं/आस्था/वशि-३/५६/२०११ दिनांक ११/०१/२०११

अन्वये प्रस्ताव सादर केलेले आहेत.

उपसचिव, महाराष्ट्र शासन कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई यांचेकडील क्र.पसप्र/१००९/प्र.क्र.३६३/०९/पदुम-१ दिनांक १ सप्टेंबर, २००९ अन्वये पशुधन विकास अधिकारी या पदांची मागणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे करण्यात आली आहे. आयोगाकडून निवड होऊन पशुधन विकास अधिकारी या पदांवर नियुक्तीसाठी नावे प्राप्त होताच रिक्त पदे भरण्यासाठी उमेदवार पाठविण्यात येतील असे कळविले आहे.

दिनांक १२ ऑक्टोबर, २०११ रोजीच्या विभागीय साक्षीच्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

१. मंजूर पदे- पशुधन विकास अधिकारी याच्या मंजूर ९५ पदांपैकी ३६ पदे भरलेली असून, ५९ पदे रिक्त आहेत.

२. बदली, राजिनामा, सेवानिवृत्ती इत्यादी कारणांमुळे सदर पदे रिक्त राहीलेली आहेत.

३. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांना पशुधन विकास अधिकारी यांची ४६ रिक्त पदे भरणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील पत्र क्र.जिप.पशुसं/वशि/आस्था-२/रिक्त पदे २००९/ दिनांक २४/७/२००९ अन्वये कळविण्यात आलेले आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील पत्र क्र. जिप.पशुसं/वशि/आस्था-२/६२७/२०१० दिनांक ४/६/२०१० पत्र क्र.जिप/पशुसं/वशि-३/१४२/२०१० दिनांक १५/१०/२०१० पत्र क्र.जिप.पशुसं/वशि-३/५६/२०११, दिनांक ११/१/२०११ अन्वये कळविलेले आहे.

४. उप सचिव, महाराष्ट्र शासन, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे क्र.पसंप्र १००९/प्र.क्र.३६३/०९/पदुम-१, दिनांक १ सप्टेंबर, २००९ अन्वये पशुधन विकास अधिकारी या पदांची मागणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे करण्यात आली आहे. आयोगाकडून निवड होऊन पशुधन विकास अधिकारी या पदांवर नियुक्तीसाठी नावे प्राप्त होताच रिक्त पदे भरण्यासाठी उमेदवार पाठविण्यात येतील असे कळविले आहे.

दिनांक १२ ऑक्टोबर, २०११ रोजीच्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या अनुषंगाने पशुसंवर्धन विभागाकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

कोल्हापूर जिल्हा परिषदेअंतर्गत एकूण मंजूर व भरलेल्या पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

पदनाम	**मंजूर पदे**	**भरलेली पदे**	**रिक्त पदे**
पविअ	९५	३६	५९
सहाय्यक पविअ	१९	०९	१०
पशुधन पर्यवेक्षक	८६	८०	०६
व्रणोपचारक	४७	४१	०६

वर नमूद केल्याप्रमाणे बदली, राजीनामा, सेवानिवृत्ती, नवीन पदनिर्मिती इ.कारणामुळे पदे रिक्त राहीलेली ओत.

उपरोक्त पदांपैकी फक्त पशुधन विकास अधिकारी हे पद शासनामार्फत भरण्यात येत असून उर्वरित पदे ही संबंधित जिल्हा परिषदेमार्फत भरण्यात येतात.

राज्यातील रिक्त असलेली पशुधन विकास अधिकाऱ्यांची गट-अ ची सरळ सेवेची पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे वेळोवेळी मागणीपत्रे पाठविण्यात येत असून, सदर पदे भरण्याबाबत वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे. पदोन्नतीची पदे भरण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावरुन सुरु आहे.

पशुधन विकास अधिकारी गट-अ :- मंजूर पदे २१६२, भरलेली पदे १७०४ व रिक्त पदे ४५८ इतकी आहेत. पशुधन विकास अधिकारी गट-अ या संवर्गातील ५१ पदे भरणेकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र सादर केले असता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने ४२ पात्र उमेदवारांची निवड करुन शासनास कळविले आहे. तसेच १८३ पशुधन विकास अधिकारी यांचे मागणीपत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक १७/९/२०११ रोजी चाळणी परिक्षा झाली असून, मुलाखती दिनांक १८/१०/२०११ पासून सुरु होणार आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून पात्र उमेदवार प्राप्त होताच रिक्त पदे त्वरीत भरण्यात येतील. तसेच २२४ पशुधन विकास अधिकारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे.

पशुधन विकास अधिकारी गट-ब :- एकूण मंजूर पदे ३८१ असून २०३ पदे भरलेली आहेत व १७८ पदे रिक्त आहेत. सदर पदांवरील पदोन्नतीसाठी सेवाप्रवेश नियमानुसार DVSc. ही पदविका आवश्यक आहे. ही पदविका बंद झाली असल्याने व सेवांतर्गत DVSc. पदविका उपलब्ध नसल्याने पदोन्नती देण्यात आलेली नाही.

जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडून दिनांक २४/७/२००९ च्या पत्रान्वये पशुधन विकास अधिकारी गट-अ यांची ४६ पदे भरण्याबाबत प्रस्ताव झाला होता. त्यानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारसपात्र उमेदवार प्राप्त होताच, सर्व जिल्हा परिषदांकडील पशुधन विकास अधिकारी यांची रिक्त पदे समप्रमाणात भरण्यात येतील असे शासनपत्र क्र.पसंप्र १००९/प्रक्र.३६३/०९/पदुम-१, दिनांक १ सप्टेंबर, २००९ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना कळविले आहे.

विभागीय सचिवांची साक्ष

समितीस प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक १३ जुलै, २०११ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. समितीने रिक्त पदांची माहिती भेटीच्या वेळी घेतलेल्या साक्षीच्या अनुषंगाने घेतलेली आहे. त्यानुसार दिनांक २४/७/२००९, दिनांक ४/६/२०१०, दिनांक १५/१०/२०१० व दिनांक ११/१/२०११ रोजीच्या पत्रान्वये रिक्त पदे भरण्याबाबचे प्रस्ताव जिल्हा परिषदेमार्फत शासनाकडे सादर केलेले आहेत. परंतु, राज्य शासनाच्या प्रतिसादाअभावी राज्यात तसेच जिल्ह्यात सर्वच ठिकाणी पशुवैद्यकांची कमतरता दिसुन येते, शासनाकडून त्याला प्रतिसाद मिळत नाही. याबाबतची वस्तुस्थिती काय आहे, अशी समितीने विचारणा केली. त्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने पशुधन विकास अधिकारी या पदांसाठीची परीक्षा घेतलेली असून तीचा निकाल लागलेला आहे. तथापि, त्यास मा. उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे, आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने ही स्थगिती उठविण्यासाठी लढावे यासाठी पशुसंवर्धन विभाग पाठपुरावा करीत आहे, असा पशुसंर्वधन विभागाच्या प्रतिनिधीनी खुलासा केला. जर आरोग्य विभागाच्या धर्तीवर पद भरतीसाठी प्रयत्न केले तर अडचण येणार नाही. राज्यामध्ये एकूण किती रिक्त पदे आहेत, असे विचारले असता, त्यावर राज्यात एकूण ८६३ पदे रिक्त आहेत असे सांगण्यात आले. ज्या पद्धतीने आरोग्य

विभागाने रिक्त जागा भरल्या त्याच पद्धतीने पशुसंवर्धन विभागातील सर्व रिक्त जागा भरल्या पहिजेत, या समितीने केलेल्या सुचनेच्या अनुषंगाने पशुसंवर्धन विभागाने रिक्त पदे भरतीबाबतचा प्रस्ताव सादर केला असता, सामान्य प्रशासन विभागाने त्याला मान्यता दिलेली नाही. असा विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी समिती समोर खुलासा केला. तसेच समितीने शिफारस केल्यास विभाग पुन्हा एकदा ही रिक्त पदे भरण्याबाबत प्रयत्न करेल, असे समितीस विभागीय प्रतिनिधीनी आश्वासन दिले. तेव्हा या प्रकरणी पुढील साक्ष सामान्य प्रशासन विभागाच्या सचिवांची घेण्यात यावी असे समितीने निर्देश दिले.

समितीने **दिलेल्या निदेशानुसार सामान्य प्रशासन विभागाच्या सचिवांची दिनांक १२ ऑक्टोबर, २०११ रोजी साक्ष घेण्यात आली.**

समितीस भेटीच्या वेळी राज्यातील प्रत्येक जिल्हा परिषदेअंतर्गत पशुधन विकास अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे आढळले, त्यापैकी कोल्हापूर जिल्हा परिषदेअंतर्गत पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या ९५ मंजूर पदांपैकी ३६ पदे भरलेली असून ५९ पदे रिक्त असल्याप्रकरणी विचारणा करण्यात आली. त्यावेळी खुलासा करताना विभागीय प्रतिनिधीनी समितीस पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या "अ" वर्गातील ५९ पदांपैकी ५१ पदांसाठी पशुसंर्वधन विभागाने लोकसेवा आयोगाकडे प्रस्ताव पाठविला, त्यापैकी ४२ उमेदवारांची निवड यादी पाठविलेली असल्याचे समितीस सांगितले.

राज्यातील मंजूर व रिक्त पदांची माहिती देताना तसेच मागिल वर्षी सदर पदे भरण्याबाबत काय अडचणी होत्या, याबाबत प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांनी पशुधन विकास अधिकाऱ्यांची एकूण मंजूर पदे २१६२ आहेत, त्यापैकी ४५८ पदे रिक्त आहेत असे समितीस सांगितले. जिल्हा परिषदेअंतर्गत पशुसंवर्धन विभागामध्ये अनुशेष नाही. तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे "क-वर्ग" कर्मचारी जनावरांना तपासू शकत नाहीत. या विभागीय सचिवांनी केलेल्या खुलाशानंतर समितीने ही अडचण दूर करण्यासाठी पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या रिक्त जागा तातडीने भरल्या पहिजेत या केलेल्या मागणीवर, विभागीय सचिवांनी या जिल्हा परिषदेअंतर्गत पशुधन पर्यवेक्षकाच्या मंजूर ८६ पदांपैकी ८० पदे भरली आहेत. पशुधन पर्यवेक्षक हे पद वर्ग "क" मध्ये मोडते. हे लोक जनावरांवर उपचार करीत होते, त्यामुळे झळ पोहोचली नाही. तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्णयामूळे त्यांना पूर्वीप्रमाणे काम करण्याचे अधिकार राहिले नाहीत, त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झालेली आहे, अशी समितीस माहिती दिली.

समितीने साक्षीच्या वेळी आरोग्य विभागामधील डॉक्टरांच्या रिक्त पदांच्या प्रमाणात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उमेदवार उपलब्ध होत नव्हते, म्हणून आरोग्य विभागाने ज्याप्रमाणे स्वतः परीक्षा घेऊन पदे भरली याप्रमाणे पशुसंर्वधन विभागाला देखील पदे भरता येतील या केलेल्या सुचनेवर, सदर रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेत आहेत. ही पदे त्यांच्या कार्यकक्षेतून बाहेर काढणे हा धोरणात्मक निर्णयाचा भाग आहे. ती भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. उमेदवारांच्या परीक्षा झालेल्या असून आता

मुलाखती होत आहेत. सालाबादप्रमाणे २०० रिक्त जागांपैकी १८३ जागांचे विनंतीपत्र पाठविलेले आहे. चाळणी परीक्षा आणि मुलाखती घेतलेल्या आहेत, असा विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी समितीसमोर खुलासा केला.

सन २००३ ते २००७ या कालावधीत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे काम ठप्प झालेले होते. आयोगावर सदस्य नेमलेले नव्हते. तथापि, सन २००७ पासून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कामाला खरी सुरुवात झाली. जुनी जी मागणी केली होती, त्यानुसार ४२ आणि त्यांनतर अलीकडे केलेल्या मागणीनुसार १८३ उमेदवार उपलब्ध होतील असे सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांनी, समिती समोर साक्षीच्या वेळी स्पष्ट केले. उर्वरित २०० पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव केव्हा पाठविण्यात येणार आहे, अशी समितीने विचारणा केल्यानंतर विभागीय सचिवांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्रक्रिया केव्हा सुरु होईल व ती किती दिवसात पूर्ण होईल तेही सांगता येणार नाही. २२४ पदे भरण्याची प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करण्याच्या कामास गती देण्यासाठी आयोगाला सूचना देऊन शासनास याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येईल असे समितीस आश्वासन दिले.

"अ" गटच्या बाबतीत शासनाने कार्यवाही सुरु केली, "ब" गटाच्या बाबतीत सद्यस्थितीचा खुलासा करताना, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एलजीएसकडून हे काम करुन घेणे बंद झाल्यामुळे राज्यामध्ये फार मोठा असंतोष निर्माण झाला आहे. "ब" वर्ग अधिकाऱ्यांची २०० पदे रिक्त आहेत परंतु त्यांना पदोन्नती दिली जात नाही. या समितीने केलेल्या विधानावर, त्यांना पदोन्नती देण्यासाठी विशिष्ट शैक्षणिक पात्रतेची आवश्यकता आहे. परंतु ती पात्रता धारण करणारे उमेदवार मिळत नाहीत असा विभागीय सचिवांनी आणखी खुलासा केला. पदवीकाधारक उमेदवार मिळत नाहीत त्याकरिता पदवीकेची अट शिथिल करावी लागेल. या बाबतची कारवाई लवकरात लवकर करण्यासंबंधी सूचना देऊन कारवाई पूर्ण करण्यात येईल. तसेच, सेवा प्रवेश नियमामध्ये बदल करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची सहमती मिळवावी लागेल तसेच यासाठीचा प्रस्ताव १५ दिवसांत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठवितो. "क" गटामध्ये ८६ पैकी ८० पदे भरण्यात आलेली आहेत असा विभागीय सचिवांनी पुढे समितीस खुलासा केला.

मा. उच्चतम न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे ज्यांना उपचार करण्याची परवानगी नाही, असे प्रत्येक जिल्ह्यात जवळ जवळ ७० ते ८० डॉक्टर आहेत. कोल्हापूर जिल्ह्यात किती पदे भरली आहेत, असा समितीने प्रश्न केला, त्यास त्यात जिल्ह्यात ८६ पैकी ८० पदे भरली आहेत. या बाबतीत केंद्र सरकारचा कायदा असल्यामुळे केंद्रास आपल्याला विनंती करावी लागेल. मा. उच्चतम न्यायालयाचा निर्णय रद्द करावयाचा असेल, तर हाच मार्ग आहे असे विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी उत्तर दिले. जिल्ह्यात डॉक्टरची उपलब्धता भरपूर आहे. परंतु जिल्हा परिषदेला बीव्हीएससीचे डॉक्टर भरण्यास परवानगी मिळणे गरजेचे आहे, समितीच्या या म्हणण्यावर बीव्हीएससीच्या वर्ग-१ आणि वर्ग-२ च्या डॉक्टर्सची उपलब्धता आहे. परंतु त्यांना काम करण्याची परवानगी नसल्यामुळे ते अर्ज करीत नाहीत आणि संपूर्ण राज्यात २८० जागा रिक्त होत्या. त्या भरण्यास बंधन नाही परंतु त्या भरल्यानंतर ते लोक काम करु शकणार नाहीत. त्यांच्या पात्रतेनुसार सुट देण्याबाबत प्रस्ताव पाठविला आहे, असा विभागीय सचिवांनी समितीसमोर खुलासा केला.

अभिप्राय व शिफारशी :-

राज्यातील प्रत्येक जिल्हा परिषदेअंतर्गत पशुसंवर्धन विभागात पशुधन विकास अधिकारी (वर्ग-१), सहाय्यक पशुधन विकास अधिकारी (वर्ग-२), पशुधन पर्यवेक्षक तसेच व्रणोपचारक (वर्ग-क) ही पदे रिक्त आहेत. हीच परिस्थिती कोल्हापूर जिल्हा परिषदेअंतर्गतही आहे. तेथे पशुधन विकास अधिकरी यांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत, याबाबत पशुसंवर्धन विभागाने सामान्य प्रशासन विभागाकडे सदर रिक्त पदे भरण्याबाबत वेळोवळी पाठपुरावा केलेला आहे. तथापि, सदर पदे अद्याप भरण्यात आलेली नाहीत. मा. सर्वोच्च न्यायालयाने "अ" व "ब" वर्ग अधिकाऱ्यांची कामे "क" वर्ग कर्मचाऱ्यांनी करण्यास प्रतिबंध केल्यामुळे "क" वर्ग कर्मचारी "अ" व "ब" वर्ग अधिकाऱ्यांची कामे करु शकत नाहीत, त्यामुळे राज्यातील पशुधन आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याचे समितीचे ठाम मत झाले आहे.

समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी, त्यानंतर घेतलेल्या साक्षीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या लेखी माहितीमध्ये आणि शेवटी साक्षीच्या वेळी समितीस प्राप्त झालेल्या माहितीमध्ये जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागातील रिक्त असलेल्या विविध पदांच्या संख्येमध्ये समितीस तफावत आढळून आलेली आहे, याबाबत स्पष्ट खुलासा होणे गरजेचे आहे असेही समितीचे मत झालेले आहे.

मागील दोन वर्षातील "अ" व "ब" वर्ग अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासाठी तातडीने प्रस्ताव पाठविण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने कार्यवाही करावी. तथापि, अशी कार्यवाही वेळीच करण्यास सामान्य प्रशासन विभागास शक्य होत नसल्याचे, पशुसंवर्धन विभागाच्या निदर्शनास आलेले आहे. सबब, सामान्य प्रशासन विभागाने थेट भरती करण्यास सार्वजनिक आरोग्य विभागास जशी अनुमती दिली, त्याच धर्तीवर पशुसंवर्धन विभागासही अनुमती द्यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

तसेच "ब" वर्ग अधिकाऱ्यांची २०० पदे रिक्त आहेत, परंतु ती पदोन्नतीने भरली जात नाहीत कारण, पदोन्नती देण्यासाठी विशिष्ट शैक्षणिक पात्रतेची आवश्यकता आहे आणि ती पात्रता धारण करणारे, म्हणजेच पदवीकाधारक उमेदवार मिळत नाहीत. त्याकरिता पदवीकेची अट शिथिल करावी लागेल. या बाबतची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावी जेणेकरुन जिल्ह्यातील तसेच राज्यातील पशुधनावर तातडीने औषधोपचार होऊ शकतील. त्याचप्रमाणे आवश्यक मनुष्यबळ वेळीच उपलब्ध होत नसल्याने, त्यासाठी सेवाप्रवेश नियमातही आवश्यक दुरुस्ती करण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी आणि केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत देण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.

प्रकरण तीन - तीन

जिल्हा परिषद, कोल्हापूर

उपविभागाला शासनाची मान्यता मिळण्याबाबत

उपविभागाला शासनाची मान्यता मिळण्याबाबत समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेस दिनांक ९ सप्टेंबर, २०१० रोजी भेट देवून सन २००५-२००६ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात, भेटीच्या वेळी समितीने जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यां समवेत केलेल्या अनौपचारीक चर्चेच्यावेळी पदाधिकाऱ्यांनी समितीच्या असे निदर्शनास आणून दिले की, जिल्हा परिषदेकडे लघु पाटबंधाऱ्यांच्या असलेल्या कामाच्या प्रमाणात उपविभाग शासनाने मंजूर केले नसल्याने लघु पाटबंधाऱ्याच्या कामावर त्याचा विपरित परिणाम होत आहे. सध्या जिल्हा परिषदेमध्ये ८

उपविभाग निर्माण केलेले असून त्या विभागांना अजून शासनाची मान्यता मिळालेली नाही असेही पदाधिकाऱ्यांनी समितीला सांगितले होते. यासंदर्भात नेमकी वस्तूस्थिती जाणून घेण्यसाठी समितीने साक्षीचे वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, या जिल्हा परिषदेमध्ये १२ तालुके आहेत. तीन तालुक्यांसाठी एक उप अभियंता होता. १९९० मध्ये जिल्हा परिषदेने ठराव करुन हे उपविभाग निर्माण केलेले आहेत. एक विभाग आणि

५ उपविभाग आहेत. शाखा अभियंत्यांना उपअभियंता केलेले आहे. यासंबंधी शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे, समितीने कोल्हापूर भौगोलिक दृष्ट्या मोठा जिल्हा आहे. त्यास्तव जिल्हा परिषदेने निर्माण केलेले हे उपविभाग नियमित होणे आवश्यक आहे. यासंबंधी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात यावी असा निर्णय घेतला.

त्यानुसार समितीने यासंदर्भात जिल्हा परिषदेला दिनांक ९ स्टेंबर, २०१० रोजी दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक १३ जुलै, २०११ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष आयोजित केली साक्षीच्या वेळी समितीने खालील मुद्यांबाबत ग्रामविकास विभागाकडून माहिती मागितली.

कोल्हापूर जिल्हा परिषदेने सन १९९० मध्ये ठराव करुन उपविभाग निर्माण केले आहेत अशा प्रकारचे विभाग जिल्हा परिषदेला निर्माण करता येतात काय, असल्यास, कोल्हापूर जिल्हा परिषदेमार्फत उपविभागास मान्यता देण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे कोणत्या तारखेस पाठविण्यात आला आहे, व त्यावर शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा करण्यात येत आहे. नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

वरील मुद्यांबाबत ग्रामविकास विभागाने पुढीलप्रमाणे लेखी माहिती पुरवीली

अशा प्रकारचे उपविभाग जिल्हा परिषदेला निर्माण करता येत नाहीत. तथापि कामाचा भार, कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण व्हावीत, कामासाठी केलेल्या तरतूदी या अखर्चीत राहू नयेत यासाठी सन १९८३ पासून जिल्हा परिषद, कोल्हापूर नवीन विभाग व उपविभाग यासाठी पाठपुरावा करीत आहे. शासनाकडून याबाबत निर्णय न झालेने कामकाजामध्ये सुसूत्रता येणे कामी जिल्हा परिषद सर्वासाधारण सभा ठराव क्र.२० दिनांक ३०/०६/१९९० ने खालील प्रत्येक तालुक्यासाठी स्वतंत्र उपविभाग निर्माण करणेत आले होते त्यानुसार जिल्हा परिषदेने १. पन्हाळा २. राधानगरी ३. शिरोळ ४. गगनबावडा ५. कागल ६. भुदरगड ७. आजरा ८. इमारत असे ८ उपविभाग निर्माण केले आहेत.

कोल्हापूर जिल्हा परिषदेला एक जादा विभाग व ७ उपविभाग मंजूर होणेबाबत कोल्हापूर जिल्हा परिषदेने दिनांक २४/१०/१९८६, १३/५/१९८८, ३१/७/१९९०, १६/११/१९९४, २४/३/१९९५, २/२/१९९६, २९/१०/२००२, ५/८/२००४, १२/१/२००५, २२/९/२००५, २/५/२००६, २८/९/२००६, १८/५/२०१०, २३/६/२०१०, २३/७/२०१० अन्वये शासनास प्रस्ताव व त्या अनुषंगाने पत्रव्यवहार केलेला आहे.

उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक जिपउ-२०१०/मं.५२/प्र.क्र.१२६/पंरा-९ दिनांक १७/१/२०११ अन्वये जिल्हा परिषदेने शासनाच्या मान्यतेशिवाय जिल्हा स्तरावर बांधकाम विभाग/उपविभाग निर्माण केले असल्यास अशी बाब शासनाच्या धोरणाशी सुसंगत नसल्याने सदर प्रकरणी

शासनाची मान्यता देणे शक्य होणार नाही. तरी असे विभाग/उपविभाग रद्द करणेसंदर्भात आवश्यक ती कार्यवाही कारवी असे कळविले आहे. त्यानुसार इकडील दिनांक २/२/२०११ चे आदेशान्वये सदर उपविभाग रद्द करणेत येवून पूर्वी प्रमाणे सदर तालुक्यांचा कार्यभार हा शासनाकडील मंजूर उपविभागाकडील उप अभियंता यांचेकडे देणेत आला आहे.

विभागीय सचिवांची साक्ष

कोल्हापूर जिल्हा परिषदेअंतर्गत वाढविण्यात आलेल्या उपविभागांना शासनाची मान्यता मिळण्यासंदर्भात दिनांक १३ जुलै, २०११ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली, त्यावेळी समितीस माहिती देताना विभागीय सचिवांनी संपूर्ण राज्यात १८८ उपविभाग असून आणखी १६३ उपविभागांची मागणी करण्यात आलेली आहे तसेच जिल्हा परिषदांनी त्यांच्या स्तरावर तजवीज करुन उपविभाग निर्माण करुन ते मंजूर होण्याबाबत परवानगीही मागितल्याचे परंतु, जिल्हा परिषदेने शासनाच्या मान्यतेशिवाय जिल्हा स्तरावर बांधकाम विभाग/उपविभाग निर्माण केले असल्यास अशी बाब शासनाच्या धोरणाशी सुसंगत नसल्याने सदर प्रकरणी शासनाची मान्यता देणे शक्य होणार नाही. तथापि, याबाबतीत प्राथमिकतेचा विचार करुन हळू हळू परिस्थितीनुरुप ज्या प्रमाणामध्ये उपविभाग मंजूर होतील. तेव्हा त्यामध्ये कोल्हापूर मधील काही उपविभाग देखील असू शकतील. आतापर्यंत शासनाने ३५ उपविभागांना मंजुरी दिलेली आहे. तथापि, जिल्हा परिषदांना स्वतःच्या स्तरावर अशा प्रकारचे उपविभाग निर्माण करता येत नाहीत, असेही सचिवांनी समितीला साक्षीच्या वेळी सांगितले.

त्यावर समितीने या जिल्हा परिषदेने उपविभाग निर्माण केले म्हणजे नेमके काय केले, अशी सचिवांनी विचारणा केली असता, या जिल्हा परिषदेने उपविभाग तयार करताना कर्मचारी वर्ग वाढविलेला नाही. त्यांनी उपअभियंत्याचे काम कनिष्ठ अभियंत्यास दिले आणि अशाप्रकारे तयार केलेल्या उपविभागांना त्यांच्याकडून मान्यता मागितली जात आहे. तथापि, शासन हा प्रस्ताव मान्य करु शकत नाही. अशाप्रकारे निर्माण करण्यात आलेले ५ उपविभाग असून १२ तालुके आहेत. राज्यातील सर्व जिल्हा परिषदांनी उपविभागांची मागणी केलेली आहे. परंतु सगळ्यांची मागणी एकाच वेळेस मान्य करणे शक्य होणार नाही. यामुळे शासनावर अधिक खर्चाचा भार येईल असेहि त्यांनी समितीस सांगितले. जिल्हा परिषदेच्या स्तरावर अनेक जिल्हयांमध्ये लघुपाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम विभागाचे एकत्रच उपविभाग असतात असे समितीने सचिवांच्या निदर्शनास आणून दिले असता, जिल्हापरिषद स्तरावर प्रोत्साहीत केले असल्यामुळे काही ठिकाणी समितीच्या म्हणण्यानुसार कामे केली जातात. लघुपाटबंधारे व पाणीपुरवठा विभागाचे काम समान आहे. परंतु बांधकाम विभागाचे काम थोडे वेगळे आहे असे विभागिय सचिवांनी साक्षीच्यावेळी समितीस सांगितले.

लघुपाटबंधारे विभागाकडे बांधकाम दिले पाहिजे. या समितीच्या सुचनेवर पाटबंधारे विभागाने हे काम त्यांच्याकडे घेण्याची तयारी दाखविली तर विभागाची काहीच हरकत नाही असाही विभागीय सचिवांनी खुलासा केला.

लघुपाटबंधारे विभागाकडे हे काम देणे शक्य होणार नाही, कारण संपूर्ण जिल्ह्यात लघुपाटबंधारे विभागासाठी विभाग नसून, केवळ एकच उपविभाग आहे, त्यामुळे त्यांच्याकडून बांधकामाची कामे करवुन घेणे शक्य होणार नाही

या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या म्हणण्यावर, कोल्हापूर जिल्हा मोठा असल्यामुळे त्यांना उपविभाग दिले पाहिजेत असे मत समितीने मांडले, त्यावर विभागीय सचिवांनी मराठवाडा व विदर्भातील जिल्ह्यांची परिस्थिती या जिल्ह्यापेक्षाही वाईट आहे, तरीही मंजूर झालेल्या ३५ उपविभागांपैकी काही उपविभाग कोल्हापूर जिल्ह्यासाठी जरुर देता येतील असे उत्तर दिले.

अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषदेने साक्षीचेवेळी दिलेली माहिती व ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी समितीला साक्षीचे वेळी दिलेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, कोल्हापूर जिल्हा परिषदेने सन १९९० मध्ये ठराव संमत करुन पन्हाळा, राधानगरी, शिरोळ, गगनबावडा, कागल, भुदरगड, आजरा व इमारत असे ८ उपविभाग प्रत्येक तालुक्यासाठी स्वतंत्रपणे निर्माण केले होते. मात्र उपविभाग वाढवितांना त्यांनी त्यासाठी कर्मचारी वर्ग न वाढविता उप अभियंत्याचे काम कनिष्ठ अभियंत्यांना दिलेले होते. सदर उप विभागाना मंजूरी मिळण्यासाठी शासनाकडे १५ वेळा पत्राद्वारे पाठपुरावा केला असताही त्यास शासनाने प्रतिसाद दिलेला नाही.

जिल्हा परिषदेने शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय कर्मचारी वर्ग न वाढवीता उपविभाग तयार करणे हे शासनाच्या धोरणाच्या विरोधात आहे, त्यामुळे असे प्रस्ताव शासन मान्य करु शकत नाही, कारण खर्चावर अधिक भार पडू शकतो. सध्या राज्य शासनाने ३५ उपविभागांना मान्यता दिलेली असुन, त्यातील काही उपविभाग कोल्हापूर जिल्हा परिषदेसे मिळू शकतात.

राज्यातील अनेक जिल्ह्यांत लघुपाटबंधारे व सार्वजनिक विभाग हे दोन विभाग एकच असल्याने ते एकत्र काम करतात, त्यामुळे लघुपाटबंधारे विभागाकडे हे काम दिले पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले. त्यावर लघुपाटबंधारे हा एक विभाग नसुन उपविभाग आहे, त्यामुळे त्यास बांधकामाची कामे देणे शक्य नाही असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडुन समितीस सांगण्यात आले.

वास्तविक पहाता केंद्र सरकार व राज्य शासनाने आज जिल्हा परिषदाकडे अनेक योजना व कामे सोपविण्यात आली असून १० व्या, ११ व्या व १२ व्या वित्त आयोगाने मंजूर केलेल्या अनुदानातून विविध प्रकारची बांधकामे जिल्हा परिषदांच्या माध्यमातून ग्रामपंचायतीकडे सोपवली असून जिल्हा परिषदाकडील बांधकाम विभाग व लघुपाटबंधारे विभागाकडील कामाचा व्याप मोठ्या प्रमाणावर वढला आहे. मंजूर झालेली कामे विहीत कालावधीत पूर्ण व्हावीत तसेच कामाचा दर्जा व गुणवत्ता चांगली असावी तसेच त्याचा लाभ स्थानिक जनतेला त्वरीत होण्यासाठी त्यावर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी सक्षम यंत्रणा व पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध होणे नितांत गरजेचे आहे, असे समितीचे स्पष्ट मत आहे. u कोल्हापूर जिल्हा परिषदेने कामाची निकड विचारात घेवून ठरावाद्वारे ८ उपविभाग मंजूर केले असून त्यांना शासनाची मंजूरी मिळण्याबाबत वारंवार पत्रव्यवहार करुन देखील त्यास शासनाच्या मान्यतेशिवाय जिल्हा परिषदेने उपविभाग निर्माण केले असल्याने तसेच त्याचा आर्थिक भार शासनावर पडेल या कारणावरुन एक धोरण म्हणून शासनाने त्यास मान्यता दिलेली नाही. या विभागाच्या सचिवांनी साक्षीच्या वेळी व्यक्त केलेल्या मताशी समिती सहमत होवू शकत नाही, उलट समितीचे असे मत आहे की, अलीकडे जिल्हा परिषदेवर सोपविण्यात येत

असलेल्या जबाबदाऱ्या विचारत घेवून शासनाने स्वतःहून राज्य स्तरावरुन या संदर्भात एक सर्वंकष आढावा घेवून जिल्हा परिषदांना बांधकाम व लघुपाटबंधाऱ्याच्या कामासाठी आवश्यक असलेल्या उपविभागाचा आढावा घेवून त्यांना मागणी प्रकरणी उपविभाग मंजूर करण्याचे दृष्टीने यापूर्वीच धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक होते.

सध्या **संपूर्ण राज्यात १८८ उपविभाग असून आणखी १६८ उपविभाग मंजूर करण्याबाबत जिल्हा परिषदांनी मागणी केली आहे. त्यापैकी आतापर्यंत केवळ ३५ विभाग शासनाने मंजूर केले असले तरी अद्याप १२८ उपविभाग निर्माण करणे बाकी आहेत. ही बाब विचारात घेता शासनाने याबाबत त्वरीत निर्णय घेण्याचे दृष्टीने वित्त विभाग, नियोजन विभाग व ग्रामविकास विभागाने एकत्रित बसून त्वरीत निर्णय घ्यावा तसेच कोल्हापूर जिल्हा परिषदेने उपविभागांना मंजूरी मिळण्याबाबत केलेल्या विनंतीनुसार शासनाने मंजूर केलेल्या ३५ उपविभागापैकी काही उपविभाग कोल्हापूर जिल्हा परिषदेला मंजूर करावेत अशी समितीची शिफारस आहे. सबब, या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.**

प्रकरण चार - एक

नाशिक, जिल्हा परिषद

इगतपुरी पंचायत समितीमध्ये झालेल्या अपहाराबाबत

पंचायती **राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक-१ च्या अनुषंगाने दिनांक २९ सप्टेंबर, २०१० रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी समितीने जिल्हा परिषदेस व पंचायत समिती स्तरावर अफरातफरीच्या प्रकरणाबाबत माहिती घेताना समितीला अशी माहिती देण्यात आली की, खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

इगतपूरी पंचायत समिती अंतर्गत शिक्षण व लेखा विभागात सन २००२-२००३ ते २००६-२००७ या कालावधीत गैरव्यवहार व अपहार झालेला आहे. सदर प्रकरणी तपासणी पथकाने अंतिम अहवाल सादर केला असुन अहवाला नुसार अपहारीत रक्कम रु. १,१५,१२,६६३/- दर्शविण्यात आली आहे त्यापैकी रक्कम रुपये १,१४,४५,७९५/- वसुल पात्र दर्शविण्यात आली आहे त्यापैकी रक्कम रुपये ५९३५८९/- एवढी रक्कम अनामत लेखा शिर्षा खाली जमा केली आहे तसेच तालुका मास्तर यांचेकडील असंवितरीत रक्कम रुपये ५,४५,३०१/- व लेखा बाहेरील रक्कम रुपये १,३१,७४३/- एवढी रक्कम पंचायत समिती लेखा मध्ये जमा करणेत आली आहे. वसुलीबाबत कार्यवाही चालु आहे. सदर प्रकरणात एकूण १० अधिकारी/कर्मचारी दोषी म्हणुन आढळून आले असुन दोन जणावर फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. १) श्री.बी.ए.बोटे, तत्कालीन, गट विकास अधिकारी पंचायत समिती, इगतपुरी यांच्या विरुद्ध कार्यवाही प्रस्तावीत केली आहे २) श्री.एम.बी.डगळे से.नि.गशिअ पं.स. इगतपुरी यांच्या विरुद्ध शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनास म.रा.पुणे यांच्याकडे दोषारोप १ ते ४ सादर करण्यात आले आहे ३) श्री.खेताडे तालुका मास्तर पं.स.इगतपुरी यांना दिनांक १४/११/०७ अन्वये जिल्हा परिषद सेवेतून निलंबित केले आहे ४) श्री.महाजन उप.शि.पं.स. त्र्यंबकेश्वर यांना दिनां क २/८/०८ रोजी सेवेतून निलंबित केले आहे ५) श्री.सुरेश धर्मा ब्राम्हणकर ता.मालेगांव यांना दिनांक ८/८/०८ रोजी सेवेतून निलंबित केले आहे ६) श्री.डुकले सहा.ले.अ.प.स.इगपुरी यांना दिनांक ३०/१/०७ रोजी सेवेतून निलंबित केले आहे ७) श्री.वि.आर.विसपुते यांना दिनांक १३/८/०८ रोजी सेवेतून निलंबित केले आहे ८) श्री.एम.यु.आरक कनि.सहा (लेखा) यांना दिनांक ८/८/०८ रोजी सेवेतून निलंबित केले आहे ९) श्री.दि.आर.भोरस. वरि.सहा.लेखा यांना दिनांक १३/८/०८ रोजी सेवेतून निलंबित केले आहे १०) श्री.ए.आर.खान यांना दिनांक १३/८/०८ रोजी सेवेतुन निलंबित केले आहे. प्रस्तावित प्रकरणाचा निपटारा करण्याच्या दृष्टीने विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली असुन अद्याप निर्णय प्रलंबित असुन विभागीय चौकशीचे अधिन राहुन वरीलपैकी ७ कर्मचाऱ्यांना पुर्नस्थापित करण्यात आले आहे.

समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी जिल्हा परिषदेचे अधिकारी यांच्याकडून समितीस खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

इगतपूरी पंचायत समितीमध्ये शिक्षण व लेखा विभागात २००२ ते २००७ या कालावधीत जवळजवळ दोन ते अडीच कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे, म्हणजेच एकाच शिक्षकाना अनेकदा ५-५ हजार रुपये रजा प्रवास

सवलतीच्या स्वरुपात दिलेले आहेत. या घोटाळयामध्ये एकूण १० अधिकारी/कर्मचारी दोषी असल्याचे आढळून आले. परंतु त्यातील केवळ २ व्यक्तींवरच गुन्हे दाखल केले गेले. यात प्रथम रुपये २ कोटी १९ लाख एवढ्या रकमेचा अपहार झाल्याचे आढळून आले. परंतु, नंतर रुपये १ कोटी १२ लाख एवढ्या रकमेचा अपहार झाल्याची खातरजमा करण्यात आली, म्हणजेच अपहाराची रक्कम रुपये २ कोटी असताना ती रुपये १ कोटी १२ लाख एवढी कशी कमी झाली, शिवाय या गैरव्यवहाराबाबत विशेष लेखा परीक्षण सुद्धा झालेले आहे. याचा समिती समोर खुलासा करताना प्रारंभी या गैरव्यवहारातील संशयित अंदाजित रक्कम १२ कोटी ३३ लाख रुपये होती, नंतर अंतिम अहवालानुसार ती रुपये १,१५,१२,३६३/- एवढी दर्शविण्यात आली. यापैकी रुपये १,१४,४५,७९५/- वसूल पात्र दर्शविण्यात आले. यापैकी तालुका स्तरावर आतापर्यंत ४० लाख रुपये वसूल झालेले आहेत. तत्कालीन तालुका मास्तर शिक्षकांचे पगार पत्रक तयार करीत होते. त्यांनी वारंवार एकापेक्षा जास्त देयके तयार करुन, पैसे उचलले. या प्रकरणात गुंतलेल्या काही कर्मचाऱ्यांना निलंबित केले असून, काही कर्मचाऱ्यांवर कलम-१०४ अन्वये कारवाई करण्यात आली आहे, अशी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस भेटीच्या वेळी माहिती दिली.

पंचायत समिती इगतपुरीचे सन २००६-२००७ चे नियमित लेखा परिक्षण दिनांक ११/९/२००७ ते १६/१०/२००७ या कालावधीत करीत असताना, तालुका मास्तर किंवा संबंधित अधिकाऱ्यांनी गट विकास अधिकाऱ्यांकडे जी देयके सादर केली होती, ती देयके वारंवार सादर करुन रक्कम उचलली होती. वित्त विभागाच्या दिनांक १९ जून, १९९५ रोजीच्या परिपत्रकानुसार विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा संबंधित संस्थेचे प्रमुख अधिकारी यांनी मागणी केल्यानुसार तत्कालीन मुख्य लेखा परीक्षकांनी पंचायत समिती इगतपुरीचे दिनांक २२/०१/२००८ ते १९/०४/२००८ या कालावधीत विशेष लेखा परीक्षण केले. सदर अहवालानुसार रुपये २,१९,१४,२३३/- इतकी रक्कम अंतिम अमान्य व रुपये ११,६१,११,८८०/- इतकी रक्कम तात्पुरती अमान्य करण्यात आली. परंतु जिल्हा परिषदेची २ कोटी १९ लाख रुपयांऐवजी १ कोटी १५ लाख रुपये वसुलपात्र रक्कम आहे असे निदर्शनास आले. वास्तविक विशेष लेखा परीक्षण अहवालाच्या आधारे जिल्हा परिषदेने योग्य ती कार्यवाही करणे गरजेचे होते असे सहाय्यक मुख्य लेखा परिक्षकांनी समिती समोर स्पष्ट केले.

समितीने २ कोटी १९ लाख रुपयांचा निश्चितपणे अपहार झालेला आहे ही बाब लेखा अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांच्या निदर्शनास यावयास हवी होती. तसेच जिल्हा परिषदेच्या खात्यातून १३ कोटी रुपये काढले जात असताना मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांचे त्यावर नियंत्रण नव्हते काय, व केवळ दोघांवर गुन्हे दाखल केले असून, इतरांना पुन्हा सेवेत सामावून घेतले आहे या समितीच्या आक्षेपाच्या अनुषंगाने अधिकारी/कर्मचाऱ्यांचे निलंबन केल्यानंतर, एक वर्षांनी आयुक्त स्तरावर आढावा घेतला गेला व इगतपुरी पंचायत समितीमध्ये श्री.एम.बी.डगळे नावाचे गट शिक्षणाधिकारी होते त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत असा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समिती समोर खुलासा केला. या गैरव्यवहारास गट शिक्षणाधिकारी आणि तालुका मास्तर हे प्रमुख जबाबदार आहेत. शिवाय श्री.बोटे, तत्कालीन गट विकास अधिकारी, श्री.एम.बी.टगळे, तत्कालीन गट शिक्षणाधिकारी, श्री.खेताडे, तालुका मास्तर, श्री.महाजन, उप शिक्षक, पंचायत समिती, इगतपुरी, श्री.सुरेश ब्राम्हणकर, श्री.डकुले, सहाय्यक लेखा

अधिकारी, पंचायत समिती, इगतपुरी, श्री.व्ही.आर.विसपुते, श्री.एम.यु.आरब, कनिष्ठ सहाय्यक (लेखा), श्री.डी.आर.भोरस, वरिष्ठ सहाय्यक (लेखा) आणि श्री.ए.आर.खान हे अधिकारी/कर्मचारी या गैरव्यवहारास जबाबदार होते. श्री.बोटे, तात्कालीन गट विकास अधिकारी व श्री.डगळे, तत्कालीन गट शिक्षाणाधिकारी वगळता इतर ८ कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले होते अशी समितीस माहिती दिली.

इगतपुरी पंचायत समितीचे ज्या वेळी लेखा परीक्षण झाले होते त्यावेळी मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी (लेखा) यांनी अंतिम व तात्पुरत्या आक्षेपाची रक्कम रुपये १३,८०,४८,९०२/- एवढी दाखविली होती. लेखा परीक्षणाच्या वेळी आवश्यक दप्तर उदा. पगार पत्रक वगैरे दाखवीले नव्हते. परंतु त्याबाबत कार्यवाही केली आहे. या प्रकरणी अपहाराची रुपये ११,७६,९३,७६३/- इतकी रक्कम अमान्य असून वसूल पात्र रक्कम रुपये २,०३,५५,१३६/- इतकी आहे. वसूल पात्र रक्कमेपैकी आतापर्यंत रुपये ४६,६४,८९२/- वसूल झालेले आहेत. शिवाय आदिवासी प्रोत्साहन भत्त्याबाबतची दाखले प्राप्त करुन घेतलेले असून, ते सादर केल्यास, उर्वरित वसूल पात्र रक्कमेतून रुपये १,१०,६०,५६७/- कमी होतील. ती रक्कम वजा केल्यानंतर या प्रकरणातील सद्यःस्थितीत वसूल पात्र रक्कम रुपये ४६,२९,६७७/- राहील असा तत्कालीन गट विकास अधिकारी यांनी समिती समोर खुलासा केला तसेच तत्कालीन गट विकास अधिकाऱ्यावरील आरोपत्र तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे असे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) यांनी समिती समोर स्पष्ट केले.

समितीने या प्रकरणाच्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सखोल अभ्यास करुन समितीला अहवाल द्यावा जेणेकरुन अहवाल आल्यानंतर संबंधित सचिवांची साक्ष लावून संबंधितांवर योग्य ती कारवाई करता येईल असे सुचित केल्यावर, या प्रकरणामध्ये प्रत्यक्षात ११,१६,४९८/- रुपयांचा अपहार झाल्याचे दिसून येते. १,१५,७५४/- रुपयांचे शिक्षक-शिक्षकांना रजा प्रवास सवलतीचे दुबार प्रदान वसुल रुपये ५७,७१८/-, ७८,०६०/- पती-पत्नी रजा प्रवास सवलत -१६ शिक्षक/शिक्षिका रुपये ७८,०६०/- देण्यात आला होता, रुपये १,१७,०००/- उपस्थिती भत्ता गैरव्यवहार, रुपये ५३,७८७/- तालुकामास्तर कार्यालयाच्या रोखवहीत अनियमिततेबाबत ४६,३१८/- रुपये अतिप्रदान प्रोत्साहन भत्ता, श्री.विजय बाळासाहेब पगारे, यांना प्रतिनियुक्तीबाबत प्रोत्साहन भत्ता देण्यात आला होता. रुपये १,७९५/- नियमाबाह्य प्रोत्साहन भत्ता श्री.शिवाजी देवाजी गांगुर्डे यांना देण्यात आला होता तो पूर्णपणे वसूल करण्यात आलेला आहे. अशी एकूण ११,१६,४९८/- रुपयांची रक्कम आहे असे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले. या प्रकरणाच्या संदर्भात ग्रामविकास सचिव, शिक्षण सचिव तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात येईल व नंतर या प्रकरणाच्या संदर्भात योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

या अपहार प्रकरणाच्या संदर्भात अधिक माहिती घेण्यासाठी ४-५ मुद्दे लेखा परिक्षकांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी तसेच विभागीय आयुक्तांना सादर केलेले आहेत. १) त्यांनी सादर केलेल्या अहवालावर शासनाने काय कारवाई केले आहे, केलेल्या कारवाईची माहिती शासनाला माहिती झालेली आहे काय, असल्यास, ती केव्हा झाली व त्याबाबत शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली, २) विशेष लेखा परीक्षकांनी कोणकोणत्या त्रुटी निदर्शनास आणून दिल्या, ३) सदर प्रकरणात गुंतलेल्यांची नावे व हुद्दे काय आहेत, ४) सदर तपासणी अहवालमध्ये

किती रक्कमेचा अपहार झालेला आहे, ५) सदर लेखा परिक्षणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांकडून काय कारवाई करण्यात आली,

६) सदर प्रकरणात जबाबदार असणाऱ्यांकडून अपहाराची किती रक्कम वसूल करण्यात आली आहे, नसल्यास, विलंब लागण्याची कारणे काय आहेत, या उपरोक्त मुद्यांची चौकशी करुन त्याचा सविस्तर अहवाल समितीला देण्यात यावा व या अहवालाच्या आधारे समिती ग्रामविकास विभाग, शालेय शिक्षण विभाग, सामान्य प्रशासन विभागाच्या सचिवांची साक्ष घेईल असा निर्णय भेटीच्या वेळी दिला.

समितीने भेटीच्या वेळी घेतलेली माहितीच्या अनुषंगाने दिनांक २९ सप्टेंबर, २०११ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी जिल्हा परिषदेकडून खालील मुद्यांची माहिती मागविली.

जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडून उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने खालील माहिती प्राप्त झाली.

विशेष लेखा परिक्षणात एकूण

अहवालानुसार वसूलपात्र रक्कम	**माहे ऑगस्ट, २०११ अखेर झालेली वसूली**	**थकित रक्कम**	**वसूल केलेल्या रकमेची टक्केवारी**
१	**२**	**३**	**४**
९२९४५९९	६४३२५२८	२८६२०७१	६९.२१
गुंतलेले अधिकारी कर्मचारी व शिक्षक			
अ.क्र.	**अधिकारी**	**कर्मचारी**	**शिक्षक**
१	२	६	६६४

तालुका मास्तर यांनी तयार केलेले पगारपत्रक शिक्षण विभागातील कर्मचारी, गटशिक्षणाधिकारी तसेच तालूकास्तरावरील लेखा विभाग तपासणी करुन वेतन देयके गटविकास अधिकारी मंजूर करत असत. वेतन देयकामध्ये शिक्षकांच्या संख्येचे प्रमाण इतर संवर्गाच्या तुलनेत फार अधिक असल्याने सदर बाब तात्कालीन परिस्थितीत निदर्शनास आली नाही.

शासनाने केलेली कारवाई :

अ.क्र.	**अधिकारी/कर्मचारी नांव**	**हुद्दा**	**वर्ग**	**केलेली कारवाई**
१	श्री.बी.ए.बोटे	तत्कालीन गटविकास अधिकारी	वर्ग-१	शासनस्तरावर खाते चौकशी प्रस्तावीत
२	श्री.मारुती बहीरु डगळे	तत्कालीन गटशिक्षणाधिकारी	वर्ग-२	निलंबन, फौजदारी गुन्हा दाखल सेवानिवृत्त
३	श्री.झुंबर सिताराम खेताडे	तत्कालीन तालुका मास्तर	वर्ग-३	निलंबन, फौजदारी गुन्हा दाखल
४	श्री.अे.आर.अरब	तत्कालीन रोखपाल	वर्ग-३	निलंबन, फौजदारी गुन्हा दाखल
५	श्री.आर.बी.डुकले	तत्कालीन सहाय्यक लेखाधिकारी	वर्ग-३	निलंबन, पुर्नस्थापित
६	श्री.अे.आर.खान	क.सहाय्यक	वर्ग-३	निलंबन, पुर्नस्थापित

७	श्री.टि.आर.भोरस	व.सहाय्यक (लेखा)	वर्ग-३	निलंबन, पुर्नस्थापित
८	श्री.रत्नाकर पंढरीनाथ महाजन	प्राथमिक शिक्षक	वर्ग-३	निलंबन, पुर्नस्थापित
९	श्री.सुरेश धर्मा ब्राम्हणकर	प्राथमिक शिक्षक	वर्ग-३	निलंबन, पुर्नस्थापित
१०	श्री.व्हि.आर.विसपूते	तत्कालीन कनिष्ठ लेखाधिकारी जिल्हा परिषदस्तर	वर्ग-३	निलंबन, पुर्नस्थापित करुन खातेचौकशी सुरु आहे

६६४ शिक्षकांकडून रक्कम रुपये ६४३२५२८/- मात्र वसुल करण्यात आलेली आहे. उर्वरित रक्कमेची शिक्षकांकडून वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

विशेष लेखा परिक्षकांनी निदर्शनास आणुन दिलेल्या त्रुटी

१. ४ था व ५ वा वेतन आयोग रक्कम गैरप्रदान.

२. रजा प्रवास सवलत गैरप्रदान.

३. उपस्थिती भत्ता गैरप्रदान.

४. नियमबाह्य प्रोत्साहन पर भत्ता प्रदान.

५. अतिरिक्त घरभाडे प्रदान.

६. आगाऊ वेतनवाढ फरक गैरप्रदान.

७. उपदान, अंशराशीकरण, निवृत्तीवेतन जादा प्रदान.

८. गैरहजर काळातील वेतन व भत्ते प्रदान करणे.

९. निलंबन काळात पुर्ण दराने वेतन अदा करणे.

१०. असंवितरीत रक्कमेचा भरणा न करणे.

११. स्वग्राम भत्ता नियमाबाह्य प्रदान करणे इत्यादी

उपरोक्त त्रुटी बाबत खालील नमुद १ ते १० अधिकारी/कर्मचारी यांचेपैकी ज्यांचे कार्यकाळात सदरील अपहार प्रकरण घडले आहे त्यांना तात्काळ निलंबित करण्यात आलेले होते अशा अधिकारी व कर्मचारी यांची नावे खालीलप्रमाणे.

अ.क्र.	**अधिकारी/कर्मचारी नांव**	**हुद्दा**	**वर्ग**	**केलेली कारवाई**
१	श्री.बी.ए.बोटे	तत्कालीन गटविकास अधिकारी	वर्ग-१	शासनस्तरावर खातेचौकशी प्रस्तावीत
२	श्री.मारुती बहीरु डगळे	तत्कालीन गटशिक्षणाधिकारी	वर्ग-२	निलंबन, फौजदारी गुन्हा दाखल सेवानिवृत्त
३	श्री.झुंबर सिताराम खेताडे	तत्कालीन तालुका मास्तर	वर्ग-३	निलंबन, फौजदारी गुन्हा दाखल
४	श्री.अे.आर.अरब	तत्कालीन रोखपाल	वर्ग-३	निलंबन, फौजदारी गुन्हा दाखल
५	श्री.आर.बी.डुकले	तत्कालीन सहाय्यक लेखाधिकारी	वर्ग-३	निलंबन, पुर्नस्थापित
६	श्री.अे.आर.खान	क.सहाय्यक	वर्ग-३	निलंबन, पुर्नस्थापित
७	श्री.टि.आर.भोरस	व.सहाय्यक (लेखा)	वर्ग-३	निलंबन, पुर्नस्थापित
८	श्री.रत्नाकर पंढरीनाथ महाजन	प्राथमिक शिक्षक	वर्ग-३	निलंबन, पुर्नस्थापित

९	श्री.सुरेश धर्मा ब्राम्हणकर	प्राथमिक शिक्षक	वर्ग-३	निलंबन, पुर्नस्थापित
१०	श्री.व्हि.आर.विसपूते	तत्कालीन कनिष्ठ लेखाधिकारी जिल्हा परिषदस्तर	वर्ग-३	निलंबन, पुर्नस्थापितकरुन खातेचौकशी सुरु आहे

अहवालानुसार वसुलपात्र रक्कम	माहे ऑगस्ट, २०११ अखेर झालेली वसुली	थकित रक्कम	वसुल केलेल्या रक्कमेची टक्केवारी
१	२	३	४
९२९४५९९	६४३२५२८	२८६२०७१	६९.२१

शासन स्तर

अ.क्र.	अधिकारी/कर्मचारी नांव	हुद्दा	वर्ग	केलेली कारवाई
१	श्री.बी.ए.बोटे	तत्कालीन गटविकास अधिकारी	वर्ग-१	शासनस्तरावर खातेचौकशी प्रस्तावीत
२	श्री.व्हि.आर.विसपूते	तत्कालीन कनिष्ठ लेखाधिकारी जिल्हा परिषदस्तर	वर्ग-३	निलंबन, पुर्नस्थापितकरुन खातेचौकशी सुरु आहे
३	श्री.मारुती बहीरु डगळे	तत्कालीन गटशिक्षणाधिकारी	वर्ग-२	निलंबन, फौजदारी गुन्हा दाखल सेवानिवृत्त
४	श्री.झुंबर सिताराम खेताडे	तत्कालीन तालूका मास्तर	वर्ग-३	निलंबन, फौजदारी गुन्हा दाखल
५	श्री.अे.आर.अरब	तत्कालीन रोखपाल	वर्ग-३	निलंबन, फौजदारी गुन्हा दाखल
६	श्री.आर.बी.डुकले	तत्कालीन सहाय्यक लेखाधिकारी	वर्ग-३	निलंबन, पुर्नस्थापित
७	श्री.अे.आर.खान	क.सहाय्यक	वर्ग-३	निलंबन, पुर्नस्थापित
८	श्री.टि.आर.भोरस	व.सहाय्यक (लेखा)	वर्ग-३	निलंबन, पुर्नस्थापित
९	श्री.रत्नाकर पंढरीनाथ महाजन	प्राथमिक शिक्षक	वर्ग-३	निलंबन, पुर्नस्थापित
१०	श्री.सुरेश धर्मा ब्राम्हणकर	प्राथमिक शिक्षक	वर्ग-३	निलंबन, पुर्नस्थापित

सदरील लेखा परिक्षण कालावधीमध्ये कार्यरत असलेल्या सर्व गट शिक्षणाधिकारी यांची संयुक्त विभागीय चौकशी प्रस्तावित आहे. तसेच आजपावेतो एकुण अपहारीत रक्कम रुपये ९२.९४ लक्ष पैकी ६४.३२ लक्ष संबंधिताकडून वसुल करण्यात आलेली आहे.

अहवालानुसार वसुलपात्र रक्कम	माहे ऑगस्ट, २०११ अखेर झालेली वसुली	थकित रक्कम	वसुल केलेल्या रक्कमेची टक्केवारी
१	२	३	४
९२९४५९९	६४३२५२८	२८६२०७१	६९.२१

१. दोन कर्मचाऱ्यांना पदावनत करणे बाबत विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी आदेशित केले आहे.

२. खातेचौकशी अंतिम निर्णय प्रलंबित असलेने अतिप्रदान वसुलीच्या रकमेची जबाबदारी निश्चित करता येत नाही. मात्र ज्या संबंधितांना अतिप्रदान रक्कम अदा झाल्याचे निदर्शनास आले अशा संबंधितांकडून अतिप्रदान रकमा वसुलीची कार्यवाही सुरु असून, आजपावेतोची स्थिती वरीलप्रमाणे आहे.

विभागीय सचिवांची साक्ष :

सन २००२ ते २००७ या कालावधीत इगतपुरी पंचायत समिती अंतर्गत शिक्षण व लेखा विभागात झालेल्या अपहाराबाबतचा प्रश्न आहे. या प्रकरणी वसूलपात्र रक्कम ९२ लाख ९४ हजार रुपये एवढी होती, त्यातील ६४ लाख ३२ हजार रुपयांच्या रक्कमेची वसुली झालेली आहे. जवळपास ७० टक्के वसुली झालेली आहे. या प्रकरणी ज्या अधिकारी आणि कर्मचारी यांनी रक्कमेचा अपहार केलेला आहे. त्यांच्याविरोधात कारवाई केली आहे. काही कर्मचारी व अधिकारी यांच्याकडून सदर रक्कम हप्त्याने वसूल केली जात असल्यामुळे २८ लाख रुपयांची वसुली व्हावयाची आहे आणि यात चौथा व पाचवा वेतन आयोग रक्कम गैरप्रदान, रजा प्रवास सवलत गैरप्रदान, उपस्थिती भत्ता गैरप्रदान, नियमाबाह्य प्रोत्साहनपर भत्ता प्रदान, अतिरिक्त घरभाडे प्रदान, उपदान, अंशराशीकरण, निवृत्तीवेतन जादा प्रदान इत्यादी ११ लेखा बाबींचा उल्लेख आहे. या प्रकरणी पंचायत समितीमधील त्या रोखपाल, सहाय्यक लेखाधिकरी यांचे विरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. लेखा विभागाचे पर्यवेक्षण अधिकारी म्हणून मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांवर सुध्दा जबाबदारी निश्चित करता येऊ शकते असा विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी समिती समोर खुलासा केला. समितीने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी जाणीवपूर्वक सदर पंचायत समितीला भेट दिली नसल्याने त्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन या प्रकरणाबाबत त्यांच्या सेवापुस्तकात नोंद झाली पाहिजे. अशा वरिष्ठ अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस जारी केली तर अशा बाबतीत ते आवर्जून लक्ष घालतील आणि असे प्रकार भविष्यात कमी होतील, म्हणून या प्रकरणी त्यांना कारणे दाखवा नोटीस इश्यू करावी असे मत व्यक्त केले असता, या प्रकरणी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनाही कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येईल तसेच तत्कालीन गटविकास अधिकारी श्री.बोटे यांची खातेनिहाय चौकशी सुरु आहे व श्री.डगळे, तत्कालीन गटशिक्षणाधिकारी यांना निलंबित करुन त्यांचे विरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे. तथापि, ते सन २००९ मध्ये सेवानिवृत्त झाले आहेत व त्यांचे विरुद्ध खातेनिहाय चौकशी सुरु असुन त्यांचे निवृत्तीवेतन थांबविण्यात आली आहे. या प्रकरणी एक तालुका मास्तर आणि रोखपाल यांच्या विरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. काही कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले होते. तथापि, त्यांना पुन्हा सेवेत घेण्यात आले असून त्यांची खातेनिहाय चौकशी सुरु आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीसमोर स्पष्ट केले. पुढे त्यांनी सदरहू खातेनिहाय चौकशीबाबत समितीसमोर खुलासा करताना यातील काही प्रकरणे एकत्रित आहेत. काही प्रकरणे फौजदारी गुन्ह्याच्या स्वरुपातील आहेत. काही प्रकरणात ज्यांनी प्रत्यक्ष गैरव्यवहार केला आहे, त्यांच्या संदर्भातील आहेत, काही प्रकरणे खातेनिहाय चौकशीची आहेत. त्यामुळे निश्चित कालावधी सांगता येणार नाही. परंतु खातेनिहाय चौकशीची प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्यात येतील असे समितीसमोर स्पष्ट केले. ज्यावेळी लेखा परीक्षण झाले होते, त्यावेळी मुख्य लेखा परीक्षक. स्थानिक निधी लेखा यांनी अंतिम व तात्पुरत्या आक्षेपांची रक्कम १३ कोटी ८० लाख ४८ हजार ९०२ दाखविली होती. नंतर या प्रकरणी अपहाराची ११ कोटी ७६ लाख ९३ हजार ७६३ रुपये इतकी रक्कम अमान्य असून वसुल पात्र रक्कम २ कोटी ३ लाख ५५ हजार १३६ रुपये इतकी दाखविली आहे. वसुल पात्र रक्कमेपैकी ४६ लाख ६४ हजार ८६२ रुपये वसुल झाले आहेत. आता किती रक्कम वसुल करावयाची राहिली आहे, या समितीच्या प्रश्नावर विभागीय सचिवांनी २८ लाख ६२ हजार रुपये वसुल करावयाची आहे, अशी समितीस माहिती दिली. वसुल पात्र रक्कम ९२ लाख एवढी

आहे आणि श्री.बोटे, तत्कालिन गटविकास अधिकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार वसुल पात्र रक्कम १ कोटी १० लाख ५६७ रुपये एवढी आहे या आकडेवारीमध्ये तफावत दिसून येते. या समितीच्या प्रश्नावर वसुल पात्र रक्कम ९२ लाख रुपये एवढी होती, त्यातील ४६ लाख ८४ हजार ८९२ रुपयांची रक्कम वसुल करण्यात आली असून २८ लाख रुपयांची वसुल करावयाची आहे. तसेच गटविकास अधिकारी श्री.बोटे यांनी चुकीचा कम्पायन्स कसा दिला याबद्दल संबंधितांकडून खुलासा घेण्यात येईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी भेटीच्या शेवटी सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :

इगतपुरी पंचायत समिती अंतर्गत शिक्षण विभागात व लेखा विभागात सन २००२ ते २००७ या कालावधीत झालेल्या वित्तीय अपहाराबाबत विशेष लेखा परिक्षण करण्यात आले त्यात अपहारीत तसेच वसुलपात्र रक्कमेत वेळोवेळी फेरफार आणून झाले आहेत.

समितीने जिल्हा परिषदेस भेट दिली त्यावेळी जिल्हा परिषदेकडून माहिती घेण्यात आली त्यांनतर विभागीय सचिवांच्या आयोजित साक्षीच्या अनुषंगाने माहिती प्राप्त झाली व नंतर विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली यात समितीस अपहारीत तसेच वसुलपात्र रक्कमांची आकडेवारी समितीस वेगवेगळी आढळून आली. सदरहू अपहार हा पाच वर्षांच्या कालावधीतील आहे आणि एवढ्या मोठ्या कालावधीतील हा अपहार जिल्हा परिषदेच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या निदर्शनास कसा आला नाही याबाबत समिती सखेद आश्चर्य व्यक्त करीत आहे.

. या प्रकरणी जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी या पंचायत समितीस हेतुपुरस्सर भेट दिलेली नाही, त्यांनी जर सदर पंचायत समितीस नियमितरीत्या भेटी देवून लेखा व परिक्षण केले असते तर जिल्हा परिषदे वा या पंचायत समितीचे विशेष लेखा परिक्षण करण्याची वेळ आली नसती व एवढ्या मोठ्या प्रमाणावर झ ालेल्या आर्थिक गैरव्यवहारही झाला नसता असे समितीचे स्पष्ट मत झालेले आहे.

सबब, **याप्रकरणी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना त्यांच्या कर्तव्यात कसुर केल्याबाबत त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचेकडून खुलासा घेवून त्यानुसार त्यांचे विरुद्ध कारवाई करण्यात यावी व त्याबाबतची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

याबाबत, **जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी पंचायत समितीस हेतुपुरस्सर भेटी न दिल्यामुळे झालेल्या गैरव्यवहाराप्रकरणी त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर आवश्यक कारवाई करण्यात यावी तसेच, राज्यातील प्रत्येक जिल्हा परिषदेने पंचायत समित्यांचे लेखापरिक्षण नियमितरित्या करण्याबाबत त्यांना स्पष्ट सूचना देण्यात याव्यात. पंचायत समित्यांच्या भेटीचे वेळी समितीने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी पंचायत समितीला भेट देवून कार्यक्रम अंदाजपत्रकाची पहाणी करुन तेथील कर्मचाऱ्यांना अंदाजपत्रक तयार करण्याबाबत मार्गदर्शन केले आहे किंवा काय याबाबत समितीला मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी बहुतेक ठिकणी भेटी दिल्या नसल्याचे अथवा भेटी देवूनही तेथील कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन केले नसल्याचे दिसून आले आहे. सबब, यासंदर्भात शासनाने सविस्तर परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात व त्याबाबतची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

उपरोक्त प्रकरणी झालेल्या अपहारामध्ये एकूण १० अधिकारी व कर्मचारी गुंतले असून त्यापैकी तत्कालीन गट विकास अधिकारी यांची शासन स्तरावरुन चौकशी सुरु आहे, ३ कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध निलंबनाची कारवाई करुन फौजदारी गुन्हा दाखल केला आहे तर ५ कर्मचाऱ्यांना निलंबित करुन त्यांना पुन्हा सेवेत दाखल करुन घेतले असून एका कर्मचाऱ्याला निलंबित करुन पुन्हा सेवेत दाखल करुन घेवून त्याची विभागीय चौकशी सुरु केली आहे तर एका कर्मचाऱ्याला निलंबित करुन त्याचे विरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. परंतु, सदर कर्मचारी सेवानिवृत्त झालेला आहे असे समितीला साक्षीच्या वेळी सांगण्यात आले होते ही बाब लक्षात घेता शासन स्तरावर तत्कालीन गट विकास अधिकारी यांची चौकशी सुरु आहे ती त्वरीत पुर्ण करुन त्यानुसार त्यांचे विरुद्ध कारवाई

करण्यात यावी व उर्वरित कर्मचाऱ्यांची सुरु असलेली चौकशी विहित कालमर्यादेत पुर्ण करावी व जे कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत त्यांचे विरुद्ध यासंदर्भात असलेल्या स्थायी आदेशानुसार त्यांची विभागीय चौकशी ते सेवानिवृत्त झाले असले तरी करावी. उक्त प्रत्येक प्रकरणात केलेल्या कारवाईची व संबंधिताकडून वसुल व्हावयाच्या रक्कमे संदर्भातील सविस्तर माहिती तीन महिन्यात समितीला देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

प्रकरण चार - दोन

नाशिक, जिल्हा परिषद

रोजगार हमी योजनअंतर्गत घेतलेल्या लघु पाटबंधाऱ्याच्या कामात झालेला गैरव्यवहारबाबत

पंचायती **राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक-१ च्या अनुषंगाने दिनांक २९ सप्टेंबर, २०१० रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

लघु पाटबंधारे विभाग (पूर्व): जिल्हा परिषदेतील लघु पाटबंधारे पुर्व विभागांतर्गत रोजगार हमी योजनेअंतर्गत कामावरील गैरव्यवहाराबाबत दि.३१/३/२००९ अखेर ०५ प्रकरणे प्रलंबित आहेत. सदर ५ प्रकरणांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत समितीला पुरविलेली माहिती खालील प्रमाणे आहे.

१) गावतळे सुरेगाव रु.१७४३१/- २) गावतळे ईंद्रायवाडी रु.९७५५२/- ३) गावतळे मांजरे रु.२२४०२७/- व गावताळे सावकारवाडी रुपये ११२७३२/- ४) पाझर तलाव अजंदेपाडा रुपये २०७८०/- ५) गावतळे रावळगाव (पवारवस्ती) रुपये २१७५८८/- असे एकूण रुपये ६९०११०/- रक्कम गुंतलेली आहे त्यापैकी आतापर्यंत पा.त.अजंदेपाडा या कामावारील रक्कमेपैकी रुपये ९७३७/- इतकी रक्कम वसुल झालेली आहे. सदर पाच प्रकरणांमध्ये एकूण १८ कर्मचारी व अधिकारी दोषी असल्याचे आढळून आल्याने त्यांच्याविरुद्ध दोषारोप परिशिष्ट १ ते ४ म.जिल्हाधिकारी नाशिक यांना सादर करण्यात आलेले आहे, त्यानुसार अपचारी यांचे विरुद्ध शासन/म.विभागीय आयुक्त स्तरावरुन चौकशी करण्याची कार्यवाही त्यांचे स्तरावर चालु आहे. सद्यस्थितीत सन २०१०-२०११ मध्ये २ कामांचे चौकशी संबंधि शासन स्तरावर संबंधित अपचारी यांचे विरुद्ध शिक्षेचे आदेश पारित झालेले असुन त्याप्रमाणे कार्यवाही करणेत येत आहे. प्रलंबित प्रकरणाचा निपटारा करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद स्तरावरुन पाठपुरावा सुरु आहे.

लघु पाटबंधारे पश्चिम विभाग : लघु पाटबंधारे विभाग (पश्चिम) जिल्हा परिषद, नाशिक या विभागांतर्गत रोजगार हमी योजना अंतर्गत कामावरील गैरव्यवहार बाबत दिनांक ३१/३/२००९ अखेर १५ प्रकरणे सन १९८७-१९८८ पासुन प्रलंबित आहेत. ही सर्व प्रकरणे रोजगार हमी योजना अंतर्गत कामावरील आहे.

सदर प्रकरणात रु.२६,९,८३७/- एकूण रक्कम गुंतलेली असुन, पैकी पाझर तलाव कोळीपाडा ता.बागलाण रु.६१७८/- गांवतळे डहाळेवाडी (पहिणे) ता.इगतपुरी रु.१८,४४४०/- अशी एकूण रु.२४,६१८/- वसुली झालेली असुन, अद्याप पावेतो रु.२६,७१,२१९/- इतकी रक्कम वसुल व्हावयाची आहे.

वरील सर्व प्रकरणे चौकशीतील असुन, सदर प्रकरणात १११ अधिकारी/कर्मचारी दोषी आढळून आलेले आहे. पैकी बहुतांशी अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त व मयत झालेले आहे. त्यांच्या विरुद्ध दोषारोप पत्र १ ते ४ म.जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे सादर करण्यात आलेले आहे. त्यानुसार अपचारी यांचे विरुद्ध शासनस्तर/म.आयुक्त स्तरावरुन विभागीय चौकशी करण्याची कार्यवाही त्यांचे स्तरावर चालु आहे.

प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद स्तरावरुन सदर प्रकरणाबाबत पाठपुरावा व उचित कार्यवाही चालु आहे.

समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी जिल्हा परिषदेचे अधिकारी यांच्याकडून समितीस खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

लघु पाटबंधारे पूर्व : १. जिल्हा परिषदेतील लघु पाटबंधारे (पुर्व) जिल्हा परिषद, नाशिक विभागातील रोहयो अंतर्गत घेतलेल्या कामात एकूण रुपये ६,९०,११०/- इतक्या रक्कमेचा गैरव्यवहार झालेला आहे.

लघु पाटबंधारे पश्चिम : १. लघु पाटबंधारे विभाग (पश्चिम) अंतर्गत रोजगार हमी योजनेअंतर्गत एकूण २६,९५,८३०/- रक्कमेचा गैरव्यवहार झाला आहे.

लघु पाटबंधारे पूर्व : २. सदर प्रकरणामध्ये एकूण ४ अधिकारी व १४ कर्मचारी असे एकूण १८ अधिकारी व कर्मचारी जबाबदार आहे.

लघु पाटबंधारे पश्चिम : २. या प्रकरणी ५४ अधिकारी ५७ कर्मचारी असे एकूण १११ अधिकारी/कर्मचारी जबाबदार आहेत.

लघु पाटबंधारे पूर्व : ३. ल.पा. (पूर्व) जिल्हा परिषद, नाशिक गैरव्यवहाराची एकूण ५ प्रकरणे आहेत.

१. गावतळे-मांजरे व सावकारवाडी-सदरची चौकशी म.जिल्हाधिकारी यांचे स्तरावर सुरु आहे.
२. गावतळे (रावळगाव (पवरवस्ती) सदरची चौकशी म.जिल्हधिकारी यांचे स्तरावर सुरु आहे.
३. गांवतळे-इंद्रायणवाडी-चौकशी पूर्ण
४. पाझर तलाव-अजदेपाडी-चौकशी पुर्ण
५. गावतळे सुरेगांव-सदरची चौकशी कार्यालयीन स्तरावर सुरु आहे.

लघु पाटबंधारे पूर्व : ३. एकूण १५ प्रकरणे असुन १११ अधिकारी/कर्मचारी यांना जबाबदार धरण्यात आलेले आहे. पैकी ४ प्रकरणांची चौकशी पूर्ण झाली असून त्यात १२ अधिकारी व ८ कर्मचारी पैकी १ अधिकारी व ६ कर्मचारी यांना दोषी धरण्यात आले आहे.

लघु पाटबंधारे पूर्व : १. गावतळे-मांजरे व सावकरावाडी-एकूण ६ अपचारी कर्मचारी दोषी असुन निलंबन निधी रक्कम रुपये ३,३६,७५९/- इतका आहे. संयुक्त मोजणी अहवाल मंडळ कार्यालयास सादर करण्यात आलेला होता अधीक्षक अभियंता ल.पा. (स्था.स्तर) मंडळ, नाशिक यांचे कडील जा.क्र.अअ/लपा(स्था.स्तर) मं/ना/प्रशा-२/८११/११ दि.२७/३/२०११ अन्वये व महाराष्ट्र शासन पाटबंधारे विभाग शासन परिपत्रक क्र.रोहयो/१०९०/५०७/९०/लपा-२/मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक ६/३/१९९२ अन्वये प्रस्तुत कामामध्ये निलंबन निधी निरंक निश्चित करण्यात आलेला आहे.

२. गावतळे रावळगांव (पवारवस्ती) एकुण ३ अपचारी कर्मचारी दोषी असुन निलंबन निधी रुपये २,१७,५८८/- इतका आहे. यातील एक अपचारी कर्मचारी याचे निधन झालेले असुन दोन अपचारी कर्मचारी याचेवर १ ते ४ बजाविण्यात आलेले होते त्यानुसार सदर कामाची विभागीय चौकशी होवून अपचारी कर्मचारी याचेवर कोणतेही दोषारोप सिद्ध होत नाही असे चौकशी अधिकारी यांनी कळविलेले आहे.

त्याचे अभिवेदन घेवुन जिल्हाधिकारी सो.यांचेकडेस प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत. चौकशी अधिकारी श्री.अ.पा.देशपांडे यांचे कडील पत्र वि.चौ./रोहयो/गा/१८/१० दिनांक ३/१/२०११ अन्वये सदर अपचारी कर्मचारी याचेवर दोषारोप सिद्ध होत नाही तसे जिल्हाधिकारी कार्यालय कळविण्यात आले आहे.

३. गांवतळे-इंदायणवाडी -एकूण ७ कर्मचारी दोषी असुन निलंबन निधी रक्कम रुपये ९७,५५२/- इतका आहे. सदर प्रकरणातील तीन अपचारी कर्मचारी मयत झालेले आहे. दोन अपचारी कर्मचारी हे सेवानिवृत्त झालेले आहे व दोन अपचारी कर्मचारी हे शासन सेवेत कार्यरत आहेत व शासनाकडून वसुलीबाबत आदेश पारीत झ ालेले असुन सदरच्या एका अपचारी कर्मचारी यांचेकडून रुपये १९५७/- रक्कम रुपये वसुली करण्यात आली आहे व एक अपचारी कर्मचारी यांचेकडून वसुली करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

४. पाझर तलाव-अजदेपाडी-एकूण ६ कर्मचारी दोषी असुन निलंबन निधी रक्कम रुपये २०,७८०/- इतका आहे. यातील चार अपचारी सेवानिवृत्त झाले आहेत एक सेवा निवृत्त अपचारी याचे उपदानातून वसुली पात्र रक्कम रुपये ९७३७/- वसुल करण्यात आली व एक अपचारी मयत झालेले आहेत.

५. गावतळे सुरेगांव-सदर प्रकरणांत एकुण १ अपचारी दोषी असुन निलंबन निधी निरंक आहे परंतु मजुरी रक्कम रुपये १७,४३१/- आहे संबंधित मजुर हे त्याचे मजुरी पासुन वंचित राहिल्याचे दिसुन येते असल्याने मजुराच्या मजुरीबाबत शासनाकडून कक्ष अधिकारी मंत्रालय, मुंबई यांचे मार्गदर्शन मागविलेले आहे.

गा.त.इंद्रायवाडी प्रकरणांत शासन स्तरावरुन संबंधित अपचारी यांचे विरुद्ध शिक्षेचे आदेश पारीत झालेले असुन संबंधित अपचारी या विभागात कार्यरत नसल्याने संबंधित अपाचाऱ्याच्या वरिष्ठ कर्यालयाकडे वसुली करणेबाबत पत्रव्यवहाराने कळविलेले आहे त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

लघु पाटबंधारे पश्चिम : चौकशी अंती १ अधिकारी व ६ कर्मचारी यांना दोषी धरण्यात आले असुन, त्यांच्याकडून एकुण रु.२,५४,४५४/- पैकी रु.१८,५६५/- प्रत्यक्षात वसुली झालेली असुन उर्वरित रक्कम रु.२,३५,८८९/- वसुली करणेबाबत कार्यवाही चालु आहे.

उर्वरित ११ चौकशी प्रकरणापैकी २ प्रकरण गा.त.पिंपळपाडा गा.त.जांभुळपाडा व पा.त.उस्थळे ता.पेठ कामांचे चौकशी अधिकरी व सादरकर्ता अधिकारी यांची नेमणुक होऊन, चौकशीची प्रक्रिया पूर्ण झाली असुन अंतिम आदेश बाकी आहे.

८ प्रकरणाचे दोषारोप जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आलेले असुन १ प्रकरणातील मजुरी वाटपांचे फरकाचे सुधारित दोषारोप सादर करणे बाकी आहे. याबाबत फरकाची रक्कम निश्चिती बाबत उपविभागास वारंवार कळविण्यात आले आहे.

६४ अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त झाले असुन ३८ अधिकारी/कर्मचारी मयत झाले आहेत. सदर १५ चौकशी प्रकरणातील १११ अधिकारी/कर्मचारी पैकी फक्त १ अधिकारी व ८ कर्मचारी कार्यरत आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :

प्रकरण प्रलंबित आहे आणि लघु पाटबंधारे (पूर्व)-१ संबंधातील जे प्रकरण आहे ते इंजिनिअर यांच्याकडे प्रलंबित आहे. असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समिती समोर स्पष्ट केले. समितीने ही एकंदर १५ प्रकरणे सन २००५-२००६ मधील असून त्यासंदर्भात जवळजवळ १११ अधिकरी व कर्मचारी यांच्यावर कारवाई सुरु आहे. त्या प्रकरणांच्या जबाबदारी विषयी विचारणा केली, त्यावेळी रोजगार हमी योजनेमध्ये यातील कोणतीही कामे नाहीत. ही कामे संबंधित विभाग करीत असल्यामुळे विभागीय आयुक्तांना शिस्तभंगाच्या संबंधात अधिकार असतात. जर एखाद्या ठिकाणी काही घ्टना घडली किंवा भ्रष्टाचार झाला तर त्यासंबंधात जिल्हधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात येतो. मग त्यांच्याकडून तो आयुक्तांकडे पाठविला जातो. तसेच जर एखाद्या प्रकरणात एकत्रितपणे चौकशी करावयाची असेल आणि त्या संबंधात शासनाकडून मान्यता घ्यावयाची असेल तर ती बाब शासनाकडे पाठविली जाते. जर त्याला शासनाकडून मान्यता मिळाली तर पुढील कार्यवाही केली जाते. अशी विभागीय प्रतिनिधीनी समितीस माहिती दिली. तसेच या संदर्भात प्रधान सचिव, रोजगार हमी योजना व जलसंधारण यांनी रोजगार हमी योजनांच्या संबंधात रोजगार हमी योजनाच जबाबदार आहे व ही प्रकरणे वेगवेगळी असतात. यातील बहुतेक प्रकरणे आयुक्त कार्यालयात त्यांच्या लेव्हलवर सुटतात. जर एखाद्या प्रकरणामध्ये वर्ग-१ अधिकाऱ्यांचा संबंध असेल तर सदरहू प्रकरण सचिव पातळीपर्यंत पाठविले जाते यातील सहा प्रकरणांमध्ये चौकशी करुन वसुली करण्यात आलेली आहे आणि संबंधितांना शिक्षाही झ ालेली आहे अशी साक्षीच्या वेळी समितीस माहिती दिली.

अभिप्राय व शिफारशी :

नाशिक जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे पूर्व व पश्चिम विभागांतर्गत सन १९७९-८० पासून सुमारे ३४ लाख रुपयांचा गैरव्यवहार झालेला असून त्यात दोन्ही विभागांचा समावेश असलेले अधिकारी व कर्मचारी १२९ आहेत, यापैकी लघु पाटबंधारे (पूर्व) अंतर्गत रोजगार हमी योजना कामात रुपये ६,९०,११०/- एवढ्या रक्कमेचा गैरव्यवहार झ ालेला असुन त्यात ४ अधिकारी १४ कर्मचारी असे एकूण १८ जण जबाबदार आहेत व गैरव्यवहाराची एकूण ५ प्रकरणे आहेत व लघु पाटबंधारे (पश्चिम) अंतर्गत रोजगार हमी योजनेच्या कामात रुपये २६,९५,८३०/- एवढ्या रक्कमेचा गैरव्यवहार झालेला असुन त्यात ५४ अधिकारी व ५७ कर्मचारी असे एकूण १११ जण गुंतलेले आहेत. तसेच गैरव्यवहाराची एकूण १५ प्रकरणे आहेत.

सदर गैरव्यवहाराचा कालावधी मोठा असुन त्यात एकूण १२९ अधिकारी/कर्मचारी गुंतलेलेआहेत तसेच सदर बाब जिल्हा परिषदेच्या नजरेस सुमारे ३० वर्षांनी आली आणि यात फार मोठ्या प्रमाणावर अधिकारी/कर्मचारी गुंतलेले असल्याबाबतचा सविस्तर अहवाल समितीस तीन महिन्यात कारवाई करुन पाठविण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीला आश्वासन देऊनही तो अहवाल समितीस सादर न झाल्याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. समितीचा अहवाल तयार होईपर्यंतही प्राप्त होवू शकला नाही त्यामुळे याप्रकरणी निश्चित निकर्षापर्यंत समिती येवू शकली नाही. **सबब, सदरहू अहवाल न पाठविल्याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध जबाबदारी निश्चित करुन कारवाई करावी व त्याबाबतची माहिती समितीला पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

सबब, **सदर बाब गांभिर्याने घेऊन त्यात गुंतलेले अधिकारी/कर्मचारी यांच्यावर अधिकारी/कर्मचारी निहाय केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस त्वरित माहिन्याच्या आत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

याच अनुषंगाने समितीची आणखी अशी शिफारस आहे की, उक्त प्रकरणापैकी बहुतांशी प्रकरणे चौकशीसाठी विभागीय स्तरावर प्रलंबित आहेत, त्या प्रकरणाबाबत सविस्तर चौकशी करुन सदर प्रकरणे निकाली काढण्यात यावीत व त्याबाबतची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

याच अनुषंगाने उपरोक्त गैरव्यवहार प्रकरणी गुंतलेल्या कर्मचाऱ्यांपैकी ४२ कर्मचारी मयत झाले असून ७२ अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत ही बाब विचारात घेता अलिकडेच सवोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार कर्मचारी शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाला तरी त्याच्या विरुद्ध कारवाई करता येते या संदर्भात शासनाचे स्थायी आदेश देखील आहेत असे समजते. **सबब, त्यानुसार निवृत्त झालेल्या ७२ अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुद्ध त्यांनी केलेल्या गैरव्यवहाराच्या / अफरातफरीच्या संदर्भात चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्यात यावी व प्रकरण निहाय केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यात कळविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण पाच - एक

नंदुरबार, जिल्हा परिषद

विद्यार्थ्यांना गणवेश व लेखन सामुग्री देण्याची योजना

समितीने जिल्हा परिषदेकडून सन २००५-२००६ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक-१ च्या संदर्भात जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व लेखन सामुग्री देण्याच्या योजने अंतर्गत जिल्हा परिषदेला सन २००५-२००६ मध्ये शासनाकडून किती रक्कम प्राप्त झाली होती. तसेच, सदर रक्कम केव्हा प्राप्त झाली होती.

या योजने अंतर्गत पंचायत समिती निहाय किती विद्यार्थ्यांना गणवेश व लेखन सामुग्री देण्याचे उद्दीष्ट ठरविण्यात आले होते, तसेच प्रत्यक्षात किती विद्यार्थ्यांना गणवेश व लेखन सामुग्री पुरविण्यात आली व केव्हा,

या योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना गणवेश व लेखन सामुग्री शैक्षणिक वर्ष सुरु होताच पुरविण्यात आली होती काय, ती विलंबाने पुरविण्यात आली असल्यास, किती विलंब झाला व उद्दीष्टा पेक्षा कमी विद्यार्थ्यांना गणवेश व लेखन सामुग्री पुरविण्यात आली असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

शासनाने या योजनेसाठी मंजुर केलेला निधी जिल्हा परिषदेने याच कामासाठी वापरला आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत, तसेच

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सेस फंडातून पुस्तके देण्याबाबत काही योजना राबविण्यात येतात काय, नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, या मुद्यांची माहिती मागविली.

मुख्य **कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने खालील लेखी माहिती समितीस पुरविली.**

सन २००५-२००६ मध्ये शासनाकडून विद्यार्थ्यांना गणवेश व लेखन सामुग्री देण्याच्या योजने अंतर्गत रु.३,५०,०००/- रक्कम प्राप्त झाली होती.

दिनांक २०/३/२००६ अन्वये विद्यार्थ्यांना गणवेश वाटपासाठी दिनांक ३१/३/२००६ अन्वये ग्रामशिक्षण समितीस अनुदान देण्यासाठी एल.सी.द्वारे तालुकास्तरावर अनुदान वितरीत करण्यात आले.

तालुका	अनुदान	लाभार्थी	वाटप केलेले विद्यार्थी
नंदुरबार	९९४७२	३१४६	३१४६
नवापुर	२७८८१	८८०	८८०
तळोदा	२२१३२	७०४	७०४
शहादा	९९४७२	३१४६	३१४६
अक्कलकुवा	१६४८०	८२०	८२०
धडगांव	१४५२७	७८४	७८४

तसेच लेखन साहित्य व पाट्या ४३७५ नग दिनांक ३१/३/२००६ अन्वये पुरविण्यात आले आहेत त्यानुसार रु.७०,०००/- मात्र लेखन साहित्य व पाट्यांसाठी खर्च करण्यात आलेला आहे.

होय, शासनाकडून नियमित नॉन टी.एस.पी. व विषेश घटक ए.सी.पी. या लेखा शिर्षकाखालीच अनुदान प्राप्त झाल्याने उद्दीष्टापेक्षा कमी विद्यार्थ्यांना गणवेश व लेखन सामुग्री पुरविण्यात आली आहे.

होय, ज्या प्रयोजनाने निधी उपलब्ध झाला आहे, त्याच कारणासाठी सदर निधी वापरला असुन विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.

ही योजना राबविण्यात आलेली नाही.

समितीने दिनांक १५ ऑक्टोबर, २०१० रोजी जिल्हा परिषद, नंदुरबार येथे भेट दिली. भेटीच्या वेळी सन २००५-२००६ मध्ये विद्यार्थ्यांना गणवेश व लेखन सामुग्री वाटप योजनेतंर्गत जिल्हा परिषदेस शासनाकडून प्राप्त झालेल्या रु.३,५०,०००/- रक्कमेतून विद्यार्थ्यांना गणवेश वाटप केल्याबाबतची माहिती समितीस देताना, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी अहवाल वर्षात सदरहू रक्कमेतून ९,४८० विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले. एका मुलाच्या गणवेशासाठी ५७ रुपये ५० पैसे व मुलींच्या गणवेशासाठी ६९ रुपये ५५ पैसे या दराने सदर गणवेशाचे वाटप केलेले आहे असे सांगितले, पुढे समितीने साधारणपणे एका विद्यार्थ्यांसाठी ६० रुपये सरासरी किंमत गृहित धरल्यास, सदर रक्कमेचा ताळमेळ बसत नाही. या म्हणण्यावर तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी लेखी स्पष्टीकरणामध्ये नमूद केलेली माहिती चुकलेली आहे, असा पुढे खुलासा केला. लेखन साहित्य व पाट्या ४३७५ नग दिनांक ३१/३/२००६ अन्वये पुरविण्यात आले. त्यानुसार रु.७०,०००/- लेखन साहित्य व पाट्यांसाठी खर्च केल्याचे लेखी स्पष्टीकरणात नमूद केलेले आहे. महाराष्ट्रातील प्राथमिक शाळा साधारणपणे जून महिन्यात सुरु होत असताना, विद्यार्थ्यांना वर्ष संपण्याच्या वेळी दिनांक ३१ मार्च, २००६ रोजी लेखन साहित्य व पाट्यांचे वाटप केल्याप्रकरणी विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात येईल असे सांगितले.

उपरोक्त **भेटीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २१ सप्टेंबर, २०११ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित केली. साक्षीच्या वेळी समितीने विभागाकडून खालील मुद्यांची माहिती मागितली.**

१. सन २००५-२००६ या वर्षामध्ये जिल्हा परिषद, नंदुरबारला सदर योजनेसाठीचा निधी शासनाकडून कधी देण्यात आला, तसेच सदर निधीतून किती विद्यार्थ्यांना गणवेश व लेखन साहित्याचे वाटप करण्यात आले व केव्हा,

२. शासनामार्फत देण्यात येणाऱ्या निधीचा विनियोग व विहित वेळेत होतो किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी तसेच सदर योजनेची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होत नसेल तर संबंधितांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कारवाई करण्याची जबाबदारी शासनाची आहे किंवा नाही, असल्यास, जिल्हा परिषद, नंदुरबार येथे सदर योजनअंतर्गत शासनाला अनियमितता आढळून आली नाही काय,

३. सदर अनियमिततेस जबाबदार असणाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली,

उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने विभागाने समितीस खालील लेखी माहिती पुरविली.

गणवेश व लेखन साहित्य योजनेअंतर्गत सन २००५-२००६ साठी खालीलप्रमाणे शिक्षण उपसंचालक, पुणेकडील पत्र क्र. गणवेश/२००५-०६/अनु/नियमित/१०३ वि.ग./ड-५०८ दि.७/११/२००५ अन्वये अनुदान प्राप्त झाले.

विशेष घटक नियमितीसाठी रुपये १,५०,०००/-

विशेष घटक १०३ वि.ग.साठी रुपये २,००,०००/- असे एकूण रुपये तीन लक्ष पन्नास हजार प्राप्त होते. या निधी वितरणासंदर्भात मान्यता दि.२४/२/२००६ रोजी शिक्षण समितीमध्ये मंजूरी घेणेत येवून ठराव करणेत आलेला आहे. प्राप्त रक्कमेपैकी ८० टक्के रक्कम गटस्तरावर गणवेशासाठी वितरीत केली असून २० टक्के रक्कम लेखन साहित्य खरेदीसाठी राखून ठेवण्यात आली, या लेखन साहित्यासाठी एकूण रक्कम रु.७०,०००/- मधून विकास आयुक्त (उद्योग) संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई यांच्या दरकराराप्रमाणे जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांना लेखन पाटी खरेदी करण्यात आली असून पुरवठा आदेश आदर्श ग्रामविकास उद्योग सोसायटी, धोणाळवाडी पनवेल यांना दि.२०/३/२००६ रोजी दिला असून त्यानुसार गटस्तरावर दि.३१/३/२००६ रोजी पुरवठा केलेला आहे.

उपरोक्त प्राप्त निधीतुन गटनिहाय लाभार्थीना लाभ देणेत आलेला आहे.

तालुका	**मुले**	**मुली**	**एकुण**	**नियमित अनुदान**	**१०३ विकास अनुदान**	**एकुण वितरीत अनुदान**
नंदुरबार	८१७	७५६	१५७३	३०५५०	६८९२२	९९४७२
शहादा	८१७	७५६	१५७३	३०५५०	६८९२२	९९४७२
नवापुर	२२४	२१६	४४०	२७८८१	----	२७८८१
तळोदा	१९३	१५९	३५२	----	२२१३२	२२१३२
अक्कलकुवा	१३२	१२८	२६०	१६४८०	----	१६४८०
धडगांव	१३२	१००	२३२	----	१४५२७	१४५२७
	२३१५	**२११५**	**४४३०**	**११९९८८**	**१५९९७६**	**२७९९६४**

सदरचे अनुदान दिनांक २०/३/२००६ रोजी गटस्तरावर वितरीत करणेत आलेले आहे.

गटस्तरावरुन शाळास्तरापर्यंत लाभार्थीना विहित वेळेत विविध योजनांचा लाभ देण्यात येतो याबाबत, केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी या पर्यवेक्षीय यंत्रणेवर जबाबदारी असुन त्याचेमार्फत पडताळणी करण्यात येते.

गटस्तरावरुन २००५-२००६ मध्ये वितरीत केलेल्या अनुदानाचा विनियोग दाखला गटस्तरावरुन प्राप्त असुन त्यापैकी

१. पंचायत समिती, तळोदा यांनी रु.२२,१३२ अनुदानापैकी विनियोग रु.१५,९२४ व शिल्लक ६,२०८ रु. परत करणेत आलेली आहे.

२. पंचायत समिती, शहादा यांनी रु.९९,४७२ अनुदानापैकी विनियोग रु. ८४,६१४ व शिल्लक रक्कम रु. १४,८५८ अखर्चित दर्शविला आहे.

३. पंचायत समिती, धडगांव यांना रु.१४,५२७ अनुदान वितरीत करणेत आले होते मात्र त्यांनी त्यांचा प्रत्यक्ष विनियोग सन २००५-२००६ मध्ये केलेला नाही, त्यामुळे सदरचे अनुदान अखर्चीत राहीले. ही गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, धडगांव यांनी अनियमितता केली असून त्यांचेवर शिस्तभंग विषयक कारवाई प्रस्तावित करणेत येत आहे. उर्वरित गटांनी १०० टक्के अनुदानाचा विनियोग केलेला आहे.

विभागीय सचिवांची साक्ष :

सन २००५-२००६ मध्ये विद्यार्थ्यांना गणवेश व लेखन सामुग्री वाटप योजनेअंतर्गत शासनाकडून प्राप्त झालेल्या रु.३,५०,०००/- या रक्कमेतून ९,४८० विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले. तथापि, साधारणपणे एका विद्यार्थ्यासाठी ६० रुपये सरासरीप्रमाणे किंमत गृहित धरल्यास सदर रकमेचा ताळमेळ बसत नाही. सबब, लेखी स्पष्टीकरणामध्ये समितीस चुकीची माहिती देवून समितीची दिशाभूल केली आहे, ही अतिशय गंभीर बाब आहे, असा समितीने भेटीच्या वेळी निष्कर्ष काढला. त्यावेळी तत्कालीन शिक्षणाधिकरी यांनी या संदर्भात सादर केलेल्या लेखी स्पष्टीकरणामध्ये नमूद केलेली माहिती चुकलेली आहे, त्यामुळे लेखी स्पष्टीकरणामध्ये समितीची दिशाभूल केलेली आहे असा खुलासा केला.

समितीस दिलेल्या उपरोक्त लेखी माहितीमध्ये सुधारणा करण्याची समितीने विद्यमान शिक्षणाधिकारी यांना भेटीच्या वेळी संधी दिली. तथापि, त्यांनी त्यांची माहे फेब्रुवारी, २००५ मध्ये जिल्हा परिषद, नंदुरबार येथे बदली झाली आणि सदरहू परिच्छेद सन २००४-२००५ मधील आहे. त्या काळात ते या ठिकाणी कार्यरत नव्हते, त्यामुळे त्यांचा याच्याशी काही संबंध नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गणवेशावर जो खर्च करण्यात आलेला आहे तो योग्य आहे की, अयोग्य आहे याबाबत ते समितीस नेमके स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत. या प्रकरणी अधिक खुलासा करताना प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी रुपये ३,५०,०००/- विशेष घटक योजनेमार्फत मिळालेले आहेत, त्यापैकी २० टक्के रक्कमेतून लेखन पाट्या खरेदी करण्यात आल्या आणि ८० टक्के रक्कमेतून गणवेश खरेदी करण्यात आले. एकूण लाभार्थी मुले ४४३० आहेत, असे साक्षीच्यावेळी समितीपुढे स्पष्ट केले.

अभिप्राय व शिफारशी :

जिल्ह्यातील प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या मुलांना गणवेश व लेखन सामुग्री वाटपासाठी रुपये ३ लाख ५० हजार मंजूर करण्यात आले होते, त्यापैकी विशेष घटक नियमितीसाठी रु.१,५०,०००/- व विशेष घटक १०३ वि.ग.साठी रु.२,००,०००/- प्राप्त होते. या रक्कमेतून ८० टक्के रक्कम गणवेशासाठी व २० टक्के रक्कम लेखन सामुग्रीसाठी राखुन ठेवण्यात आली होती. लेखन साहित्यासाठी रु.७०,०००/- मधुन लेखन सामुग्री खरेदी करण्यात आली. गणवेशासाठी राखुन ठेवलेल्या रक्कमेतून मुलांना रु.५७.५० प्रत्येकी व मुलींना

रु.६९.५५ प्रत्येकी दराने एकूण ९४८० विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले होते. जिल्हा परिषदेने त्याचा सरासरी दर रु.६०/- एवढा गृहीत धरला होता. तथापि, त्यात घोळ झाल्याचे निदर्शनास आले होते. सदर घोळ कार्यरत शिक्षणाधिकारी (प्रा.) यांच्या आधीच्या काळात झालेला असल्याने त्याबाबतचा खुलासा ते साक्षीच्या वेळी करु शकले नाहीत.

लेखन साहित्याच्या माहितीत समितीस तफावत आढळली. लेखी माहितीत लाभार्थ्यांची संख्या ४४३० तथापि, साक्षीच्या वेळी दिलेल्या लेखी माहितीत ती संख्या ४३६७ सांगण्यात आली त्यावेळी समितीने त्यात सुधारणा करण्याबाबत विचारणा करुनही त्यात सुधारणा करण्यात आली नाही. तसेच, लेखन साहित्याचे वितरण गटस्तरावर दिनांक २० मार्च, २००६ रोजी वितरीत करण्यात येऊन ते प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना दिनांक ३१ मार्च, २००६ रोजी म्हणजेच शाळा बंद होण्याच्या वेळी प्राप्त झालेले आहे, ही बाब अत्यंत बेजबाबदारपणाची व विद्यार्थ्यांची शैक्षणिक कारकीर्द धोक्यात आणणारी आहे, अशी समितीची भावना झाली आहे.

भेटीच्या वा साक्षीच्या वेळी एखादा निम्नस्तरावरील अधिकारी समितीसमोर साक्ष देताना समितीच्या परवानगीने दुरुस्तीची अनुमती मागतो. तथापि, या जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी त्यांच्या लेखी माहितीत तफावत आढळल्याने, त्यात सुधारणा करण्याबाबत समितीने विचारणा करुनही त्यात सुधारणा न करता समितीस दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे व ही बाब जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यासारख्या वरीष्ठ व जबाबदार अधिकाऱ्याच्या उपस्थितीत घडूनही त्यांनी ती गांभीर्याने घेऊन त्यात दुरुस्ती न करणे म्हणजे समितीच्या सुचनेचा उपमर्द करणे आहे. तसेच समितीने जिल्हा परिषदेच्या वा विभागाच्या अधिकाऱ्यांना भेट वा बैठकीपुर्वी समितीस दिशाभूल करणारी माहिती न देण्याबाबत नियम समजावुनही अशी माहिती देणे म्हणजे समितीस असलेल्या विशेषाधिकाराचा भंग करणारी आहे असेही समितीचे परखड मत झालेले आहे. विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीने याबाबत चौकशी करुन, त्याचा अहवाल १ महिन्यात सादर करावा अशी सुचना देऊनही त्यानुसार अहवाल अद्याप सादर झालेला नाही या विभागीय सचिवांच्या हलगर्जीपणा तसेच बेजबाबदारपणाबद्दल समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

सबब, **समिती शिफारस करते की, उक्त प्रकरणी समितीस दिशाभूल करणारी माहिती देवून समितीचा वेळ वाया घालविणे तसेच समितीने या प्रकरणाची सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश देवूनही चौकशी अहवाल समितीस अद्यापही सादर न करणे यासाठी विभागीय सचिव यांचा खुलासा मुख्य सचिव यांच्याव्दारे समितीस सादर करण्यात यावा. त्याचप्रमाणे गणवेश वाटपाबाबत संबधित शिक्षणाधिका-यावरही कारवाई करण्यात यावी.**

समितीच्या उक्त शिफारशीवर शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्यात देण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.

प्रकरण पाच - दोन

नंदुरबार, जिल्हा परिषद

शालेय पोषण आहार कार्यक्रम

समितीने सन २००५-२००६ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक-१ च्या संदर्भात जिल्हा परिषदेकडून अभिकरण तत्वावर सोपविलेल्या योजनांपैकी शालेय पोषण आहार कार्यक्रम ही योजना राबविली जाते काय, असल्यास या योजनेचे स्वरुप काय आहे,

पंचायत समितीनिहाय किती शाळांमधुन शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पोषण आहार पुरविला जातो.

सन २००५-२००६ मध्ये जिल्ह्यात ही योजना राबविण्यासाठी किती निधी प्राप्त झाला व प्रत्यक्षात किती खर्च करण्यात आला, तरतुदीपेक्षा कमी रक्कम खर्च केलेला असल्यास त्याची सर्वसाधारण कारण काय आहेत, तसेच,

शालेय पोषण आहारामध्ये पुरविण्यात येणारा खाद्यपदार्थांचा पुरवठा, वितरण व अन्य बाबी संबंधात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत काय, असल्यास सदर तक्रारींचे स्वरुप काय आहे, यासंदर्भात किती अधिकारी व कर्मचारी दोषी असल्याचे आढळून आले व याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली, याबाबत प्रकरण निहाय माहिती समितीने मागितली.

मुख्य **कार्यकारी अधिकारी यांनी उपरोक्त मुद्यांच्या संदर्भात समितीस खालीलप्रमाणे माहिती पुरवीली.**

मा.सर्वोच्च न्यायालयाकडील याचिका क्रमांक १९६/२००१ अन्वये शासनातर्फे माहे जानेवारी, २००३ पासुन शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत शाळेत शिजविलेले अन्न देण्यात येते. उपरोक्त शासन आदेशान्वये नंदुरबार जिल्ह्यातंर्गत स्थानिक प्रशासनातील सर्व तसेच खाजगी प्राथमिक व अनुदानित माध्यमिक शाळांतील वर्ग १ ली ते ५ वी पर्यंतच्या सर्व मुला-मुलींसाठी शालेय पोषण आहार योजना नियमित राबविण्यात आली आहे.

स्वरुप :- जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेमार्फत प्रति विद्यार्थी १०० ग्राम याप्रमाणे मागणीनुसार तांदुळाचा पुरवठा स्वस्त धान्य दुकानदारांना करण्यात येतो. त्यांचेकडून मुख्याध्यापक तांदळाची उचल करतात. शिक्षण विभागाकडून सरासरी प्रती विद्यार्थी प्रती दिवस १.५०/- रुपये प्रमाणे निधी देण्यात येतो त्यानुसार स्थानिक महिलांमार्फत अन्न शिजवून शाळेच्या मधल्या सुट्टीत प्रत्येक विद्यार्थ्यांस वाटप करण्यात येते. दररोज शिजविण्यात आलेल्या पदार्थासाठी वेळापत्रक देण्यात आले आहे.

अ.क्र.	तालुका	शाळा संख्या	शेरा
१	नंदुरबार	३४५	
२	नवापुर	३१५	
३	शहादा	३३२	
४	तळोदा	१७८	
५	अक्कलकुवा	५३५	
६	धडगाव	५२५	
	एकुण	**२२३०**	

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात शालेय पोषण आहार योजनेसाठी खालीलप्रमाणे तरतुद प्राप्त झाली, ती तालुकास्तरावर वितरीत करुन ग्राम शिक्षण समितीमार्फत खर्च करण्यात आली. एकुण प्राप्त तरतुद रुपये ४०,५०,५८,६३०/- खर्चीत रक्कम ४,४२,६६,८४०/- शिल्लक रक्कम ३६,०७,९१,७९०/-

शालेय पोषण आहारामध्ये पुरविण्यात येणारा खाद्यपदार्थांचा पुरवठा, वितरण व अन्य बाबी संबंधात तक्रारी प्राप्त नाहीत, अधिकारी व कर्मचारी दोषी असल्याचे आढळून आले नाहीत. सबब प्रकरणनिहाय माहिती निरंक.

समितीने दिनांक १५ ऑक्टोबर, २०१० रोजी जिल्हा परिषद, नंदुरबार येथे भेट दिली. भेटीच्या वेळी जिल्ह्यात शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत जो गैरव्यवहार झालेला आहे, त्यासंदर्भातील शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी दिनांक ८/९/२०१० रोजी व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महामंडळ मर्यादित, मुंबई यांनी जिल्हा पणन अधिकारी, धुळे यांना पाठविलेल्या पत्रान्वये जिल्ह्यातील ४३० शाळांना ऑगस्ट महिन्याचा संपूर्ण धान्याचा पुरवठा झ ालेला नाही. याबाबत आपणाकडून दंड वसूल करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे कळविल्यानुसार यासंदर्भातील आवश्यक कागदपत्राची नस्ती तयार केली असुन हा विषय सचिवांच्या साक्षीसाठी घेण्यात येईल असे समितीने भेटीच्या वेळी स्पष्ट केले.

उपरोक्त **भेटीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २१ सप्टेंबर, २०११ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित केली. साक्षीच्यावेळी समितीने विभागाकडून खालील मुद्यांची माहिती मागितली.**

समितीला जिल्हा परिषद, नंदुरबार येथील भेटीच्या वेळी शालेय पोषण आहारासंदर्भात झालेला गैरव्यवहार महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महामंडळ मर्यादित यांच्याकडून धान्याचा पुरवठा न होणे इत्यादी संदर्भातील सादर करण्यात आलेल्या नस्तीच्या अनुषंगाने, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यामध्ये काय आढळून आले, तसेच सदर गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली अथवा येत आहे, नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत.

उपरोक्त **मुद्यांच्या अनुषंगाने विभागाने समितीस खालीलप्रमाणे माहिती पुरविली.**

शालेय पोषण आहार (सुधारीत) योजनेमध्ये किराणा/धान्यादी मालाचा पुरवठा खंडीतपणे आणि विलंबाने झाल्यामुळे सदर प्रकरणी चौकशी करण्यात येवून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

१. शासन निर्णय क्र.शापोआ २००९/प्रक्र.१३६/प्रशि ४, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक १८ जून, २००९ अन्वये शालेय पोषण आहार (सुधारीत) योजना दिनांक १ जुलै, २०१० पासून सुरु झालेली आहे. सदरच्या योजनेमध्ये किराणा/धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महामंडळ मर्यादित मुंबई यांची निविदा स्विकरण्यात येवून दिनांक १ जुलै, २०१० पासून किराणा/धान्यादी मालाचा पुरवठा शाळांपर्यंत पोहोच करण्यासाठी त्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे व शिक्षण संचालक (प्रा.) महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ व महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महामंडळ मर्यादित, कनमूर हाऊस दाणा बंदर, मुंबई यांचेशी दिनांक २३/१०/२००९ रोजी अटी व शर्तींना अधीन राहून करारनामा करणेत आलेला आहे.

२. माहे जुलै/ऑगस्ट, २०१० मध्ये किराणा/धान्यादी मालाचा पुरवठादाराने विलंबाने पुरवठा केल्यामुळे तसेच शाळा शालेय पोषण आहारपासून वंचीत राहिल्यास पुरवठ्यासंबंधी झालेल्या करारनाम्यातील अटी/शर्ती क्रमांक ९,१० नुसार विलंबाबत तसेच खंडीत पुरवठ्यापोटी दंडात्मक कारवाई करता येते. माहे जुलै/ऑगस्ट, २०१० मधील पुरवठा कालावधीत एकुण ४३० शाळांना किराणा/धान्याच्या मालाचा पुरवठा विलंबाने झाल्यामुळे दिनांक ८ सप्टेंबर, २०१० च्या पत्रानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महामंडळ मर्यादित, मुंबई यांना दंडात्मक कार्यवाहीबाबत सुचीत करण्यात आलेले आहे. (सोबत पत्राची झेरॉक्स प्रत जोडली आहे.)

३. दंडात्मक कार्यवाहीच्या रक्कमेची पुरवठादाराच्या मालाच्या देयकामधून वजावट करुन उर्वरीत रक्कम पुरवठादारास अदा केली आहे.

४. पुरवठादाराने माहे जुलै/ऑगस्ट, २०१० मधील पुरवठ्याचे देयक रुपये १,११,५१,७३८/- (अक्षरी रुपये एक कोटी अकरा लाख एक्कावन्न हजार सातशे अडतीस) मात्र या कार्यालयास माहे नोव्हेंबर, २०१० मध्ये सादर केले आहे. सदरच्या देयकामधून रुपये ९,२२,९४२/- (अक्षरी रुपये नऊ लाख बावीस हजार नऊशे बेचाळीस) मात्र दंडाची रक्कम एकत्रितपणे इयत्ता १ ली ते ५ वीच्या देयकामधून एकरक्कमी वजावट करुन उर्वरित रक्कम रुपये १,०२,२८,७९७/- (अक्षरी रुपये एक कोटी दोन लाख अठ्ठावीस हजार सातशे सत्याण्णव) मात्र दि. ३०/१२/२०१० रोजी अदा केली आहे. (सोबत आकस्मिक खर्चाच्या देयकाची झेरॉक्स प्रत जोडली आहे.)

५. किराणा/धान्यादी मालाचा पुरवठा विलंबाने झाल्याबाबत दंडात्मक कार्यवाहीची माहिती करारनाम्यातील अट क्रमांक ९,१० नूसार गट शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयाकडून मागविण्यात आली. त्याप्रमाणे माहे जुलै/ऑगस्ट, २०१० मध्ये इयत्ता १ ली ते ५ वी साठी रुपये ४,८०,५१२/- आणि इयत्ता ६ वी ते ८ वीसाठी रुपये १,८२,८८१/- अशी एकुण रुपये ६,७३,३९३/- मात्र एकुण दंडात्मक रक्कमेची आकारणी दिनांक १७ जानेवारी, २०११ रोजी प्रत्यक्षात करण्यात आली आहे. मात्र या कार्यालयाने दंडात्मक रक्कम रु.९,२२,९४२/- मात्र एकरक्कमी रक्कम पुरवठादाराच्या देयकातून कपात केली आहे. त्यामुळे रुपये २,४९,५४९/- इतकी

जादा रक्कम दंडात्मक रक्कम म्हणून पुरवठादाराच्या देयकामधून कपात करण्यात आलेली आहे. (सोबत आकारलेल्या दंडाची झेरॉक्स प्रती जोडल्या आहेत.)

विभागीय सचिवांची साक्ष :

समितीने दिनांक २१ सप्टेंबर, २०११ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित केली. साक्षीच्या वेळी प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी हा मुद्दा जिल्ह्यातील शालेय पोषण आहाराबाबतचा आहे, असे सांगितले. नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शालेय पोषण आहाराच्या विलंबाने व खंडीत पुरवठ्यापोटी संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. माहे जुलै व ऑगस्ट, २०१० मध्ये शालेय पोषण आहारासाठी शाळांना धान्य पुरवठा करण्यात आला नाही. याबाबत एकूण ९ लाख २२ हजार २४२ रुपयांचा दंड करण्यात आला व तो संबंधितांकडून वसूल करण्यात आला आहे, असे स्पष्ट केले.

समितीने साक्षीच्या वेळी कंत्राटदाराने धान्य पुरवठाच केलेला नाही. जर धान्य पुरवठा झाला नसेल तर दंडात्मक कारवाईचा प्रश्न कसा येतो, या केलेल्या प्रश्नास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कंत्राटदारांनी धान्य पुरवठा न केल्यामुळे दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे, असे उत्तर दिले. विद्यार्थ्यांना धान्य पुरवठा न केल्यामुळे त्या कालावधीत ते उपाशी राहिले त्यामुळे पुरवठा न केलेल्या मालाचे पैसे कंत्राटदाराला देण्यात आले नाहीत किंवा एकूण देयकातून पुरवठा न केलेल्या मालाचे पैसे कापून घेण्यात आले आहेत आणि त्याला मुख्य कार्यकारी अधिकारी दंडत्मक कारवाई असे म्हणत आहेत, या समितीच्या विधानावर शालेय पोषण आहार योजनेसाठी शाळांना महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महामंडळाकडून धान्य पुरवठा करण्यात येतो पणन महामंडळाकडून जर धान्य पुरवठा करण्यात आला नाही, तर शाळांनी स्थानिक पातळीवर बाजारातून धान्य खरेदी करावे आणि या धान्याचे पैसे संबंधित पुरवठादाराकडून वसूल करण्याबारोबरच त्यांना दंड देखील करावा, अशा स्पष्ट सूचना शासनाने दिलेल्या आहेत. जेणेकरुन धान्य पुरवठा झाला नाही तरी विद्यार्थी शालेय पोषण आहारापासून वंचित राहणार नाहीत. अशा प्रकारची कार्यवाही याप्रकरणी करण्यात आल्याचे दिसून येत नाही. एकूण ६६३ शाळांमध्ये ही परिस्थिती होती. या शाळांनी बाजारातून धान्य खरेदी करुन शालेय पोषण आहार दिला असता, तर प्रश्न निर्माण झाला नसता. या योजनेसंबंधी शासनाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार पुरवठादारांनी धान्य पुरवठा न केल्यास शाळांनी बाजारातून धान्य खरेदी करुन पोषण आहार विद्यार्थ्यांना द्यावा व त्यामध्ये खंड पडू देऊ नये, अशा प्रकारच्या स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत. परंतु या प्रकरणी तशा प्रकारची कार्यवाही संबंधितांनी केलेली नाही असे प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी स्पष्ट केले.

पणन महामंडळाकडून धान्य पुरवठा झालेला नाही. ग्रामीण भागामध्ये कोठेही धान्य पुरवठा झालेला नाही. परंतु, संबंधित अधिकाऱ्यांनी धान्य पुरवठा मिळाल्याची पोहोच मात्र दिलेली आहे व पुरवठादाराला देयकही अदा केलेले आहे. या प्रकरणी पुरवठादारांबरोबरच संबंधित अधिकारी, कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली, या समितीच्या प्रश्नास पुरवठादारांना दंड करण्यात आलेला असून, तो वसूल करण्यात आला आहे. विद्यार्थी शालेय

पोषण आहारापासून वंचित राहू नये म्हणून स्थानिक पातळीवर धान्य उपलब्ध करुन मुलांना जेवण देण्यात आले आहे. गावातील लोकांनी लोकवर्गणी काढून रेशन दुकानातून धान्य उपलब्ध करुन घेतले आहे. त्यामुळे विद्यार्थी आहारापासून वंचित राहिलेले नाहीत असे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी उत्तर दिले.

पुरवठादारांकडून साधारणपणे ९ लाख रुपये वसूल करण्यात आले आहेत. पुरवठादारांच्या एकूण देयकामधून ही रक्कम कापून घेण्यात आली आहे असे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस सांगितले. या बैठकीत चर्चा झाल्यानुसार सर्व मुद्यांबाबत एक महिन्यात चौकशी करण्यात येईल व त्याचा अहवाल समितीला सादर करण्यात येईल असे प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी बैठकीच्या शेवटी समितीस आश्वासन दिले.

अभिप्राय व शिफारशी :

सन २००५-२००६ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील शालेय पोषण आहारासंदर्भात माहिती घेण्यासाठी समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत माहे जुलै/ऑगस्ट, २०१० मध्ये जिल्ह्यातील ४३० शाळांना किराणा/धान्याचा पुरवठा पुरवठादारांनी विलंबाने केला होता, त्यामुळे त्या शाळांतील विद्यार्थी आहारापासून वंचित राहील्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

त्यानंतर करारनाम्यातील शर्तीनुसार कारवाईपोटी जिल्हा परिषदेने पुरवठादारांच्या देयकातुन दंडात्मक रक्कम कापुन घेतली होती. तथापि, शासनाच्या सुचनेनुसार जिल्हा परिषदेने दंडात्मक कारवाईसोबत विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहाराचा पुरवठा न झालेल्या कालावधीतील धान्याची किंमतही महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महामंडळाकडून वसुल होणे आवश्यक होते. तथापि, दुर्देवाने तसे करण्यात आले नाही, हा जिल्हा संपूर्ण आदिवासी असुन तेथे गरीबी फार आहे त्यामुळे विद्यार्थी आहारापासून वंचित राहू नयेत म्हणून गांवकऱ्यांनी लोकवर्गणी काढून तेथील विद्यार्थ्यांना पोषण आहार उपलब्ध करुन दिलेला आहे ही बाब जिल्हा परिषदेस निश्चितपणे भूषणावह नाही. तसेच शालेय पोषण आहार पुरवठादाराकडून आहार प्राप्त न झाल्यास तो तहसिलदाराकडून तात्काळ उपलब्ध करुन घेण्यात येईल, असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी भेटीच्या वेळी आश्वासन देवूनही त्यानुसार कार्यवाही झालेली नाही, ही बाब समिती येथे सखेद नमूद करीत आहे.

समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, पणन महामंडाळाकडून विद्यार्थ्यांना वेळेवर व पुरेशा प्रमाणात पोषण आहाराचा पुरवठा होत नाही आणि या गैरव्यवहारास, पणन महामंडळास शासकिय यंत्रणेकडूनही तेवढेच सहाय्य होत असते. पुरवठादार वेळेवर व पुरेसा धान्यपुरवठा न करताही, ते त्याचा पुरवठा करतात असे कागदोपत्री दाखवून त्याची पूर्ण किंमत अदा करण्यात येते. शाळेतील रोजच्या पटसंख्येची शहानीशा न करता, शाळेत कमी उपस्थिती असतानाही, पूर्ण उपस्थिती असल्याचे दाखवून त्यानुसार देयकाची रक्कम अदा करण्यात येते अशा रितीने शासनाच्या कोट्यावधी रुपयांच्या रक्कमेचा अपहार होत असतो, अतः त्याबाबत सादर झालेली देयके जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी तपशीलवार तपासणे अपेक्षित आहे. तथापि, त्यांच्याकडूनही ती वेळोवेळी न तपासण्याचा निष्काळजीपणा

झाल्याचेही समितीच्या निदर्शनास आले आहे. याप्रकरणी गांभीर्याने व सखोल चौकशी करुन यात जे जे अधिकारी व कर्मचारी गुंतलेले आहेत त्यांच्यावर काठोर कारवाई करुन, त्याचा अहवाल बैठकीनंतर एक महिन्यात समितीस सादर

करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी बैठकीत आश्वासन देवूनही अद्याप सदर अहवाल प्रलंबित आहे. याबाबत समिती तीव्र नापंसती व्यक्त करीत आहे.

सबब, **याप्रकरणी फक्त नंदुरबार जिल्ह्यापुरतीच चौकशीची मर्यादा न ठेवता राज्यातील प्रत्येक जिल्हानिहाय सखोल चौकशी करण्यात यावी व नंदुरबार जिल्ह्यासहीत त्यात दोषी आढळलेल्या अन्य जिल्ह्यातीलही अधिकारी व कर्मचारी यांच्यावर त्यांची वार्षिक वेतनवाढ रोखुन विद्यार्थ्यांना त्यांच्या न्याय हक्कापासुन वंचित ठेवल्याप्रकरणी त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहाराचा पुरवठा करण्यास अकारण विलंब लावणाऱ्या पणन महामंडळासहीत सर्व पुरवठादारांवर कारवाई करुन पुरवठादारांना काळ्या यादीत टाकण्यात यावे व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

परिशिष्ट

समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त

बुधवार, दिनांक ०४ जून, २०१०

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, रत्नागिरी

उ प स्थि ती

१. श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.माधावी ाव पवार, वि.स.स.

३. श्री.दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

४. श्री.बच्चू कडू, वि.स.स.

५. श्री.उदय सामंत, वि.स.स.

६. श्री.खुशाल बोपचे, वि.स.स.

७. श्री.सुरेश खाडे, वि.स.स.

८. श्री.अनिल राठोड, वि.स.स.

९. श्री.विजयराव औटी, वि.स.स.

१०. श्री.नितीन भोसले, वि.स.स.

११. प्रा.सुरेश नवले, वि.प.स.

१२. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

१३. ॲड.उषाताई दराडे, वि.प.स.

१४. श्री.सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१. श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

२. श्री.जितेंद्र भोळे, अवर सचिव

मुख्य लेखा परीक्षक (स्थानिक निधी लेखा यांचे कार्यालय)

श्री.शं.ध.चव्हाण

ग्राम विकास विभाग, मंत्रालय

श्री.प्रकाश हिर्लेकर, सह सचिव

जिल्हा परिषद, रत्नागिरी

१. श्री.खुशाभाऊ शिनगारे, मुख्या कार्यकारी अधिकारी

२. श्री.दिनेश डी.डोके, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी

३. श्री.ए.एस.माने, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

४. श्री.एम.एन.दिवे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र) (प्रभारी)

५. श्री.जी.व्ही.चव्हाण, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं)

६. श्रीमती एस.अे.पाटोळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

७. श्री.डी.एस.आंधळे, वरिष्ठ लेखाधिकारी

८. श्री.जे.डी.साळुंखे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

९. श्री.बी.डी.हुलवान, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

१०. श्री.एन.एम.कोळपकर, कृषी विकास अधिकारी

११. श्री.जे.आर.विभुते, कार्यकारी अभियंता, रत्नागिरी विभाग

१२. श्री.व्ही.बी.भाले, कार्यकारी अभियंता, चिपळूण विभाग

१३. श्री.एस.अे.होशिंग, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

१४. डॉ.एल.एस.साळे, जिल्हा आरोग्य अधिकारी

१५. डॉ.पी.बी.मयेकर, अति.जिल्हा आरोग्य अधिकारी

१६. डॉ.श्रीमती वाय.आर.नितनवरे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (प्र)

१७. श्रीमती .व्ही.एस.शिंदे, समाज कल्याण अधिकारी

१८. श्री.अे.अे.स.कासार, उप अभियंता, जी.एस.डी.ए.

१९. श्री.जी.बी.चाळके, गटप्रममुख, जिल्हा सुलभीकरण गट, जलस्वराज्य प्रकल्प

२०. श्री.एस.बी.गुजर, गटविकास अधिकारी, मंडणगड

२१. श्री.एस.बी.माने, गटविकास अधिकारी, दापोली

२२. श्री.एस.एन.धादवड, गटविकास अधिकारी, खेड

२३. श्रीमती एस.आर.खराडे, गटविकास अधिकारी, चिपळूण

२४. श्री.एन.एस.रेवंडकर, गटविकास अधिकारी, गुहागर

२५. श्री.जी.डी.साखरे (प्रभारी), गटविकास अधिकारी, संगमेश्वर

२६. श्री.एस.एम.रेडकर, गटविकास अधिकारी, रत्नागिरी

२७. श्री.एम.एन.जाधव, गटविकास अधिकारी, लांजा

२८. श्री.एन.एम.लांधी, गटविकास अधिकारी, राजापूर

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील रत्नागिरी जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतील.

मंगळवार, दिनांक १७ जून, २०१०

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, सातारा

उ प स्थि ती

१) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख,

२) श्री. माधवराव पवार, वि.स.स.

३) श्री. हणमंतराव पाटील-बेटमोगरेकर, वि.स.स.

४) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

५) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

६) श्री. बच्चू उर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.

७) श्री. बापूसाहेब पठारे, वि.स.स.

८) श्री. अण्णा बनसोडे, वि.स.स.

९) श्री. सुरेश खाडे, वि.स.स.

१०) श्री. अनिल भैय्या राठोड, वि.स.स.

११) श्री. विजयराव औटी, वि.स.स.

१२) श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

१३) श्री. नितीन भोसले, वि.स.स.

१४) प्रा. सुरेश नवले, वि.प.स.

१५) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

१६) ॲड. उषा दराडे, वि.प.स.

१७) श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

श्री. जितेंद्र भोळे, अवर सचिव

मुख्य लेखा परीक्षक (स्थानिक निधी लेखा)
यांचे कार्यालय, नवी मुंबई.

श्री. शं.ध. चव्हाण, मुख्य लेखा परीक्षक

ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय

श्री. अ.ज. सुभेदार, उप सचिव (ग्रामविकास)

सातारा, जिल्हा परिषदचे अधिकारी

श्री. यशवंत शितोळे, मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री. एच.पी. मुळूक, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री. एस.एस. तडकसे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
श्री. आर.के. वाघ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन)
श्री. टी.आर. गारळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)
श्री. आर.एच. कोकरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण, ए.बा. विकास सेवा योजना)
श्रीमती प्रमिला जाखलेकर, गटप्रमुख, जलस्वराज्य
श्री. महेश पालकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
श्री. एल.एल. शिंदे, शिक्षणाधिकारी (निरंतर)
श्री. उदयसिंह भोसले, (माध्यमिक)
श्री. जी.एस. मोहिते, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर)
श्री. ए.व्ही. कांबळे, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (दक्षिण)
श्री. टी.डी. चिंदके, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे
श्री. एस.एस. शिंदे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा
डॉ. भगवान पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी
श्री. आर.आर. कांबळे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
श्री. सी.जी. बागल, कृषी विकास अधिकारी
श्री. ए.पी. कांबळे, समाजकल्याण अधिकारी
श्री. वाय.व्ही. शितोळे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रा्मीण विकास यंत्रणा
श्री. विकास पाटील, जिल्हा अधिक्षक कृष्ी अधिकारी
श्री. व्ही.एस. सिद, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा
श्री. ए.एस. सोनावणे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कराड
श्री. ए.आर. पाटील, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाटण
श्री. के.डी. सावंत, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोरेगांव
श्रीमती आय.व्ही. कोळी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वडूज
श्री. व्ही.पी. जाधव, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माण
श्री. जी.बी. भोसले, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खंडाळा
श्री. व्ही.एल. जाधव, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फलटण
श्री. वि.मा. पवार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वाई
श्री. सुरेश मारकड, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मेढा
श्री. गोकुळदास वि. बैरागी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, महाबळेश्वर

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील सातारा जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतील.

गुरुवार, दिनांक ९ सप्टेंबर, २०१०

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, कोल्हापूर

: उ प स्थि ती :

१) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री. माधवराव पवार, वि.स.स.

३) श्री. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स

४) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स

५) श्री. बापूसाहेब पठारे, वि.स.स.

६) श्री. आण्णा बनसोडे, वि.स.स.

७) श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.

८) श्री. सुरेश खाडे, वि.स.स.

९) श्री. अनिल राठोड, वि.स.स.

१०) श्री. विजयराव औटी, वि.स.स.

११) श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

१२) श्री. नितीन भोसले, वि.स.स.

१३) प्रा. सुरेश नवले, वि.स.स.

१४) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

१५) ॲड. उषा दराडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१. श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
२. श्री.विलास आठवले, अवर सचिव
३. श्री.सुभाष नलावडे, कक्ष अधिकारी

कोल्हापूर जिल्हा परिषदेचे अधिकारी :-

१) श्रीमती जयश्री भोज, मुख्य कार्यकारी अधिकारी

२) श्री. एन.एस.ननावरे, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी

३) श्री. गणेश पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

४) डॉ. दिलीप माने, जिल्हा आरोग्य अधिकारी

५) श्री. प्रमोद शिंदे, प्रकल्प संचालक

६) श्रीमती सुषमा देसाई, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण)

७) श्री. नितीन माने, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

८) श्री. आर.पी.शिवदास, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)

९) श्री. शंकर तोटावार, कृषी विकास अधिकारी

१०) श्री. शरद गोसावी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

११) श्री. जी.टी.पवार, कार्य अभियंता (बांधकाम)

१२) श्री. शरद गोसावी, शिक्षणधिकारी (प्राथमिक)

१३) श्री. ए.बी.गंधे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

१४) श्रीमती. वैशाली शिंदे, समाज कल्याण अधिकारी

१५) श्री. संजय राजमाने, वरिष्ठ लेखाधिकारी

१६) श्री. एम.एस.बसर्गेकर, कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.)

१७) श्री. नरेंद्र इंदुलकर, कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु. विभाग-१)

१८) श्री. डी.एस.चव्हाण, प्रभारी गट प्रमुख, जलस्वराज्य प्रकल्प

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील कोल्हापूर जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतील.

बुधवार, दिनांक १ ऑक्टोबर, २०१०

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, नाशिक

: उ प स्थि ती :

१) श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री.माधवराव पवार, वि.स.स.

३) श्री.हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.

४) श्री.दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

५) श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

६) श्री.बच्चू कडू, वि.स.स.

७) श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स.

८) डॉ.खुशाल बोपचे, वि.स.स.

९) श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

१०) श्री.अनिल राठोड, वि.स.स.

११) श्री.विजयराव औटी, वि.स.स.

१२) श्री.दादाजी भुसे, वि.स.स.

१३) श्री.नितीन भोसले, वि.स.स.

१४) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.

१५) श्री.विक्रम काळे, वि.प.स.

१६) ॲड.उषा दराडे, वि.प.स.

१७) श्री.सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

१८) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

श्री.विलास आठवले, अवर सचिव

मुख्य लेखा परीक्षक यांचे कार्यालय

श्री.शं.ध.चव्हाण, सहायक मुख्य लेखा परीक्षक, (स्थानिक निधी) (लेखा)

ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

श्री.गायकवाड, अवर सचिव

नाशिक जिल्हा परिषदचे अधिकारी

१) श्री.बी.जी.वाघ, मुख्य कार्यकारी अधिकारी

२) श्री.अ.बा.लांडगे, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी

३) श्री.जी.बी.बेहळे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

४) श्री.वासुदेव सोळंके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)

५) श्री.अ.मो.महाजन, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.)

६) श्री.सुनिल अहिरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) (प्रभारी)

७) श्री.विजय डेकाटे, गट प्रमुख, जलस्वराज्य (प्र.)

८) श्री.न.दि.महाजन, मुख्य लेखा व वित्त अधिकारी,

९) श्री.ब.कुं.दहिफळे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

१०) श्री.ज.कौ.देवरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

११) श्री.बा.पो.साळुंके, कार्यकारी अभियंता, इवद-१

१२) श्री.ब.कौ.झोडगे, कार्यकारी अभियंता, इवद-२

१३) श्री.एस.ए.शेख, कार्यकारी अभियंता, इवद-३

१४) श्री.वाय.बी.कुळकर्णी, नोडल कार्यकारी अभियंता, प्रमंग्रासयो,

१५) श्री.एस.डी.कातकाडे, कार्यकारी अभियंता, लपा (पूर्व) (प्रभारी)

१६) श्री.रा.लिं.सोनाळे, कार्यकारी अभियंता, लपा (पश्चिम)

१७) श्री.पी.आर.ठाकूर, कार्यकारी अभियंता, ग्रापापु पाणी व्यवस्थापन व देखभाल दुरुस्ती

१८) श्री.अ.दा.मोरे, कृषि विकास अधिकारी

१९) डॉ.सु.गं.खोडवे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

२०) डॉ.अरविंद मोरे, जिल्हा आरोग्य अधिकारी (प्रभारी)

२१) श्रीमती प्राची वाजे, समाज कल्याण अधिकारी

२२) श्री.मो.मा.भट्ट, उप अभियंता, जीएसडीए (यांत्रिकी)

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील नाशिक जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतील.

बुधवार, दिनांक १५ ऑक्टोंबर, २०१०

स्थळ : जिल्हा परिषद, नंदुरबार

उपस्थिती

१) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.
३) श्री. माधवराव पवार, वि.स.स.
४) श्री. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.
५) श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.
६) श्री. भाऊसाहेब कांबळे,वि.स.स.
७) श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.
८) डॉ. खुशाल बोपचे, वि.स.स.
९) श्री. विष्णू सावरा, वि.स.स.
१०) श्री. विजयराव औटी, वि.स.स.
११) श्री. दादाजी भुसे, वि.स.स.
१२) श्री. नितीन भोसले, वि.स.स.
१३) प्रा. सुरेश नवले, वि.प.स.
१४) ॲड. उषा दराडे, वि.प.स.
१५) श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री. भाऊसाहेब कांबळे, सहसचिव
श्री. विलास आठवले, अवर सचिव

स्थानिक निधी लेखा मुंबई.

श्री. चव्हाण, मुख्य लेखा परीक्षक

ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई.

श्री. स.सु.गांगुर्डे, कक्ष अधिकारी

जिल्हा परिषद नंदुरबार
श्री.आर.जी.कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री.डी.आर. बारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री.एम.टी.गरकळ, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
श्री.गवळे, तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी
श्री. आर.पी.पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
श्री.एम.डी.धांडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप)
श्री.बी.ए.राठोड, उप मुख्य अधिकारी (बा.क.)
श्री.रावसाहेब झाल्टे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)
श्री.यू.ए.बिरारी, कार्यकारी अभियंता (लघुसिंचन)
श्री.पी.एन.चौधरी, कार्यकारी अभियंता (ग्रापापु)
श्री.एस.के.वळवी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
श्री.आर.आर.मारवाडी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
श्री.अ.स.खर्चान, कृषि विकास अधिकारी

डॉ.डी.बी. महाले, जिल्हा आरोग्य अधिकारी
श्री.एस.बी.देशमुख, जि.कृ.अधिकारी (सा)
श्री.एस.आर.पाडवी, मोहिम अधिकारी
डॉ.एस.के.तुंबारे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
श्री.विशाल फंड एन.आर.एच.एम. (डी.पी.एम.)
श्री.आर .जी.पाटील, समाज कल्याण अधिकारी
श्री.व्ही.के.पाटील, कार्यकारी अभियंता, (सर्व शि .अ.)
श्री.बी.बी.बहिरम, गट विकास अधिकरी, प.स.नंदुरबार
श्री.एस.डी.वळवी, गट विकास अधिकारी, पं.स. अक्कलकुवा
श्री.आर.एस.अहिरे, गट विकास अशिकारी, पं.स. शहादा
श्री.डी.डी.कराळे, गट विकास अधिकारी, पं.स. घडगांव
श्री.बी.एम.मिटके, गट विकास अधिकारी, पं.स. तळोदा
श्री.यु.के.खंदारे, गट विकास अधिकारी, पं.स. नवापूर
श्री.एन.व्ही.नेरकर, उप अभियंता.

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने नंदुरबार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील नंदूरबार जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतील.

मंगळवार, दिनांक ३ मे, २०११

स्थळ : विधान भवन, मुंबई

उपस्थिती

१. श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. ॲड.के.सी.पडवी, वि.स.स.

३. श्री.हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.

४. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.

५. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

६. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

७. श्री.सुरेश खाडे, वि.स.स.

८. श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

९. ॲड.उषा दराडे, वि.प.स.

१०. श्री.सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

११. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१. श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

२. श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

मुख्या लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा कार्यालय, नवी मुंबई

श्री.रवींद्र भागवत, संचालक

विभागीय अधिकारी, मंत्रालय, मुंबई/रत्नागिरी

श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

श्री.सुधीर ठाकरे, सचिव, ग्रामविकास विभाग

श्री.धवड, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग

श्री.भूषण गगराणी, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

श्री.दिनेश डोके, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी

श्री.कांतीलाल उमाप, उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग

श्री.साबळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, रत्नागिरी

श्री.साळुंके, शिक्षणाधिकारी, रत्नागिरी

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दि. ६ जुलै, २०११

स्थळ : विधान भवन, मुंबई

उपस्थिती

१. श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.हणमंतराव पाटील, वि.स.स.

३. श्री.दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

४. डॉ.खुशाल बोपचे, वि.स.स.

५. श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.

६. श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

७. श्री.नितीन भोसले, वि.स.स.

८. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

मुख्य लेखा परिक्षक यांचे कार्यालय

श्री.र.भा.भागवत, संचालक, स्थानिक निधी लेखा

विभागीय प्रतिनिधी

वित्त विभाग

१. श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव (ले व को)

शालेय शिक्षण विभाग

१. श्री.सुमीत मलिक, प्रधान सचिव

२. श्री.ना.ड.ऐराल, उप सचिव

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव

महिला व बालविकास विभाग

श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव

जलसंधारण व रोहयो विभाग

१. श्री.सुनील पोरवाल, प्रधान सचिव

२. श्री.सुनील चव्हाण, उप सचिव, जलसंधारण

३. श्री.बा.बा.नारायणकर, उप सचिव, नियोजन विभाग

आरोग्य विभाग

श्री.भूषण गगराणी, सचिव

ग्रामविकास विभाग

१. श्री.सुधीर ठाकरे, सचिव

२. डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी, उप सचिव

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, पाणी पुरवठा विभाग, प्रधान सचिव महिला व बालविकास विभाग, प्रधान सचिव, जलसंधारण व रोहयो विभाग, सचिव, आरोग्य विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, वित्त विभाग, उप सचिव, शालेय शिक्षण विभाग, उप सचिव, जलसंधारण विभाग, उप सचिव, नियोजन विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक १३ जुलै, २०११

स्थळ : विधान भवन, मुंबई

उपस्थिती

१. श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

३. डॉ.खुशाल बोपचे, वि.स.स.

४. श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

५. श्री.नितीन भोसले, वि.स.स.

६. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

७. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१. श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

२. श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

मुख्य लेखा परिक्षक यांचे कार्यालय

श्री.र.भा.भागवत, संचालक, स्थानिक निधी लेखा

विभागीय प्रतिनिधी

१. श्री.स्वाधिन क्षत्रिय, प्रधान सचिव, महसूल विभाग

२. श्री.सुधीर ठाकरे, सचिव, ग्रामविकास विभाग

३. श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग

४. श्रीमती प्रणाली चिटणीस, उप सचिव (पदुम),

५. श्री.सुनिल चव्हाण, उप सचिव, ग्रामविकास (जलसंधारण)

६. श्री.दि.ग.मोरे, उप सचिव, ग्रामविकास विभाग

७. डॉ.दिपक म्हैसेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर

८. श्री.नामदेव ननावरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकार, जिल्हा परिषद, कोल्हापूर

९. श्री.आर.पी.शिवदास, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सा.प्र.) जिल्हा परिषद, कोल्हापूर

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने प्रधान सचिव, महसूल विभाग, प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, पदुम, उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०११

स्थळ : विधान भवन, मुंबई

उपस्थिती

१. श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.माधवराव पवार, वि.स.स.

३. श्री.दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

४. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

५. श्री.खुशाल बोपचे, वि.स.स.

६. श्री.सुरेश खाडे, वि.स.स.

७. श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

८. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

मुख्य लेखा परीक्षक (स्थानिक निधी लेखा)

श्री.र.भा.भागवत, संचालक

ग्रामविकास विभाग

श्री.सुधीर ठाकरे, सचिव

डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी, उप सचिव

शालेय शिक्षण विभाग

श्री.सुमित मलिक, प्रधान सचिव

जलसंधारण विभाग

श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव

श्री.सुनिल चव्हाण, उप सचिव

पुशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग

श्री.अनिल डिग्गीकर, सचिव

नियोजन विभाग

श्री.अशोक जगताप, सह सचिव

जिल्हा परिषद, नंदुरबार

श्री.आर.जी.कलकर्णी, मुख्य कार्यकरी अधिकरी

डॉ.अर्जुन गुंडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.एम.टी.गरकळ, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००४-२००५ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात नंदुरबार जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने प्रधान सचिव, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, सचिव, सामाजिक न्याय विभाग, सह सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, सह सचिव, नियोजन विभाग, उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २७ सप्टेंबर, २०११

स्थळ : विधान भवन, मुंबई

उपस्थिती

१. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.के.सी.पडवी, वि.स.स.

३. श्री.हणमंतराव पाटील-बेटमोगरेकर, वि.स.स.

४. श्री.सुरेश खाडे, वि.स.स.

५. श्री.दिवाकर रावते, वि.स.स.

६. प्रा.सुरेश नवले, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

मुख्य लेखा परीक्षक यांचे कार्यालय

श्री.र.भा.भागवत, संचालक, स्थानिक निधी लेखा

ग्रामविकास व जलसंधारण विभाग

श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव (रो.ह.यो. व जलसंधारण)

श्री.सुधीर ठाकरे, सचिव (ग्रामविकास व पंचायत राज)

श्री.नारायणकर, सह सचिव

श्री.सुनील चव्हाण, उप सचिव

नगरविकास विभाग

श्री.मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (२)

शालेय शिक्षण विभाग

श्री.संजय कुमार, प्रधान सचिव

गृह विभाग

श्रीमती मेधा गाडगीळ, प्रधान सचिव (तुरुंग)

श्री.प्रकाश पवार, अपर पोलीस महासंचालक (कारागृह)

श्री.बिपीन बिहारी, कारागृह उपमहानिरीक्षक, (पूर्व विभाग) नागपूर

श्री.वाय.डी.देसाई, अधीक्षक, ठाणे मध्यवर्ति कारागृह

सामाजिक न्याय विभाग

श्री.दिनेश वाघमारे, सचिव

जिल्हा परिषद, नाशिक

श्री.रणजीतकुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००४-२००५ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने प्रधान सचिव, रोहयो व जलसंधारण विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, प्रधान सचिव (तुरुंग), गृह विभाग, सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, सचिव, सामाजिक न्याय विभाग सह सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांची साक्ष घेतली.

दिनांक - १७ एप्रिल, २०१२
स्थळ : विधान भवन, मुंबई
उपस्थिती

समिती प्रमुख :

१. **श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.**

समिती सदस्य :

२ **श्री. माधवराव पवार, वि.स.स.**
३ **श्री. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.**
४ **श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.**
५ **श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.**
६ **श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.**
७ **श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.**
८ **श्री. सुरेश खाडे, वि.स.स**
९ **श्री. विष्णू सावरा, वि.स.स.**
१० **श्री. नितीन भोसले, वि.स.स.**
११ **प्रा. सुरेश नवले, वि.प.स.**
१२ **श्री. विक्रम काळे, वि.प.स.**
१३ **श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.**
१४ **श्री. दिवाकर रावते, वि.प.स.**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव.
श्री.प्र.स.मयेकर, कक्ष अधिकारी

संक्षिप्त कार्यवृत्त

समितीने बैठकीत समितीच्या दहाव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ सुधारणासह संमत केले.